# माणूस

शनिवार । २४ जानेवारी १९७६ । एक रुपया



सद्हेतूने काढलेला हा कर्जमुक्ती वटहुकूम गरिबांच्या ससेहोलपटीला कारणीभूत होत आहे याची शासनाने त्वरित दखल घ्यायला हवी....

## साप्ताहिक माणूस

**वर्ष पंधरावे – अंक : तेहतिसावा**

**२४ जानेवारी १९७६**

**मूल्य : एक रुपया**



संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४३४५९
¤


# वीस कलमी कार्यक्रम

**लेखांक पहिला । प्रा. रा. म. बिवलकर**

### १ : ग्रामीण कर्जमुक्ती

छोटे शेतकरी, भूमिहीन मजूर, ग्रामीण कारागीर यांना खूपच दिलासा देणारे हे कलम अत्यंत महत्त्वाचे. वीस कलमी कार्यक्रम जाहीर करताना पंतप्रधान इंदिराजींनी असे जाहीर केले की, क्रमाक्रमाने ग्रामीण भागातील संपूर्ण कर्जबाजारीपणा नष्ट करण्याचा सरकारचा विचार आहे. त्या दृष्टीने पहिले पाऊल म्हणजे सहकारी व सरकारी बँकांची अगर सरकारी कर्जे वगळून ग्रामीण जनतेची सर्व खाजगी कर्जे माफ केल्याचा हुकूम सरकारने काढला. सरकारी परवाने (लायसेन्स) घेऊन सावकारी करणारांची कर्जेही या हुकुमाने माफ झाली. देशातील ग्रामीण कर्जबाजारीपणा ही आजवर एक खूपच मोठी समस्या होती. अलीकडे रिझर्व्ह बँकेने केलेल्या 'ऑल इंडिया डेट अॅण्ड इन्व्हेस्टमेण्ट' पाहणीनुसार जून १९७१ अखेर देशातील ४३ टक्के ग्रामीण जनता कर्जाच्या ओझ्याखाली चिरडली आहे असे आढळले. एकूण ग्रामीण कर्ज ३९४१ कोटी रु. असावे असा अंदाज पाहाणीकारांनी व्यक्त केला. रिझर्व्ह बँकेने अलीकडे केलेल्या छोट्या शेतकऱ्यांच्या दुसऱ्या एका अभ्यासानुसार या शेतकऱ्यांची कर्जाची गरज भागविणाऱ्या संस्था अल्पांशाने ही गरज भागवू शकतात हे सिद्ध झाले आहे. अभ्यासपाहाणीसाठी निवडलेल्या १२ पैकी ११ जिल्ह्यांत सहकारी संस्थांचे या बाबतीतील अपयश उठून दिसले ! या सर्व क्षेत्रात छोट्या शेतकऱ्यांचा तरणोपाय ठरला तो जमीनदार, सावकार, व्यापारी, सावकार–शेतकरी, दलाली करणारे अडत्ये ! चौदा मोठ्या व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले असले तरी १२ पैकी १० जिल्ह्यांत व्यापारी बँकांनी कृषिक्षेत्राला कर्जे पुरविल्याचे आढळले नाही ! अनेक शेतीविकासयोजना पैशापायी अडखळून पडलेल्या आढळून आल्या.

या पार्श्वभूमीवर 'कर्जमुक्ती आदेश' म्हणजे गरिबांना, भूहीनांना, छोट्या शेतकऱ्यांना, कारागिरांना वरदान वाटले असेल यात शंका नाही; पण धोरण जाहीर झाले, आदेश ठिकठिकाणी पोचले तरी कर्जमुक्ती प्रत्यक्षात कशी उतरवायची याची पद्धत ठरली नाही. तहसीलदार, पोलीस, इतर अधिकारी यांना त्यांनी जनतेला कशी मदत करावी याबाबतीत स्पष्ट आदेश मिळाले नाहीत. ग्रामीण भागातील खाजगी सावकार मग ते परवानेधारक असोत अगर चोराटा सावकारी धंदा करणारे असोत, गहाणावर कर्जे देतात. गहाण वस्तूच्या किंमतीच्या ३० ते ४० टक्केच रक्कम ऋणकोच्या हाती ठेवतात. सावकार परवानेधारक असेल, ऋणको शिक्षित असेल तरच गहाणाच्या पावत्या तयार होतात. नाही तर सारा व्यवहार तोंडी. चिठीचपाटी काही नाही. गहाणाच्या पावत्या असलेला ऋणको नाही, तहसीलदार–पोलीस वेळेवारी योग्य ती मदत–मार्गदर्शन करू शकत नाहीत. मग इतरांची गोष्ट तर बोलायलाच नको. कर्जमुक्ती

आदेशाबरोबर गहाणाचा धंदा करणाऱ्या सर्व खाजगी सावकारांच्या गहाण वस्तू–गोदामांना–सिले लागली असती तर गरीब कर्जदाराच्या पदरी काही पडले असते? आज एक तर या मंडळींनी हायकोर्टाचा 'स्टे' आणला आहे. दुसरी गोष्ट म्हणजे गहाण वस्तू बेगुमानपणे विकल्या अगर वितळवल्या जात आहेत. हजाराच्या वस्तूवर ३०० रु. कर्ज दिलेले. ना चिठी ना चपाटी! ऋणकोला ३०० रु. कर्ज माफ झाले; पण ७०० ची खोट बसली. सामान्य गरीब ऋणको त्यामुळे या आदेशाखाली भरडला गेला. शिवाय ग्रामीण कर्जे पुरवणारा सांस्थिक ढाचा त्वरित उभा करणे. सरकारला कठीण!' अशा परिस्थितीत गरीब ऋणकोंची स्थिती 'आई जेवू घालीना आणि बाप भीक मागू देईना' अशी झाली आहे. सद्हेतूने काढलेला हा वटहुकूम गरिबांच्या ससेहोलपटीला कारणीभूत होत आहे याची शासनाने त्वरित दखल घ्यायला हवी.

पंतप्रधानांनी २० कलमी कार्यक्रम घोषित केल्यापासून प. बंगाल, तामिळनाड, महाराष्ट्र अशा १२ राज्यांनी आणि ४ केंद्रशासित प्रदेशांनी 'कर्जमुक्ती आदेश' काढून पंतप्रधानांच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू केली आहे. ती देशभरच्या सर्व राज्यांतून एका सूत्राप्रमाणे, विवक्षित पद्धतीने व्हावी या दृष्टीने या आदेश–हुकुमात एकसूत्रीपणा आणण्याचा केंद्रशासनाने प्रयत्न करायला हवा. नाही तर २० कलमी कार्यक्रमाचा प्रभाव देशभर कमीअधिक प्रमाणात पडेल–व ती विषमता घातक ठरेल. महाराष्ट्र शासनाने दि. २२ ऑगस्ट १९७५ रोजी जारी केलेल्या कर्जविमोचन वटहुकुमाच्या अंमलबजावणीस तात्पुरती मनाई करणारा निर्णय २९ ऑक्टोबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिला ही गोष्ट या संदर्भात लक्षात घ्यायला हवी. शिवाय फक्त सावकारी नष्ट झाली आणि ग्रामीण जनतेची विविध प्रकारच्या कर्जाची गरज भागविणारी पर्यायी सांस्थिक व्यवस्था उभी राहिली नाही तर अनधिकृत व अवैध सावकारीला पुन्हा जोरदार चालना मिळेल आणि मग ती हुडकून काढणेही कठीण होऊन बसेल. त्या दृष्टीने व्यापारी बँका, सहकारी बँका आणि नव्याने निर्माण होत असलेल्या ग्रामीण बँका कशी पावले उचलतात यावर ग्रामीण कर्जविमोचन कार्यक्रमाचे यश अवलंबून आहे असे म्हटले तर ते वावगे ठरू नये.

## २ : कमाल जमीनधारणेवर मर्यादा

भारतातील कृषिउत्पादनावर मर्यादा घालणारे आणि भू-सेवकांना भूदास बनवून त्यांची ससेहोलपट करणारे दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे भूधारणेतील विषमता हे आहे. जमीनदारी, मालगुजारी, खोती अशा विविध संस्थांनी ही विषमता आजवर पोसली. त्या संस्था कायद्याने रद्दबातल झाल्या, जमीनधारणेवर तांत्रिक मर्यादा आल्या तरी भूधारणेतील विषमता अजूनही संपलेली नाही. राज्यसरकारांनी हा प्रश्न आजवर मनापासून धसाला लावलेला नाही. याची कारणे अनेक आहेत. वीस कलमी कार्यक्रमाने कमाल-जमीनधारणाविषयक कायद्यांची त्वरित अंमलबजावणी व्हावी, ज्यादा जमिनींचे भूहीनात जलदीने वाटप व्हावे, त्या दृष्टीने भूधारणाविषयक कागदपत्रे नव्याने तयार व्हावीत असे आदेश दिले. १९ ऑगस्ट १९७५ रोजी विविध राज्यांतील मुख्य मंत्र्यांनी १९७८ सालाच्या जूनअखेर हा कार्यक्रम आपापल्या राज्यांत पूर्णतया अंमलात आलेला दिसेल असे आश्वासन केंद्रसरकारला दिले आहे.

जमीनधारणेवर कमाल मर्यादा घालणारे कायदे १९६०–६१ सालापासून बहुशः सर्व राज्यांत संमत झालेले आहेत; पण या कायद्यांची पोटतिडिकेने अंमलबजावणी कुठल्याच राज्यात गेल्या १५ वर्षांत झाली नाही. मोठ्या जमीनधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रानुसार या देशात फक्त ९ लक्ष ६४ हजार हेक्टर जमीन जादा आहे असे दिसते; पण ही जमीनही सरकारने ताब्यात घेण्याबाबत जे कोर्टदरबार उभे राहिले त्यामुळे आजवर ४ लक्ष ६४ हजार १ शे ७६ हेक्टर एवढीच जमीन राज्यशासने ताब्यात घेऊ शकली आणि तिचे वाटप होऊ शकले. एक तर जादा जमिनीचे जमीनदारांनी सादर केलेले आकडे विश्वासार्ह नाहीत. कोर्टदरबारामुळे, मिरासदारांच्या राजकीय वजनामुळे जमिनीचा ताबा घेणे अडखळते. लँडरेकॉर्ड्स्मधील घोटाळ्यामुळे वाटपही थंडावते. हे सारे थांबवण्याचा प्रयत्न केंद्रशासनाच्या वरील आदेशात आहे.

वीस कलमी कार्यक्रम जाहीर झाल्यापासून आसाम, आंध्रप्रदेश, जम्मू–काश्मीर, पंजाब, उत्तरप्रदेश, सिक्किम या राज्यांची पावले जलद पडू लागल्याचे आढळून आले आहे. जागतिक बँकेने या देशातील जमीनसुधारणाविषयक अभ्यासात व्यक्त केलेले विचार या दृष्टीने मननीय आहेत. 'कसणुकीची शाश्वती आणि जमीनधारणेवरील मर्यादा यासंबंधीचे कायदे भारतात अंशतः बजावले जातात याचे कारण अनेक राज्यांतील विधानसभा अशा सुधारणा अंमलात आणण्याबाबत फारशा उत्सुक नाहीत ही गोष्ट सर्वज्ञात आहे. कमाल जमीनधारणा प्रत्यक्षात उतरली तरी, भूहीनांना अगर छोट्या शेतकऱ्यांना–दोन्ही वर्गांना नव्हे–पुरेशी जमीन कसणुकीसाठी उपलब्ध होऊ शकेल. याचा अर्थ जमीनवाटपाला पुरेसा वाव आहे. भारतातील छोट्या शेतांचे उत्पादन प्रतिहेक्टरी जास्त आहे ही गोष्ट लक्षात घेता, जमीनवाटपामुळे कृषिउत्पादन वाढण्याची शक्यता आहे हे उघड आहे. छोट्या शेतकऱ्यांना रास्त दराने कर्ज मिळणे, त्यांच्या उत्पादित मालाला बाजारपेठ मिळणे, खंडकऱ्यांना कसणुकीची शाश्वती मिळणे या गोष्टी मात्र व्हायला हव्यात. शिवाय जमीनवाटपामुळे उत्पन्नातील समता निर्माण करणेही सोपे जाईल!'

रिझर्व्ह बँकेने छोट्या शेतकऱ्यांचा जो अभ्यास अलीकडे केला त्यातही हा मुद्दा ठासून मांडला आहे. योग्य सुविधा व मदत मिळाल्यास मोठ्या जमीनदारांपेक्षा छोटे शेतकरी उत्पादनवाढ अधिक साधतात. शासनाने त्यांना मदत करण्यात 'माणुसकी', 'कणव' असा भाग नसून उत्पादनवाढ होते ही गोष्ट महत्त्वाची आहे. त्या दृष्टीने छोटी शेते जोपासणे अगत्याचे आहे.

जमिनीची मालकी, कसणुकीची शाश्वती, खंडकऱ्याचे हक्क या दृष्टीने जमीनविषयक नोंदी योग्य आणि अद्ययावत हव्यात यात शंका नाही. लँडरेकॉर्ड प्रामाणिकपणे ठेवलेले असेल तर बँकांना अगर इतर पतसंस्थांना शेतकऱ्यांची गरज आणि पतधारणक्षमता ठरविणे सोपे जाईल आणि ग्रामीण जनतेला हवी ती कर्जे योग्य वेळी, वेळेवारी मिळण्याची सोय झाल्याने खाजगी सावकारी आपोआपच संपुष्टात येईल.

महाराष्ट्रराज्य हे अनेक सुधारणांबाबत नेहमीच आघाडीवर असते असा त्याचा लौकिक आहे. कमाल जमीनधारणाविषयक कायदे १९६२ पासून अंमलात आणल्यापासून त्या राज्याने केलेल्या प्रगतीचे आकडे पाहिले की इतर राज्यांत काय परिस्थिती असेल याचे गणित मनाशी मांडता यावे–

३१ मार्च १९७५ पर्यंत झालेल्या प्रगतीचे हे आकडे शासनाने जाहीर केलेले–

| | | |
|---|---|---|
| संयुक्त भांडवली संस्थांकडील जादा जमीन | ३४०५७ | हेक्टर |
| खाजगी व्यक्तींकडील जादा जाहीर झालेली जमीन | ९४६८१ | हेक्टर |
| एकूण | १,२८६७८ | हेक्टर |

| | | |
|---|---|---|
| यांपैकी | | |
| भूमिहीनांना व इतरांना वितरित जमीन | ४५३९९ | हेक्टर |
| राज्य कृषिसंस्थेकडील खंडकऱ्यांना वितरित जमीन | २१६७ | हेक्टर |
| एकूण | ४७५६६ | हेक्टर |

८३४ हेक्टर जमिनीबाबत वितरणप्रक्रिया चालू आहे.

याचा अर्थ जाहीर झालेल्या जादा जमिनीपैकी फक्त एकतृतियांश जमीन आजवर वितरित झाली. या प्रक्रियेत अडकलेल्या उर्वरित जमिनीत पिके घेण्याबाबत अव्याहत अनागोंदी चालू असणार हे उघड आहे.

धारणाक्षेत्राची कमाल मर्यादा कमी करणारे राष्ट्रीय धोरण १९७२ साली ठरल्यावर याबाबतचे नवे विधेयक महाराष्ट्र विधानसभेने १९७२ च्या ऑगस्टमध्ये मंजूर केले. त्या विधेयकानुसार ठरलेल्या कमालधारणामर्यादा पाहा—

| | | | |
|---|---|---|---|
| बागायती जमिनीबाबत | ७·२ | हेक्टर | (१८ एकर) |
| | ते | | ते |
| | १४·४ | हेक्टर | (३६ एकर) |
| जिरायती जमिनीबाबत | २१·६ | हेक्टर | (५४ एकर) |

द्राक्षांचे मळे जिरायती जमिनीत अंतर्भूत केले होते हा त्यातील वादविषय! महाराष्ट्राच्या नव्या शासनाने या कायद्यात आणखी काही सुधारणा अलीकडे केल्या आहेत; पण भूहीन आणि छोटे शेतकरी यांना या कमालधारणेतून फारशी जमीन मिळेल असे दिसत नाही.

शासनाने सरकारी मालकीची पडित व जंगल जमीन भूहीनांना वाटण्याचे धोरण अंगिकारून ४,३८,६३९ हेक्टर जमीन १ मे १९६० ते जानेवारी ७४ या काळात भूमिहीनांना दिली आहे. यातली ७३ टक्के जमीन मागासवर्गीयांना दिली गेली. संयुक्त सहकारी शेतीसंस्था स्थापन करण्याच्या इराद्याने राज्यकृषिमहामंडळाने ताब्यात घेतलेल्या जमिनी त्या कार्यात यश न आल्याने गरीब खंडकऱ्यांना परत दिल्या जात आहेत. या धोरणात व्यवहार दिसला तरी मूळचा व्यवहार लपत नाही.

पंतप्रधानांचा वीस कलमी कार्यक्रम—राज्यांना या विविध बाबतीत मराणी लावणारा ठरत आहे ही गोष्ट आनंदाचीच म्हटली पाहिजे.

## ३ : भूहीनांना घरबांधणीसाठी जागा

वीस कलमी कार्यक्रमातील हे तिसरे कलम 'कल्याणकारी' या सदरात मोडणारे आहे. समाजातील दुर्बल घटकांना आणि भूहीनांना घराकरता जमीन पुरवण्याची घोषणा करून दिलासा देणारे. महाराष्ट्र, गुजराथ, ओरिसा या तीन राज्यांनी याबाबत जलद पावले उचलली आहेत.

भारतातील 'घरांची' समस्या गुंतागुंतीची आणि भरमसाठ पैसा मागणारी आहे. देशात घरांबाबत किती टंचाई आहे याचे आकडे उपलब्ध होणे कठीण. तरी पण १९७१ सालच्या शिरगणतीने शहरी भागात २९ लाख व ग्रामीण भागात १ कोटी १६ लाख एवढ्या घरांची म्हणजे एकूण १ कोटी ४५ लाख घरांची जरुरी आहे असे अंदाजले होते. भूमिहीनांना घरांकरता जमिनी उपलब्ध करण्याचे धोरण १९७१ सालापासून जाहीर झालेले आहे. भूहीनांच्या घरांकरता जमिनी मिळवणे, त्या विकसित करणे यासाठी लागणारा सर्व पैसा केंद्रसरकार राज्यांना पुरविते. भूहीनाला घराकरता जास्तीत जास्त १०० चौरसवार जमीन दिली जाते. ३१ मार्च १९७४ पर्यंत देशातील १५ राज्यांनी एकूण १९ कोटी ७७ लक्ष रुपयांची मदत या कार्यासाठी केंद्रशासनाकडून घेतली. ती ८,८५,५०२ घरांकरता होती. यावरून या कार्यक्रमाच्या कूर्मगतीची कल्पना यावी.

वीस कलमी कार्यक्रमामुळे त्याला गती मिळाली आहे, मिळत आहे. ग्रामीण भूहीन मजुरांना दिलासाही मिळाला आहे; पण त्यामुळे चुना, सिमेंट, विटा, साग, जंगली लाकूड, पत्रे, कौले यासारख्या घरबांधणीसाठी आवश्यक असलेल्या वस्तूंच्या किंमती वाढू लागल्या तर घरबांधणीसाठी जमीन मिळाली तरी घरे उभीच राहणार नाहीत. त्या दृष्टीने भूहीनांच्या घरांसाठी, शासनाने जमिनीप्रमाणेच वरील प्रकारचे बांधणीसाहित्य रास्त-दराने उपलब्ध करून देणे अगत्याचे आहे. भूहीनांच्या घरांसाठी बँकांनी, सहकारी संस्थांनी, ग्रामीण बँकांनी रास्त दराने कर्जे पुरविली पाहिजेत. शासनाने अनुदान स्वरूपात काही वाटा उचलला पाहिजे.

वीस कलमी कार्यक्रम जाहीर होण्याआधीच महाराष्ट्रराज्याने याबाबतीतील आपले धोरण जाहीर केले होते. २१ फेब्रुवारी १९७५ रोजी मुख्य मंत्री ना. शंकरराव चव्हाण यांनी आपल्या आकाशवाणीवरील धोरणविषयक निवेदनात १९७५ सालच्या डिसेंबरअखेर राज्यातील सर्व भूहीन गृहहीनांना घरासाठी जागा देण्याचे जाहीर केले. शासनाने प्रसिद्ध केलेल्या आकड्याप्रमाणे जून १९७५ अखेर २·६८ लाख गृहहीन कुटुंबांना जागा देण्यात आल्या. उरलेल्या १·३७ लाख कुटुंबांना वर्षअखेर, खाजगी मालकीच्या जमिनी संपादन करून जागा दिली जाईल.

नुसत्या जागा देण्यावर न थांबता १ मार्च ते ३१ मे १९७५ या फक्त तीन महिन्यांच्या काळात महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात सरासरीने प्रत्येकी एक हजार अशी एकूण २५३३९ झोपडीवजा घरे भूमिहीनांकरता उभी केली गेली. जून १९७६ पर्यंत आणखी १ लाख घरे उभारण्याचा संकल्प शासनाने जाहीर केला आहे. प्रथम एका झोपडीसाठी १५० रु. एवढे अनुदान मिळत असे ते आता २०० रु. करण्यात आले आहे. शासनाच्या या कार्यक्रमाला स्थानिक संस्था, धर्मादायसंस्था, साखरकारखाने, उद्योगपती यांनी स्वयंस्फूर्त मदत देऊ केली. घरबांधणीसाहित्य अत्यल्प दरात उपलब्ध केले जात आहे. भूहीनांच्या घराकरता जंगली लाकूड सरकारी जंगलातून २५ पैसे घनफूट या दराने, साग ५० पैसे घ. फूट या दराने उपलब्ध केला जात आहे. कच्च्या विटा, गावठी कौले, बांधकामखात्याची रिकामी डांबरी पिंपे असा मालही खूपच कमी दराने दिला जात आहे. घरमालकाने श्रमदानाने उरलेली कसर भरून काढून आपल्या माथी 'छत' आणावे अशी अपेक्षा आहे. या कार्यक्रमासाठी विभागवार इष्टांक जाहीर करून ३ कोट ११ लक्ष रुपयांची तरतूद शासनाने या सालच्या अंदाजपत्रकात केली आहे. साखरकारखाने आपल्या कार्यक्षेत्रातील भूहीन मजुरांना ४२ हजार घरे बांधून देणार आहेत. महाराष्ट्रराज्याच्या कामाचा हा झपाटा इतर राज्यांनी अनुकरण करण्यासारखा आहे. परवा ११ तारखेला पंतप्रधानांनी ५० लक्ष भूमिहीनांना घरबांधणीसाठी जागा दिल्या आहेत असे जाहीर केले असले तरी हा आकडा अंदाजित, अपेक्षित याच सदरातला मानायला हवा! ◻

[ लेखांक दुसरा पुढील अंकी ]

# तीस जानेवारी

त्रिखंडात डंका वाजणारा
एक शास्त्रज्ञ म्हणे म्हणाला होता
पुढच्या पिढ्या विस्मयाने विचारतील
खरेच असा माणूस झाला होता ?
इसवीसनातील कोणत्या शतकातला
कुठला समाज त्याला अभिप्रेत होता माहीत नाही
पण स्वातंत्र्याच्या संधिप्रकाशात
आपला पहिलावहिला हुंकार भरणाऱ्या
आमच्या तरुण पिढीलाच पडेल हे प्रश्नचिन्ह
हे त्याच्या स्वप्नीही नसावे
खरेच सांग तुला हे कसे जमले ?
साता डोंगरांच्या पल्याडच्या दरीतील
म्हातारीचे काळीज देखील
तुझ्या उपासाने कसे गलबलले !
स्वतःच उपाशी असल्यागत
तुझ्या दुबळ्या कुडीतला निर्भय बनोचा पुकार
काळजाची दारे उघडत
सर्वत्र कसा निनादला ?
तुझ्या पाउलांना लाखोंनी कशी साथ दिली ?
तुझ्या कंठांना कोटींनी कसा आवाज दिला ?

आकाशवाणीची घरघर, दूरचित्रवाणीचा प्रकाशझोत
वार्तापत्रातला झगमगीतपणा
या साऱ्यापासून शतयोजने दूर राहूनही
कशी घातलीस मातीच्या खेळण्यावर फुंकर ?
जोपलास विनम्र तरीही उन्नत माथा
निर्मळ आणि निर्भय मन
तू कसे जागृत केलेस ?
हायड्रोजनबॉम्बपेक्षाही सहस्रपट प्रलयंकर
आणि शुभंकर असलेले,
सामान्यातील असामान्यत्वाचे हे अणुतत्त्व
तुझ्या आगेमागे मग अनेक नेसले आखूड पंचे,
बकरीचे दूध प्याले,
सूतकताई केली, उपोषणे पचवली,
सत्याग्रह पार पाडले.
कोणी गीताईचा प्रचार केला.
कोणी मौनाला बोलके केले.
पण पाऱ्याप्रमाणे सुळकन निसटणारे
जनतेचे मन पुन्हा कुणाच्याच मुठीत गवसलेच नाही.
खरेच का तू याच देशात जन्माला आलास ?
जेथे आज आमची वांझ पिढी वाढत आहे.

—डॉ. नरेंद्र दाभोळकर

# बकऱ्याची गोष्ट

वृत्तपत्रांत अलीकडे एक मोठाच स्वागतार्ह बदल झाला आहे. तुमच्या लक्षात आला का? नाही ना? आमच्या आला. वृत्तपत्रे हल्ली पशुपक्ष्यांसंबंधी विस्तृत बातम्या देतात. कुठे 'गाढवीला तिळे होते', 'सिंह आजारी असतो', 'सिंहिणीला पाच बछडे होतात; त्यातले चार बछडे दुसऱ्या दिवशी मरण पावतात', 'बैलाला शिंगेच' नसतात. पूर्वी या बातम्यांना संपादक एवढी जागा देत नसत. अलीकडेच कशी काय मिळू लागली कळत नाही. काही का असेना, सर्व पशुपक्षी याबद्दल वृत्तपत्रांच्या संपादकांचे सदैव ऋणी रहातील. काही दिवसांपूर्वी एक बातमी वाचून आम्ही थक्क झालो. बातमी होती–

'देवनार येथे तीन पायांचा बकरा!'

बकऱ्याचा फुलसाईझ फोटो आणि शिवाय अर्धा कॉलम माहिती. दुसरे काही वाचण्यासारखे नसल्याने लगेचं वाचून काढली. देवनार येथील खाटिकखान्यात आलेला हा बकरा वैशिष्ट्यपूर्ण होता. त्याला पुढील बाजूचा डावा पाय मुळी नव्हताच! जन्मापासून हा बकरा उजव्या गटातच. देवनारच्या अधिकाऱ्यांनी त्याला २६००० बकऱ्यांतून शोधून काढला म्हणे! लगेच जीवदान देऊन प्राणिसंग्रहालयात पाठवला. तीन पायांचा बकरा मारावा असे खाटकांनादेखील वाटेना. धन्य ते खाटीक!

बातमी वाचून आम्ही अस्वस्थ झालो. या बकऱ्याला तीन पायच का? तीन पायांनी जर हा जगू शकत असेल तर सर्व बकऱ्यांचा चौथा पाय हा निसर्गाचा 'वेस्ट' नाही का? हा बकरा पूर्वजन्मी कोण असावा? बकऱ्याची शेपूट अशी असते की त्याने पार्श्वभाग झाकत नाही आणि माशी हाकलता येत नाही; पण पायाचे काही तसे नाही. एका पायाच्या अभावी या बकऱ्याला किती बरे त्रास झाला असेल? त्याच्या दुःखाला वाचा कोण फोडणार? वाटलं, आपण या दुःखाला वाचा फोडली नाही तर फोडणार कोण? लिहिले पाहिजे हे दुःख!

अगदी रहावेना! म्हणून प्राणिसंग्रहालयात या बकऱ्याला भेटण्यासाठी सरळ मुंबईला गेलो.

प्राणिसंग्रहालयात शिरलो तेव्हा सायंकाळ टळली होती. प्राणिसंग्रहालयातून बालगोपाळ मंडळी आणि तिथले वाके अडवून आडवाळलेले कायमचे निरुद्योगी बाहेर पडत होते. बकरा शोधायला वेळ लागला नाही. प्राणिसंग्रहालयाचा रक्षक तेथील गर्दी हटवत होता. रेंगाळणाऱ्यांना हाकलत होता. आम्ही त्याला बाजूला घेतला.

'सगळी माणसं गेल्यानंतर मला या बकऱ्यापाशी थांबायचं आहे–'

रक्षकाने गुरकावले–'टाइम काय झाला साहेब? बाहीर जावा आता!'

निवडणुकीला कधीही उभे न राहिल्याने आम्हाला मत मागण्यासाठी चिरीमिरी देण्याचा अनुभव नव्हता; परंतु मत बदलण्यासाठी हा प्रयोग करायला हरकत नव्हती. आम्ही केवळ एक रुपयाच्या मळक्या नोटेने रक्षकाचे मत पालटवले. तो म्हणाला–

'टाइमाचं काय? रहावा की तासभर!'

हळूहळू सर्वत्र शुकशुकाट झाला. काळोखात बकरा बांधल्या जागी मख्खपणे उभा होता. जवळ जाऊन आम्ही त्याच्या अंगावर हात फिरवला. त्याच्या अंगावरचे पांढरेशुभ्र राठ केस एकदम थरथरले. त्याने मान आमच्याकडे वळवली. शेपटीचा पुंजका किंचित हलवला. आम्ही आसपासच्या लेंड्यांची पर्वा न करता त्याच्या अगदी जवळ बसलो. हळूहळू बकऱ्याची भीती पळाली. मी त्याला प्रश्नामागून प्रश्न विचारीत होतोच आणि अचानक त्याचा आवाज स्पष्टपणे ऐकू येऊ लागला. पशुजन्माला येऊन याला शब्दांचे एवढे वेड कसे, या प्रश्नाचे उत्तर त्याच्या हकिगतीतच होते. तो सांगत होता–

'मी मागच्या जन्मी लेखक होतो. १८९० च्या फेब्रुवारीत मॉस्कोच्या परिसरात माझा मानवी जन्म झाला. माझं नाव होतं बोरिस. बोरिस पास्तरनाक. मी चांगला कवी होतो; परंतु स्टॅलिनशहाच्या अम-

दानीत परिस्थिती अशी झाली की घोषणा-काव्यच सर्वोत्कृष्ट ठरू लागले ! सरकारी अधिकाऱ्यांची भुवई नाचेल तसले गाणे गात रहाणाऱ्यांची चलती होती. स्टॅलिनची बायको संशयास्पद अवस्थेत मेली तरी लेखकांनी रडले पाहिजे अशी अपेक्षा होती. मी अस्वस्थ होतो. संधी मिळाली तेव्हा १९३१ साली श्रमजीवी लेखकांच्या परिषदेत मी सांगितले– "They are always shouting at the poets. Do this ! Do that ! The time exists for man and not man for times." स्टॅलिन आणि त्याचा पक्ष येता-जाता लेखकांना उपदेश करीत– 'जनतेच्या जवळ जा !' लेखकांनी हे करण्याची गरज नव्हती म्हणून मी १९३४ साली एका लेखकांच्या परिषदेत ठणकावून सांगितले– 'The Party tells us to remain close to masses. I would say never surrender your personality. Let us keep our distance so that we may remain faithful to our springs of poetry' स्टॅलिनशहाला माझी मते आवडत नसत. मग स्टॅलिनचे शुद्धीकरण सुरू झाले. शिरकाणे होत होती. या शिरकाणाला पाठिंबा देणाऱ्या पत्रकावर सही मागण्यासाठी काही सरकारी लेखकमंडळी आली. मी नकार दिला. कोणाही निरपराध्याचा तुरुंगवास अथवा देहांत मला मान्य नव्हता. क्रोधाने आंधळ्या झालेल्या राज्यकर्त्यांनी मला 'डुक्कर', 'सर्प' अशा शिव्या दिल्या. मी 'देशद्रोही' ठरलो. सरकारच्या कच्छपी असलेल्या वृत्तपत्रांतून माझी अखंड निंदा सुरू झाली. मी हा छळ धैर्याने सोसू लागलो. प्रतिभा, पांडित्य, व्यासंग आणि विचारस्वातंत्र्य या चार पायांच्या आधारावर लेखकाने जगायचे असते. राज्यकर्त्यांना प्रतिभा, पांडित्य, व्यासंग हे तीनच पाय मंजूर होते. चौथा पाय त्यांनी सत्तेच्या बळावर तोडून टाकला. मी वृद्ध होत होतो. माझ्या कादंबरीला नोबेलपारितोषिक मिळाले ते चांडाळ राज्यकर्त्यांनी मला स्वीकारू दिले नाही. अखेर मी माणूस होतो. मरण पत्करण्याचे मायकोव्हस्कीचे धैर्य अंगी नव्हते. म्हणून मेंढरासारखा तीन पायांनी जगत राहिलो... '

बराच वेळ तो तीन पायांचा बकरा रडत होता. हळूहळू मी त्याला कुरवाळून सावरला. तो पुढे म्हणाला–

'मरणानंतर स्वर्गात गेलो. माझा निवाडा परमेश्वराने केला. मला पुढचा जन्म बकऱ्याचा द्यावा आणि एक पाय कमी द्यावा असे ठरले. जन्माला कुठे येणार हे अज्ञात होते. अजूनही मला ते ठाऊक नाही!'

आम्ही त्याचे सांत्वन करीत सांगितले–

'तुम्ही भारतात जन्माला आलात हे केवढे भाग्य होय ! इथे तीन पायांचे बकरे मारीत नाहीत. चार पायांचे मारतात. इथले खाटीक सुसंस्कृत आहेत. त्यांनी तुम्हाला जिवंत सोडले की नाही ? आता इथे सुखाने जगा ! प्रदर्शनीय वस्तू म्हणून तुमचे मूल्य फार मोठे आहे !'

प्राणिसंग्रहालय सोडताना आम्ही फार कष्टी होतो. पास्तरनाकसारख्या महान लेखकाचा तीन पायांचा बकरा व्हावा याचा खेद होता; परंतु या महान कादंबरीकारानेच मरणपूर्व एका पत्रात लिहिले होते–

'Every where in the world one has to pay for the right to live on one's own naked spiritual reserves.'

जीवन संपूर्णपणे स्वीकारावे. दुष्ट शक्ती जीवनाचाच भाग असतात म्हणून त्याही स्वीकाराव्या हे शेळ्यामेंढ्यांचे तत्त्वज्ञान मोठमोठ्या लेखकांनाही जिवंत रहाण्यास उपयोगी पडते हा या इसापनीतीचा अर्थ आम्हाला समजला ! पार्श्वभाग उघडा पडला तरी चालेल. अंगावर माश्या घोंगावल्या तरी चालेल; पण जीवनाचे तत्त्वज्ञान या बकऱ्यासारखे असावे हे उत्तम !

---

**सप्रेम नमस्कार....**

## जोगतिणींचे जग

▫ 'साप्ताहिक माणूस'मध्ये, ३ जानेवारीच्या अंकात प्रा. सुहास जोशींचं माझ्या लेखावरचं पत्र आलंय, त्याबाबत हा खुलासा.

डॉ. आढाव व डॉ. लिमये एकाच दिवशी निपाणीत आले होते. त्यांची–माझी भेट प्रा. जोशींच्याच घरी झाली. तेव्हा कॉलेजमधील काही विद्यार्थी जमवून एक मीटिंग घेण्यात आली होती. मीटिंग 'युक्रांद'तर्फे. तेव्हा डॉ. लिमये मुलांना काय सांगतात ते सांगू देत, तोवर आपण खाली जाऊन बसू, असे म्हणून डॉ. आढावांनी आम्हास माडीवरून खाली आणले, त्यात प्रा. जोशीही होतेच. त्या वेळी डॉ. आढावांच्या पुढेच एक कार्यकर्ते म्हणत होते, 'आम्ही गावभर फिरून मरमर मरून मुले जमा करायची व उद्या नाव मात्र ह्यांचं (म्हणजे 'युक्रांद'चं) येणार !' प्रा. जोशीही समोरच होते. त्यांनीही हे उद्‍गार ऐकले आहेत; पण त्याचे सोइस्कर विस्मरण होऊन 'अगा जे घडलेचि नाही' अशा थाटात 'माणूस'मध्ये पत्र लिहिलं आहे ! युक्रांद व प्रजासमाजवादी पक्ष ह्यांच्यात काही वैचारिक मतभेद असतीलही; पण एकाच प्रश्नावर चळवळ उभी करण्यासाठी दोन संघटना एकत्र आल्या म्हणजे संघटनांच्या नावापेक्षा त्या चळवळीला महत्त्व असावे; पण वरील उद्‍गारात ह्याच्या उलट जाणविल्याने त्या शब्दांची मी नोंद केली. तर ते निखालस खोटे शब्द नव्हेत, पूर्णतः सत्य आहेत ! प्रत्येक गोष्टीचे प्रा. जोशींना विस्मरण इतके होत असेल तर त्या कार्यकर्त्यांचेही नाव सांगू शकेन मी !'

खाली आल्यावर आम्ही डॉ. आढावांचेबरोबर गप्पा मारीत बसलो. नुकतीच, 'वर आभाळ खाली धरती' या जोगतिणींच्या जीवनावर मी लिहिलेल्या कादंबरीची एक प्रत भेटीदाखल त्यांना दिली होती, ती हातात खेळवीत त्यांनी मला विचारले, 'जोगते म्हणून सोडलेले लोक खरोखरच नपुंसक असतात की काही ऑपरेशन वगैरे करवून घेऊन नपुंसक होतात ?' ह्या वेळी

प्रा. जोशी पाहुण्यांच्या सरबराईच्या पूर्व-तयारीसाठी आतमध्ये गेलेले होते. तेव्हा वरील उद्गारातील सत्यता प्रत्यक्ष डॉ. आढावांना विचारून त्यांनी करून घ्यावी ! काही वेळाने 'युक्रांद'ची मीटिंग संपल्यावर मुलांसमोर दोन शब्द बोलण्याची विनंती डॉ. आढावांना करण्यात आली.त्यांनी ती मान्य केल्यावर मग आम्ही सारेच माडी-वर गेलो. आपल्या भाषणात डॉ. आढाव म्हणाले की, 'प्रत्येक पौर्णिमेस यल्लम्माच्या डोंगरावर यात्रा भरते.' मी मध्येच व्यत्यय आणून त्यांच्या चुकीच्या माहितीचा निर्देश केला आणि वस्तुस्थिती सांगितली. भाषण चालू असताना प्रा. जोशी अधेमधे एक-दोन मिनिटे वर येत आणि बराच वेळ खाली जात; त्यामुळे भाषणातला हा 'व्यत्यय' त्यांना ठाऊक नसल्यास खुद्द डॉ. आढावांनाच विचारून खात्री करून घ्यावी ! ह्याच भाषणात डॉ. आढावांनी यात्रेच्या दिवशी यल्लम्माच्या डोंगरावर वा सौंदत्ती बसस्टँडवर निदर्शने करण्याचा प्रस्ताव मांडला होता. 'सत्यशोधक'मध्ये प्रा. जोशींचे ते पत्र प्रसिद्ध झाल्यानंतर डॉ. आढावांचे वरील वक्तव्य झाले; म्हणून त्याची मी दखल घेतली. कार्यकर्त्यांपेक्षा नेत्याच्या उद्गाराला जास्त महत्त्व असते, नाही का ?

प्रा. जोशींनी आपल्या पत्रात काही शाब्दिक कसरतीही केल्या आहेत, माझ्या लेखातील वाक्यांचे अर्थ समजावून न घेताच ! प्रजासमाजवादी पुढारी व कार्यकर्ते वास्तव परिस्थिती बदलण्यासाठी ज्या चळवळी करतात, त्या बहुधा चुकीच्या मार्गावरून जातात. त्यामुळे वास्तव परिस्थिती तर बदलत नाहीच, उलट नुकसान मात्र त्यांचे व पर्यायाने त्यांच्याच पक्षाचे होते, असे म्हणायचे आहे मला. पूर्णतः डोके शांत ठेवून माझ्या लेखाच्या शेवटी जी टीप दिलीय्, तिचा शेवटचा परिच्छेद वाचण्याची प्रा. जोशींनी तसदी घेतली तर त्या वाक्या-वरून (ते समजतात त्याप्रमाणे) प्रजासमाज-वादी पक्षातील नेत्यांच्या व्यवहारी वा अव्यवहारी वागण्याचा निर्देश होत नसून चळवळीच्या चुकीच्या मार्गाचे सूचन होते आणि म्हणूनच 'आज डॉ. बाबा आढाव व डॉ. अरुण लिमयेंच्यासारखी अव्यवहारी माणसे तुरुंगात जात आहेत म्हणून महादेव मोरे लिहू तरी शकतात !' ह्या प्रा.जोशींच्या वाक्याची गंमत वाटते ! वरील नेते तुरुंगा-बाहेर होते तेव्हा महादेव मोरे का लिहीत नव्हते ? कुणी नेते तुरुंगात गेले म्हणून महादेव मोरे लिहू शकतात, हा विनोदी जावईशोध लावून जोशींनी माझ्यासारख्यांची घटकाभर करमणूक मात्र केलीय् ! 'डॉ. आढावांची चळवळ चुकीच्या दिशेने चालली असेल तर योग्य दिशेने श्री. मोरेंनी चळवळ उभी करावी,' असे प्रा. जोशी लिहितात, त्यावरून त्यांचे बौद्धिक 'रिकामे'-पणही जाणवते !

वास्तविक मोरेंना चळवळ करणे वा चळवळीत भाग घेणे हे काही नवे नाही, हे जोशींना ज्ञात नसले तरी मोरेंच्या पिढीतील लोकांना नक्कीच ज्ञात आहे ! संयुक्त महा-राष्ट्राच्या चळवळीत व सत्याग्रहात मोरेंनी काय कार्य केले आहे, ते तेव्हाचे विद्यार्थी-संघटनेचे अध्यक्ष श्री. राम फडतरे व नेते अप्पा जाधवही सांगू शकतील ! नुकतीच राजकारणातील व समाजकारणातील धुळा-क्षरे गिरवू लागलेल्या जोशींसारख्यांनी ती अक्षरे तपापूर्वीच गिरवून बसलेल्यांना 'मग तुम्हीच चळवळ उभी करा,' असे मानभावी सल्ले देऊ नयेत; त्याचबरोबर हेही लक्षात ठेवावे की, काठावर बसलेलाही कधी तरी सागरात उतरून चार-दोन हात मारलेला असतो ! काठावरचे सारेच काही प्रेक्षक नस-तात ! 'झुलवा ठेवून घेतलेल्या सुदैवी स्त्रिया किती असतात ?' असा प्रश्न जोशी विचारतात. (जोशीबुवा, 'झुलवा ठेवून' घेतलेल्या नव्हे, तर 'झुलवा लावून' घेत-लेल्या) तर जोशीबुवा, खुद्द निपाणीतील वखारीतूनच थोडा फेरफटका मारा, म्हणजे झुलवा लावून घेऊन सुखाने संसार करणाऱ्या किती तरी स्त्रिया तुम्हाला आढळतील ! वेश्या होण्यामागं घरचं दारिद्र्य हेच प्रमुख कारण असतं, जोशी मानतात तसं, जोगतीण म्हणून सोडणं, हे नव्हे ! माझ्या लेखात वर्णन केल्यापेक्षा कसली व काय वेगळी स्थिती आहे व ह्या प्रश्नाचे पूर्णपणे काय वेगळे स्वरूप आहे हे जोशींनी एकदा सांगावे तरी ! नुस-तीच पोकळ व मोघम विधाने करून स्वतःच्या अज्ञानावर पांघरूण घालू नये ! 'केवळ रेणुकेलाच मुली सोडतात, हा मोरेंचा समज आहे,' हे विधान तरी जोशी कसे करतात ? 'जोगतिणींचे जग' हे लेखाचे शीर्षक आहे. त्यासंबंधीच त्यात येणार. इतर देवतांना सोडलेल्या मुलींचे प्रश्न हा लेखाचा विषय नाही, नपेक्षा ह्याबाबत मीच जोशींना आणखी बरीच माहिती पुरवून खऱ्या अर्थी शहाणे करून सोडू शकेन !! शिवाय जोशीं-सारखे पुस्तकी विद्वान बोलतात-लिहितात त्याप्रमाणे रेणुकेला सोडलेल्या मुलींना 'देवदासी म्हणत नाहीत, तर 'जोगतिणी' म्हणतात ! 'देवदासी' कुणाला म्हणतात हे जाणून घ्यायचे असेल तर त्यांनी कोकणात वा गोव्यात फेरफटका मारावा !! उद्या हे विद्वान खंडोबाच्या 'मुलीं'चाही 'देवदासी' म्हणूनच उल्लेख करणार !! गडहिंग्लज-जवळच संकेश्वर व निपाणी ही शहरं आहेत, त्यातील कितीशा लोकांना 'देवदासी परि-षदे'संबंधी माहिती आहे, ह्याची एकदा जोशींनी खातरजमा करून घ्यावी व मगच परिषदेच्या यशस्वितेचे ढोल वाजवावेत ! 'टाइम्स', 'दिनमान'ने दखल घेतली म्हणून जोशीबुवा सांगतात, नि अजाणता 'सारी चळवळ पेपरातून' ह्या माझ्या विधानाला उलट पुष्टी देतात ! जोवर दारिद्र्य आहे तोवर कोवळ्या, अजाण मुलींची वेश्याव्यव-सायाला अशीच पुरवणी होत राहणार ! देवदासी प्रथा बंद पाडून आपण फार तर एक आभास निर्माण केल्यागत होईल; पण त्यामुळं परिणामाचं मूळ' वा 'परिणाम' नाहीसा होत नाही ! दारिद्र्य हे 'मूळ' व वेश्याव्यवसायाचं टोक गाठणं हा 'परिणाम', ह्या दोहोमध्ये देवदासीप्रथेची रूढी येते. ही रूढी नाहीशी करा वा चालू द्या, समाजातील दारिद्र्यात व वेश्याव्यवसायात असा काय व कितीसा फरक पडणार आहे ? वास्तविक, डॉ. आढाव व डॉ. लिमये यांच्या चळवळीवर टीका करण्यासाठी 'माणूस'मधील लेखाचा प्रपंच केला नाही; त्यांच्या विचारांशी समान नसली तरी समांतर भूमिका मी घेतलीय्, हे लेखाच्या शेवटच्या परिच्छेदावरूनही स्पष्ट व्हावे. तर जोशीबुवा, डॉ. आढावांची चळवळ योग्यच आहे; पण ती ज्या मार्गाने चाललीय त्याबद्दलच मी मतभेद दर्शविला आहे एकूण चळवळीबद्दल नव्हे, हे लक्षात घ्या !

—महादेव मोरे, निपाणी
(जि. बेळगाव)



कपडे म्हणजे
शरीराची शान
ही शान
दिवसभर...
दिवसें दिवस
कायम रहावी
शान
शरीराची?
व्यर्थ बडबड
फुकाची!
कपड्यांच्या टिकाऊ
डौलदारपणासाठी
'टेबिलाइज्ड' छाप बघून घ्य
टेबिलाइज्ड कापड म्हणजे प्रमाणित सुरकुतीरहित कापड. म्हणूनच ते चुरगळलेले दिसत नाही किंवा त्याला चुण्याही पडत नाहीत. अर्थात् त्याचा डौलदारपणा सर्वत्र, सर्वदा कायम रहातो.
जगप्रसिद्ध 'टेबिलाइज्ड'चा विश्वसनीय छाप आपण आपल्या पसंतीच्या सर्व कापडांवर बघाल.
अरविंद, बॉम्बे डाइंग, डी.सी.एम; मफतला श्री अंबिका, टाटा आणि ठाकरसी सारख्या प्रख्यात भारतीय मिल्समध्ये बनवलेले काप 'टेबिलाइज्ड' छापाचे असते. प्रत्येक मिटर 'TEBILIZED' हा छाप पाहूनच कापड खरेदी करा.
TESTED CREASE RESISTANCE
TEBILIZED®
MINIMUM IRONING • DURABLE GOOD LOOKS
TEBILIZED® कापड
दीर्घ काळपर्यंत डौलदार दिसणारे.
प्रमाणित सुरकुती-रहित कापड.
ट्रेडमार्कचे मालक :
मेटूर बियर्डसेल लि., पो. ओ. बॉक्स नं. ७, मद्रास ६०० ००१

# अध्यक्षीय लोकशाही

## भारतात जरूर आहे का ?

वा. दा. रानडे

भारतीय प्रजासत्ताकास येत्या २६ जानेवारीस २६ वर्षे पूर्ण होत आहेत. सव्वीस जानेवारीस भारताच्या इतिहासात दोन दृष्टींनी महत्त्व आहे. काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय लाहोर काँग्रेसमध्ये १९२९ साली घोषित केल्यानंतर देशात पहिला स्वातंत्र्य-दिन या दिवशी पाळण्यात आला आणि स्वातंत्र्य मिळेपर्यंत दरवर्षी पाळला जाऊ लागला. स्वातंत्र्यानंतर भारतीय प्रजासत्ताकाची घटना २६ जानेवारी १९५० ला अंमलात आली व तो दिवस प्रजासत्ताक-दिन म्हणून पाळण्यात येऊ लागला.

प्रजासत्ताकाच्या घटनेत गेल्या २६ वर्षांत बऱ्याच दुरुस्त्या झाल्या; पण घटनेच्या मूळ-गाभ्याला किंवा चौकटीला धक्का लावण्यात आला नाही. संसदीय लोकशाही हे आपल्या घटनेचे मुख्य अधिष्ठान आहे; पण घटनेची ही मूळ चौकट बदलून या देशात फ्रान्सच्या धर्तीची अध्यक्षीय लोकशाही आणावी अशी सूचना काही गोटातून करण्यात येत आहे. ' आपल्या घटनेवर नवा दृष्टिक्षेप : काही सूचना ' या शीर्षकाचा एक मसुदा राजधानीत प्रसृत करण्यात आला असून त्यावर चर्चा होत आहे. चंडीगडला काँग्रेस-अधिवेशनापूर्वी झालेल्या वकिलांच्या परिषदेत पंजाबचे अॅडव्होकेटजनरल जोगिंदरसिंग यांनी सत्तारूढपक्ष सध्याची सबंध घटना रद्द करून संसदीय पद्धतीऐवजी अध्यक्षीय पद्धत आणणार असल्याच्या बातम्यांचा उल्लेख केला. तेव्हा केंद्रीय कायदेमंत्री हरिभाऊ गोखले म्हणाले, ' मी या विषयासंबंधी काही कागदपत्रे पाहिली आहेत. या बातम्या खोडसाळ आहेत. ' काँग्रेस नेत्यांपैकी कोणीही या प्रश्नावर अधिकृतपणे मतप्रदर्शन केलेले नाही. घटनेत बदल करण्याची संदिग्ध भाषा बोलली जात आहे; पण हे बदल कोणत्या स्वरूपाचे असतील यासंबंधी निश्चित भूमिका काँग्रेस पक्षानेही अजून घेतलेली नाही. तसे करण्यापूर्वी या प्रश्नावर पक्षात आणखी चर्चा व्हावी असेही काँग्रेसनेत्यांना वाटत असेल. घटनेत ' मोठा बदल ' केवळ कायदेपंडितांच्या सल्ल्याने केला जाणार नाही, लोकांना आपले मत व्यक्त करण्याची संधी मिळेल असे पंतप्रधानांनी चंडीगडला सांगितले. यावरून घटनेत मोठे बदल करण्याचे घाटत आहे हे सूचित होते.

संसदीय लोकशाहीऐवजी अध्यक्षीय लोकशाही भारताने स्वीकारणे हा मोठाच बदल म्हणावा लागेल. असा बदल करणे कितपत योग्य होईल ? तो आवश्यक आहे का ? १९६७ च्या निवडणुकीनंतर काही राज्यांत अस्थिर सरकारे निर्माण झाली. काँग्रेसमधील फुटीनंतर केंद्रातही सत्तारूढ काँग्रेसमागे हुकमी बहुमत राहिले नाही; पण कम्युनिस्ट, द्र. मु. क. व इतर काही गटांच्या पाठिंब्याने सरकार टिकून राहिले. ही अस्थिरता टाळण्यासाठी आपल्या देशात अध्यक्षीय लोकशाही आणावी अशी सूचना त्या वेळीही काही गोटांतून पुढे आली होती; पण १९७१ व १९७२ च्या निवडणुकांत इंदिरा-लाटेच्या प्रभावाखाली काँग्रेसने प्रचंड बहुमत मिळविल्याने सध्याचीच पद्धती ठीक असे वाटू लागले आणि अध्यक्षीय लोकशाहीची सूचना मागे पडली. आता ती पुनः पुढे आली आहे.

अध्यक्षीय लोकशाहीचा पुरस्कार करणारांना भारतात त्याची आवश्यकता का वाटत आहे ? आगामी निवडणुकांत— त्या केव्हा होतील तेव्हा होवोत— काँग्रेसला निर्णायक बहुमत मिळेलच अशी त्यांना खात्री वाटत नसावी. पंतप्रधानांचे व त्यांच्या मंत्रिमंडळाचे स्थान पार्लमेंटमधील बहुमताच्या पाठिंब्यावर अवलंबून असते. हा पाठिंबा डळमळीत झाल्यावर मंत्रिमंडळ अस्थिर बनेल. आपला कार्यक्रम ते ठामपणाने व निर्धाराने अंमलात आणू शकणार नाही. आपले बहुमत टिकविण्यासाठी कारवाया करण्यातच त्याचा बराचसा वेळ जाईल. ही अस्थिरता टाळण्यासाठी सध्याच्या संसदीय लोकशाहीऐवजी अध्यक्षीय लोकशाही आणावी असे या लोकांना वाटते. अध्यक्षीय लोकशाहीत अध्यक्ष सबंध देशातील मतदारांनी निवडून दिलेला असतो. त्याचे व त्याच्या सरकारचे स्थान पार्लमेंटमधील बहुमताच्या पाठिंब्यावर अवलंबून नसते. आपल्या अध्यक्षपदाच्या मुदतीत आपला नियोजित कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी भरपूर अधिकार त्याला असतात. या पद्धतीने देशाला स्थैर्य लाभेल व अधिक जलद प्रगती होईल असे या पद्धतीच्या पुरस्कर्त्यांचे म्हणणे आहे. बांगला देशाचे अध्यक्ष शेख मुजीबुर रहमान यांनी याच उद्देशाने तेथे अध्यक्षीय लोकशाही आणली होती; पण हा प्रयोग यशस्वी झाला नाही. तेथे कोणत्याच प्रकारची लोकशाही न राहता अखेर लष्करी हुकूमशाही प्रस्थापित झाली. अध्यक्षीय लोकशाहीत अध्यक्षांच्या हाती अमाप सत्ता असते; पण एखादा अध्यक्ष या अमाप सत्तेचा दुरुपयोग करण्याचाही संभव असतो. अमेरिकेच्या अध्यक्षीय लोकशाहीतील याचे ठळक उदाहरण म्हणजे निक्सनचे वॉटरग्रेट-प्रकरण. या प्रकरणातून अमेरिका तरली. निक्सनना अधिकारपद सोडावे लागले हे खरे; पण या पद्धतीतील दोष काही त्यामुळे लपत नाहीत.

अध्यक्षीय लोकशाहीबद्दल माझेही एका काळी अनुकूल मत होते; पण अधिक खोल विचार केल्यावर मला असे वाटू लागले आहे की दोष पद्धतीमध्ये नसून ती राबविणाऱ्या व्यक्तींमध्ये आहेत. पद्धती कितीही चांगली असली तरी ती राबविणाऱ्या व्यक्ती चांगल्या नसतील तर त्या पद्धतीचा बोजवारा वाजायला वेळ लागत नाही. संसदीय लोकशाही व अध्यक्षीय लोकशाहीच्या प्रयोगांकडे या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. संसदीय लोकशाही ब्रिटिशांचा आदर्श पुढे ठेवून आपण स्वीकारली; पण गेल्या सव्वीस वर्षांचा अनुभव काय सांगतो ? ही पद्धती आपल्याकडे यशस्वी झाली आहे का ? ही पद्धती आपण राबविली. सव्वीस वर्षांत पाच निवडणुका शांतपणे पार पडल्या. शेजारच्या देशात लष्करी राजवटी आल्या, तसे आपल्याकडे घडले नाही हे खरे; पण तेवढ्या मर्यादित अर्थानेच आपली संसदीय लोकशाही यशस्वी झालेली आहे. संसदीय लोकशाहीचाच नव्हे तर कोणत्याही लोकशाहीचा खरा आधार म्हणजे कोणत्याही दडपणाशिवाय झालेल्या

# सोलकढी

## □ विनुशासन-पर्व

पंचवीस वर्षांमागे या देशात फार्फार मोठाल्या गोष्टी झाल्या आहेत. विसावे शतक अर्धे संपले; अर्धे उरले. भारत चक्क प्रजासत्ताक झाला. अनेक नाट्यसंस्था निघाल्या. मी वयात येण्यापूर्वीच्या वयात आलो. मुख्य म्हणजे, 'मातीहुन तुम्ही माती असुनी। हिमालयाहुन भव्य तुम्ही। स्थिरमेरूचे पूत तुम्ही हो। नवपवनाचे दूत तुम्ही।' असे एका कवीने ज्या संतशिरोमणी विनोबा भावे यांचे वर्णन केले त्यांनी भूदानाची क्रांतिगर्भ चळवळ सुरू केली......गेल्या महिन्यात भूदान-चळवळीचा रौप्यमहोत्सव पौनार येथे मोठ्या धामधुमीने साजरा करण्यात आला. त्याआधी वर्षभर विनोबांनी मौन धारण केले होते. पुढे आणीबाणी जारी झाली. मागे मौन, पुढे मौन, मध्ये आणीबाणी. त्यामुळे विनोबांची वाणी काय सांगते याकडे सगळी मंडळी आपले दोन्ही कान लावून बसली होती.

विनोबांना आपण भूदानोबा का म्हणायचे नाही ?

आणि 'पौनार'ला 'मौनार ?'

विनोबांनी आपल्या अमृततुल्य वाणीने ऐकणाऱ्यांच्या कानांना अपेक्षित संतोष दिला. तोंड उघडण्यासाठी ओठ विलग होत असतानाच त्यांनी निखालसपणे सांगितले की, पूर्वाचार्यांच्या आदेशाविरुद्ध आजचे शासन काही करील असे आपणास वाटत नसल्याने सत्याग्रहाची आज आवश्यकता नाही. (भली खोड, मोडली. काही वाटाण्याहरभऱ्याशेंगदाण्याफुटाण्यांना असे वाटायचे की गांधीजींचे सत्शिष्य विनोबा सत्याग्रहाची आवश्यकता नाही, असे केव्हाही म्हणणार नाहीत.) पुढे कोणाच्या तरी प्रश्नावरून 'आचार्य' म्हणजे कुलगुरूंसारख्या व्यक्ती, असेही विनोबांनी स्पष्ट केले. (म्हणजे टोपे, गजेंद्रगडकर, आपटे, महाजनी, दाभोळकर, नाथ, खरात यांच्यासारखे शिक्षणशहामृग. आता तरी 'महाराष्ट्र टाइम्स'च्या त्या गोविंदराव तळवलकरांना त्यांचे–म्हणजे त्या व्यक्तींचे, स्वतःचे नव्हे–माहात्म्य कळावे.)......देशातले दारिद्र्य आणि बेकारी हटवण्यासाठी व खेडी स्वयंपूर्ण होण्यासाठी त्यांनी एक पंचसूत्री कार्यक्रम पुढे ठेवला. १. कुटुंब-नियोजन २. मांसाशनत्याग ३. खादी व ग्रामोद्योग ४. अस्पृश्यताबंदी ५. दारूबंदी. यामुळे सगळ्या देशभर समाधानाचे बारमास पीक काढता येईल, असा विनोबाजींचा विश्वास आहे.

याशिवाय आणखी किती तरी सूचक संदेश विनोबांनी दिले : आचार व विचार यांचा समन्वय हवा; तकलीसे तकलीफ मिटाओ; लोणी खा; शत्रूवरही प्रेम करायला धैर्य लागते; सत्पथावर मार्गक्रमण करा. असल्या मूलभूत मार्गदर्शनाची आजच्या हेलकावे खाणाऱ्या परिस्थितीत केवढी गरज आहे ते मुद्दाम सांगायला नको. त्यातसुद्धा 'लोणी खा' हा विनोबांचा संदेश विशेष मौल्यवान आहे. विनोबांच्या जीवनभरच्या शिकवणुकीचे ते सारभूत नवनीतच होय. दम खा, मार खा, दातओठ खा, असे काहीतरी ऐकायची सवय झालेल्या जनतेला साक्षात विनोबांकडून 'लोणी खा 'असे ऐकायला मिळाले हे जय अलख निरंजनच झाले. विनोबांना, 'लोणी खा' असा निलाजरा संदेश द्यायला काय जाते ? या देशातल्या बहुसंख्य भुकेकंगाल लोकांना ते परवडणार आहे का ? असे प्रश्न काही व्यवहारवादी लोकांनी तळतळून विचारले आहेत. त्यांना एवढसुद्धा कळत नाही की ज्या देशात विनोबाजींसारखे सशरीर पुण्य विद्यमान आहे त्या देशात पाणी घुसळून लोणी काढणे सहज शक्य व्हावे. आणखी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे : दोन घास खाऊन राहीन म्हणणाऱ्याला दोनच घास मिळतात; उपाशी राहीन म्हणणाऱ्याला उपाशी राहावे लागते; पाणी पिईन म्हणणाऱ्याला पाणी मिळते आणि लोणी खाईन म्हणणाऱ्याला लोणी (आणि थालिपीठ) मिळते. आमच्या नाकळत्या लोकांना लोणी खायला आजवर कोणी सांगितले नव्हते; आता विनोबांनी सांगितले; आता ते हवे तेवढे लोणी खाऊ लागतील. भरल्यापोटी खाल्लेले लोणी विशेष आरोग्यवर्धक असते, असे शास्त्र सांगते; तेव्हा लोक लोणी खाण्यापूर्वी पोट भरायची सवय लावून घेतील नि काय.

याला आपण 'विनुशासन-पर्व' का म्हणायचे नाही ?

—अनंतराव

---

खुल्या निवडणुका. खुल्या निवडणुका असतील तरच त्यातून लोकमत खऱ्या अर्थाने व्यक्त होते. निवडणुकीत सत्ता, पैसा व जात यांचे दडपण कमी न होता वाढतच चालले आहे असा गेल्या पाच निवडणुकांचा अनुभव आहे. अलीकडच्या काळात विशेषतः पैशाचा प्रभाव वाढत आहे. निवडणुकांत एवढा अमाप खर्च केला जात आहे की सामान्य कार्यकर्त्यास त्या लढविणे अशक्य झाले असून लोकशाही म्हणजे प्रत्यक्षात धनिकशाही झालेली आहे. हा अनुभव केवळ आपल्याकडेच येत आहे असे नसून पाश्चात्य पद्धतीची लोकशाही असलेल्या सर्वच देशांत कमीअधिक प्रमाणात येत आहे.

संसदीय लोकशाहीच्या यशासाठी दोन तुल्यबळ पक्ष आवश्यक असतात. आपल्याकडे काँग्रेसला तुल्यबळ पक्ष अजून निर्माण होऊ शकलेला नाही. तुल्यबळ पक्ष नसला की मग आघाड्यांचे राजकारण सुरू होते. आघाडीतील पक्षांची एकजूट टिकते तोपर्यंतच त्यांचा प्रभाव जाणवतो; पण समान भूमिका व कार्यक्रमाच्या अभावी ही एकजूट फार काळ टिकत नाही. आघाड्या भंगतात, आयाराम-गयारामांची चलती होते व त्यांच्या तालानुसार सरकारे टिकतात किंवा गडगडतात.

अध्यक्षीय लोकशाही आल्याने हे चित्र बदलेल असे नाही. आपली लोकशाही यशस्वी करण्यासाठी खरी आवश्यकता आहे ती लोकशाहीवर अढळ विश्वास असलेल्या निर्भय, झुंजार कार्यकर्त्यांची. झटपट यशासाठी आपली मूल्ये न गमावता, कोणत्याही आमिषाला किंवा दडपणाला बळी न पडता खऱ्या लोकशाहीचा लढा जिद्दीने व चिकाटीने लढणारांचो. प्रजासत्ताकाच्या नव्या वर्षाचे सर्व सच्च्या लोकशाहीवाद्यांना हे आव्हान आहे. □

प्रगतिपथावरील राष्ट्र

# अधिकाधिक लोकांसाठी जास्ती जास्त कापड

धोतरें व साड्या यांचे उत्पादन 160 दशलक्ष चौरस मीटर्सपर्यंत गेलें आहे ! केवळ वर्षभरापूर्वी हें उत्पादन फक्त 100 दशलक्ष चौरस मीटर्सपर्यंतच होतें !

सहकारी क्षेत्रांतील 28,000 किरकोळ वस्तु विक्री दुकानांमार्फत, 90 टक्के नियंत्रित कापडाचें वांटप होतें ; यांपैकी बरीचशीं दुकानें ग्रामीण भागांतच आहेत !





वज्रनिर्धार आणि कठोर परिश्रम हेच आपल्याला तारतील

davp 75/454

भारतीय शास्त्रज्ञ हे विकसनशील राष्ट्रातील सर्वोत्कृष्ट शास्त्रज्ञ ठरावेत ही पंडित नेहरूंची इच्छा होती. या आपल्या आवडत्या स्वप्नपूर्तीसाठी त्यांनी काहीही करायचे बाकी ठेवले नव्हते. विरोधकांच्या तुफानी माऱ्याला न बिचकता त्यांनी संरक्षणापेक्षा संशोधनावर अधिक भर दिला. प्रसंगी लोकसभेलाही अंधारात ठेवून त्यांनी अणुशक्तिकेंद्राला सर्वाधिकार बहाल केले. या राष्ट्राला परवडणार नाही इतका अफाट खर्च त्यांनी संशोधनावर केला.

—पण या देशात घडले ते मात्र सारे उलटेच !
आम्हाला योग्य संधी नाही असा डंका पिटत अनेक शास्त्रज्ञ येथून परदेशात निघून गेले.

आणि इथे राहिलेल्या शास्त्रज्ञांनी तरी नेमके काय केले ?

तारापूर अणुशक्तिकेंद्राचे दिवेही तसे कधी पेटलेच नाहीत !

हे सारे का घडले ?

भारताच्या संशोधन-क्षेत्रात काही महत्त्वाचे दुवे कळत-नकळत विसरले गेले का ?

दिल्लीच्या श्रीराम इन्स्टिटयूट ऑफ इंडस्ट्रियल रिसर्च या तोलामोलाच्या संस्थेचे भूतपूर्व डायरेक्टर आणि युनेस्कोतर्फे मेक्सिकोत आयोजित झालेल्या 'संशोधनातील व्यवस्थापन' या अभ्यास-सत्राचे सूत्रधार डॉ. व्ही. बी. चिपलकट्टी यांनी या विषयावर नुकतेच एक अभ्यासपूर्ण भाषण दिले.


—आज निवृत्तीच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या या जगविख्यात महाराष्ट्रीय शास्त्रज्ञाच्या खात्यावर शंभराहून अधिक संशोधनात्मक निबंध आणि तितकीच पेटंटस् आहेत. त्यांच्या संशोधनाचा वापर करून या देशात तयार होणाऱ्या उत्पादनाची किंमतही काही कोटींच्या घरात आहे. त्यांच्या ज्या भाषणाने भारताच्या संशोधनक्षेत्रातील नेमक्या दुखण्यावर बोट ठेवले त्या गाजलेल्या भाषणाचा हा अनुवाद.


# एक संशोधन....भारताच्या संशोधनक्षेत्राचे !

डॉ. व्ही. बी. चिपलकट्टी
अनुवाद : डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

घोडा का अडला ? पान का सडले ? भाकरी का करपली ?—या तीन प्रश्नांना हुशार बिरबलने एकच चपखल उत्तर दिले होते.— भारताच्या संशोधनक्षेत्रातील अनेकविध प्रश्नांवर असे एखादे एकमेव समर्पक उत्तर देण्याचा माझा अर्थातच विचार नाही. उलट एक मात्र खरे, घडते आहे ते नेमके उलटे! या देशातील संशोधनक्षेत्राबद्दल वेगवेगळ्या थरांतील लोक वेगवेगळ्या संदर्भात बोलत असतानाहि कळत-नकळत एकाच निष्कर्षाप्रत येऊन पोचतात. तो निष्कर्ष असा की भारतीय संशोधकांनी व प्रयोगशाळांनी फार मोठ्या प्रमाणात या देशाचा अपेक्षाभंग केला ! आयुष्यातील अनेक प्रलोभने सहजपणे नाकारून आपला सहजधर्म म्हणून ज्यांनी स्वतःची हयात या राष्ट्रामधील प्रयोगशाळात काढली त्या सर्वांनी याचा अर्थातच विचार केला पाहिजे. हे असे का घडते आहे ? लोक बोलतात त्यात सत्याचा अंश किती ? खरोखरच असे काही असेल तर ही परिस्थिती बदलता येईल का ?

खरे बोलायचे तर वस्तुस्थिती अशी आहे की लोकांना शास्त्रज्ञांचा राग यावा. आपल्या देशातील औद्योगिक कारणाने अजून घ्यावा तेवढा वेग घेतलेला नाही. आपला भारत आणि इतर प्रगत देश यांच्यामधील आर्थिक आणि शास्त्रीय आघाडीवरील तफावत दररोज वाढते आहे. कोणताहि मोठा वा मध्यम आकाराचा कारखाना आपण अजूनहि स्वतःच्या ताकदीवर आणि ज्ञानावर भारतात उभारू शकत नाही. आणि दुसऱ्या बाजूला हा गरीब अप्रगत देश स्वतःला परवडणार नाही येवढा अफाट खर्च गेली वीस वर्षे संशोधनावर करतो आहे. आकडेवारीच्या आधाराने बोलायचे तर १९५२ मधे आपल्या देशाने संशोधनावर फक्त १२ कोटी रुपये खर्च केले होते. मात्र १९७२ मधे तो आकडा दरवर्षी २२० कोटी रुपये येवढा वाढला होता. म्हणजे हा गरीब देश दरवर्षी दरडोई चार रुपयांहून अधिक रुपये संशोधनावर खर्च करतो ! १९७२ साली एक लाखाहून अधिक तंत्रज्ञ आणि शास्त्रज्ञ संशोधनक्षेत्रात काम करीत होते. त्यातूनहि मजेची





स्वातंत्र्याची तीस वर्षे उलटली
–अजूनही आपण परकीय मदतीवर अवलंबून आहोत.


गोष्ट अशी की, भारतात संशोधनक्षेत्रात होणारा बहुतेक सर्व खर्च सरकारी तिजोरीतून येत होता. भारतात संशोधनावर होणाऱ्या खर्चापैकी ९५ टक्के खर्च सरकार करते. याउलट फ्रान्समधे हेप्रमाण ५० टक्के, तर अमेरिका व जपानमधे तर अनुक्रमे ३७ आणि २७ टक्के इतके कमी आहे.

## अजबखाना


एक मात्र खरे. आपल्या प्रश्नाचा इतका वरवरचा विचार मला करावयाचा नाही. उगाच आकड्यांच्या जंजाळात पण मी शिरणार नाही. खरे पाहता हा प्रश्न या देशातील अध्यात्माप्रमाणेच समजावयास अतिशय सोपा आणि अतिशय बिकट आहे असे मला वाटते. झपाट्याने बदलणारे विज्ञान, त्याच झपाट्याने बदलू पाहणारे जग आणि आपल्या देशाच्या प्राचीन परंपरा आणि आजची परिस्थिती अशा अनेक घटकांच्या साहाय्याने एक अभिनव नवा प्रयोग या भूमीवर घडतो आहे याचेहि भान आपण सतत ठेवले पाहिजे. आजचा आपला भारत हीच मुळी एक फार मोठी मजेशीर प्रयोगशाळा आहे! केवढा प्रचंड विरोधाभास या भूमीत आज भरलेला आहे ! बैलगाडी आणि जेट-विमान यात एकाच वेळी बसून या देशाचा प्रवास सुरू आहे असे अनेकदा म्हटले जाते. हे म्हणणे शब्दशः खरे आहे. या देशात इंधन म्हणून अणुशक्ती आणि गोवऱ्या या दोन्हींचाहि वापर होतो. तुम्ही विचारलेले हजार प्रश्न क्रमाने लक्षात ठेवून तुम्हाला पाहिजे त्या क्रमांकाचे उत्तर देणारे जैनमुनी या भूमीत आहेत. तर साध्या बेरजा-वजाबाक्या करण्यासाठी गणकयंत्र नसेल तर अडून बसणारे विज्ञानाचेहि विद्यार्थी आहेत. तुमची कावीळ मंत्राने बरी करणारे आणि सापाचे विष उतरवणारे मांत्रिक आहेत. त्यांच्यावर विश्वास ठेवणारा समाज आहे. त्याच वेळी परकीय कंपन्यांची अत्याधुनिक औषधे सोडून इतर कशाला हातहि लावावयास नाकारणारे निष्णात डॉक्टर्स आणि रोगीहि आहेत. नॅट विमान १०० टक्के भारतीय बनावटीचे बनवणारे वैज्ञानिक आहेत, तर एखाद्या उपकरणातील एखादी टाचणी मोडली तर ती परदेशातून येईपर्यंत उपकरण न वापरणारेहि शास्त्रज्ञ आहेत !

## अलीबाबाची गुहा

वर आपण आपल्या देशाबद्दल वैशिष्ट्यपूर्ण म्हणून जी परिस्थिती पाहिली तीच थोड्या वेगळ्या संदर्भात साऱ्या जगभर आज पसरली आहे. सर्वसामान्य माणसाला भोवळ यावी येवढ्या अफाट गतीने विज्ञानाची आगेकूच सुरू आहे. सर्वसामान्य माणसाला महत्त्वाच्या वाटणाऱ्या ज्या गोष्टी पुढील काही दशकांत सहजपणे घडणार आहेत त्यांचा आपण म्हणूनच प्रथम परिचय करून घेऊ. विज्ञान, संशोधक, संशोधन या बाबतचे आपले अचूक मत बनवावयास आपणाला त्या माहितीचा नंतर कदाचित उपयोग होईल. तुमच्या जीवनाला स्पर्श करणाऱ्या कोणत्याहि क्षेत्राकडे पाहा. तुमचा विश्वासहि बसणार नाही. तुम्हाला कल्पनाहि येणार नाही येवढे विलक्षण बदल त्या क्षेत्रात पुढील काही दशकांत होणार आहेत. विमानाची गोष्ट घ्या. १९१८ साली विमानाचा वेग ताशी १०० मैल होता. आज ताशी १८०० मैल या गतीने प्रवास करणारे विमान आहे. या शतकाच्या अखेरीपर्यंत ताशी १० हजार मैल या गतीने प्रवास करणारे विमान असेल. पहिले विमान लाकडाचे होते. आज ते ॲल्युमिनियमचे आहे. उद्या पोलादापेक्षा टणक आणि ॲल्युमिनियमपेक्षा हलक्या अशा प्लॅस्टिकचे ते बनवलेले असेल. तुमच्या कपड्यांची गोष्ट घ्या. नव्या कृत्रिम धाग्यांनी बनवलेले तुमचे उद्याचे कपडे तुम्ही घरीहि धुणार नाही वा धोब्याकडेहि टाकणार नाही. कपडे अंगावर ठेवूनच काही सेकंदांत तुम्ही ते स्वच्छ करून घ्याल! तुम्हाला वा तुमच्या उद्योगधंद्यांना मिळणारे इंधन बघा. पुढील काही दशकांत इंधनासाठी लागणारे पेट्रोलचे साठे तसे संपुष्टात येतील; पण आज ज्या तत्त्वावर हायड्रोजनबॉंब काम करतो त्या



–उद्या तुमचे कपडे अंगावर ठेवूनच तुम्ही ते स्वच्छ करून घ्याल.



हरमोनचे दोन थेंब तुमची पाहिजे तशी स्त्री-पुरुषात विभागणी करतील.

'अॅटॉमिक फ्युजनच्या' तत्त्वावर तुमच्या गावाला विद्युतपुरवठा होत असेल. म्हणजे मुंबईसारख्या मोठ्या शहराला वीज पुरवणारे विद्युत-गृह एखाद्या छोटया पेटीत ठेवता येईल. या अशा एका शोधाचे इतर क्षेत्रांवरही चमत्कारिक परिणाम होतात. या अणुभट्टीला लागणारे इंधन मिळविण्यासाठी तुम्हाला नव्या खाणी खणाव्या लागतील; पण या खाणी जमिनीवर नसतील तर समुद्रात असतील! कारण या भट्टयांसाठी लागणारे इंधन समुद्रात मिळते. पुन्हा वीज इतकी स्वस्त असेल की समुद्राचे पाणी शुद्ध करून पिण्यासाठी वापरणे आणि समुद्रामधूनच लोखंड, सोने, इ. धातु मिळवणे किफायतशीर असेल. खरे पाहता माणसाने सोने, रुपे हे धातू वापरावे की नाही हाच खरा प्रश्न असेल. कारण पाहिजे त्या धातूच्या गुणधर्माची सहीसही नक्कल करणारे प्लॅस्टिक त्या वेळी मिळत असेल. कृत्रिम धाग्याप्रमाणेच कृत्रिम अन्न तेव्हा बाजारात नसेलच याची खात्री आपण देऊ शकत नाही आणि अन्न जरी शेतावरच पिकवले गेले तरी ते कष्टाचे काम करावयास कोणीच माणूस तयार नसेल. एखादे गणकयंत्र हे काम इमानेइतबारे पार पाडील. वैद्यकशास्त्राने फार मोठा टप्पा गाठला असेल. आजचे अनेक असाध्य रोग तेव्हा असाध्य नसतील...आणि शक्यता आहे. हारमोनचे दोन थेंब तुमच्या इच्छेप्रमाणे तुमची स्त्रीपुरुषात विभागणी करू शकतील. जितक्या सहजपणे तुम्ही कपडे बदलता ना तितक्या सहजपणे हे कदाचित घडून येऊ शकेल.

### सांघीक कवायत...

विज्ञान काय करते, काय करू शकेल हे आपण वर पाहिले. तुमच्यापैकी अनेकांना तो यक्षनगरीतील फेरफटका वाटला असेल. खरे पाहता तुमच्यासमोर उद्या उघडणारी ही अलीबाबाची गुहा! त्या गुहेचे अंतरंग तुम्हाला ओझरते दाखविण्याचे कारण मात्र थोडे वेगळे आहे. शास्त्रज्ञ आणि शास्त्रीय संस्थांचे संचालन करणारे कोणत्या भाराखाली काम करत असतील याची पुसटशी कल्पना तुम्हाला यावरुन येऊ शकेल. **'काल' आणि 'उद्या' यांचा हा तोल 'आज' सांभाळण्याचे काम शास्त्रज्ञांनी करावयाचे असते.** किमानपक्षी त्यांनी ते कसे करावे अशी अपेक्षा असते. या प्रयोगशाळांचे नियोजन व संचालन करू पाहणाऱ्यांनी या गोष्टीचे भान सतत ठेवावयास हवे. आपले इतर ठिकाणच्या संचलनातील ठोकताळे योग्य तेवढे लवचीक करण्याची तयारी हवी. आपल्यासमोर दर क्षणी विस्तारत जाणाऱ्या क्षितिजाचा परिचय हवा. त्याचे विराट स्वरूप समजावून घेण्याची क्षमता हवी.

हे विराट स्वरूप नेमके कसे आहे? गेल्या शंभर वर्षात मानवी ज्ञानाच्या इतर कोणत्याही शाखेच्या मानाने विज्ञानशाखेतील प्रगती अनेक पटींनी अधिक झाली. जगभर संशोधनावर होणारा खर्चहि असाच अनेक पटींनी वाढत गेला. महत्त्वाचे म्हणजे विज्ञान व संशोधन यांची माहिती देणारी मासिके पण विलक्षण प्रमाणात वाढली. इसवी सन १८०० मधे हाताच्या बोटावर मोजण्यायेवढी थोडी शास्त्रीय मासिके होती. १८५० मधे हा आकडा हजाराच्या घराला पोचला होता. इसवी सन १९०० मधे ही संख्या दहा हजार होती. –आजच्या घडीला हा आकडा दीड लाखाहून अधिक आहे! जगभरचे २५ लाखांहून अधिक संशोधक आपले नवे विचार आणि नवे प्रयोग त्यातून मांडत असतात— आपल्या भोवती प्रतिक्षणी घडणाऱ्या या नव्या संशोधनाचा नुसता परिचय करून घेणेहि आज शास्त्रज्ञांच्या दृष्टीने दमछाक करणारे आहे! आणि सर्वात अधिक तेच महत्त्वाचे आहे. एखाद्या कवीप्रमाणे आपल्याच तंद्रीत एका कोपऱ्यात बसून नवनिर्मिती करणे आज शास्त्रज्ञाला शक्य नाही. थोडे पुढे जाऊन अधिक स्पष्टपणे सांगावयाचे तर संशोधनक्षेत्रातील 'एकांड्या शिलेदाराचे' दिवस आता संपले आहेत. आजचे संशोधन ही एक सांघिक कवायत आहे. संशोधकांमधील संघभावना महत्त्वाची आहे. शास्त्रज्ञाच्या संचातील प्रत्येकाची सृजनशीलता आणि वेगळेपणा टिकवून त्याच वेळी एक समतोल आणि सामंजस्य असलेला संघ निर्माण करणे हे एक आव्हान आहे. 'एकमेका साहाय्य करू अवघे धरू सुपंथ' हे संतवचन आपण अनेकदा सहजपणे बोलतो; पण व्यवहारात मात्र नेमकी नाथांच्या घरची उलटी खूण आपल्या आढळात येते. एका सेनापतीचे एक जुने विधान आहे. एक भारतीय सैनिक हा केव्हाहि एक गोऱ्या सैनिकाला भारी असतो; पण दहा भारतीय सैनिक एकत्र असतील तर मात्र एक गोरा सैनिक त्यांचा सहजपणे पराभव करतो! शास्त्रज्ञांच्या संचाचे अनुशासन करणे हे तर आणखी एका प्रकारे कठीण आहे. त्याची जाणीव त्या संचाचे व्यवस्थापन करू पाहणाऱ्यांनी सतत ठेवली पाहिजे. शेवटी शास्त्रज्ञ सृजनशील प्रतिभेचे देणे मिळालेले कलंदर कलावंत असतात, आजकाल तर कामगारांनाहि कडक अनुशासन मानवत नाही. शास्त्रज्ञांना नेहेमीच्या शिस्तीत बांधणे म्हणूनच हास्यास्पद असते. म्हणून शास्त्रज्ञांना पूर्ण स्वातंत्र्य देत असतानाच त्यांच्यात संघवृत्ती रुजवणे आणि त्यांच्या हितासाठी असलेल्या व्यवस्थापनात त्यांच्या नकळत त्यांना सहभागी करून घेणे हे महत्त्वाचे काम असते. शास्त्रज्ञांना व्यवस्थापनात सहभागी करून घेत असतानाच त्यांच्या संशोधनावर त्याचा ताण पडणार नाही, संशोधनातला अमूल्य वेळ त्यात खर्च होणार नाही याचेहि भान सतत राखले पाहिजे.

### प्रश्नाचे नेमके स्वरूप...

भारताच्या संशोधनक्षेत्रातील वरवर जाणवणारे प्रश्न आपण पाहिले. त्याचबरोबर या प्रश्नांची व्यापकता आणि वेगळेपणा आपण

समजावून घेतले पाहिजे. हिंदुस्थानात विज्ञान आणि तंत्रविज्ञान यांची चांगली जाण असलेले १२ लाखांहून अधिक लोक आहेत. म्हणजे दर ४५० माणसांमागे एक माणूस हा तंत्रज्ञ आहे. हे प्रमाण तसे कमी नाही. अगदी जपानमधेहि दर ४४० माणसांमागे एक तंत्रज्ञ असेच प्रमाण आहे. भारतात एकूण नऊशेहून अधिक संशोधनकेंद्रे आहेत. खाजगी उद्योगधंदे, विद्यापीठे आणि सरकारी क्षेत्र यांच्यात या प्रयोगशाळा विभागलेल्या आहेत. भारतात संशोधनक्षेत्रात होणाऱ्या खर्चापैकी ९४ टक्के खर्च सरकार करते. साऱ्या जगभर याच्या नेमकी उलट परिस्थिती आहे. पुन्हा भारतात होणाऱ्या संशोधनापैकी बरेचसे संशोधन हे ज्याला आपण मूलभूत संशोधन म्हणतो त्या प्रकारचे आहे. भारतीय संशोधकांनी मूलभूत संशोधन न करता नित्योपयोगी संशोधन करावे अशी मागणी सातत्याने केली जाते, पण अजूनहि अशा स्वरूपाचे संशोधन फार थोड्या प्रमाणात होते. देशाच्या एकूण आर्थिक प्रगतीवर आणि औद्योगीकरणावर अशा स्वरूपाच्या संशोधनाने होणारे परिणाम हे अजूनहि खरोखरच नगण्य आहेत.

याच ठिकाणी एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. भारताच्या संशोधनक्षेत्राची योग्य पायावर उभारणी केली गेली आहे का असा तो सवाल आहे; पण या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठीही आपणाला आणखी थोडे मागे जावे लागेल. विकसनशील देशातील शास्त्रज्ञासमोरचे नक्की काम कोणते हे आपणाला प्रथम ठरवावे लागेल. संशोधक अनेक स्वरूपाची कामे करू शकतो. सध्या जगात अस्तित्वात असलेल्या मूलभूत शास्त्रीय ज्ञानात तो अल्पशी पण वैशिष्टचपूर्ण भर घालू शकतो. भोवतालच्या समाजाचे तो प्रबोधन करू शकतो सध्या अस्तित्वात असलेल्या एखाद्या कारखान्यातील उत्पादनक्षमता कशी वाढवता येईल, वैज्ञानिक वा रासायनिक प्रक्रिया बदलवून ते उत्पादन स्वस्त कसे बनवता येईल हे त्याला सांगता येते. सध्या देशात बनत असलेल्या एखाद्या वस्तूच्या गुणधर्मात अल्पसा बदल करून त्याची उपयुक्तता कशी अनेक पटींनी वाढेल वा संपूर्ण बदलेल हे तो दाखवू शकतो. एखादा अगदी वेगळा, नवा वा आत्तापर्यंत या देशात न बनविलेला पदार्थ तो बनवू शकतो. एखादा संपूर्ण नवा मोठा उद्योगधंदाही आपल्या संशोधनातून साकार करण्याची कुवत शास्त्रज्ञाकडे असते.

स्वातंत्र्यानंतर झपाट्याने देशाचे औद्योगीकरण करणे ही आपल्या नेतृत्वाची प्रतिज्ञा होती. त्याच्या जोडीला हरितक्रांती पण त्यांना हवी होती. थोडक्यात देशात सुबत्ता आणि संपन्नता यावी, आयात-निर्यातीत समतोल यावा आणि हे सारे थोड्या वेळात व्हावे असे त्यांना वाटे–महत्त्वाची गोष्ट म्हणजे हा एकूण नियोजनाचा आणि धोरणांचा प्रश्न होता. भारतातल्या सर्व प्रयोगशाळा या स्वायत्तसंस्था होत्या आणि नियोजनमंडळ आणि संशोधनसंस्था यांच्यामधील सुसंवाद, सामंजस्य, आदानप्रदान या गोष्टींकडेही आपण फार दुर्लक्ष केले. त्यातून पुन्हा कोणत्याही गोष्टीचा योग्य उपयोग करून घेण्यासाठी ती गोष्ट प्रथम स्थिर, व्यापक पायावर उभारावी लागते. पायाभरणीचे हे काम महत्त्वाचे आणि त्रासाचे असते. पुन्हा बाहेरून वरवर पाहणाऱ्या माणसाला काही काम चालू आहे, झाले आहे याचीही कल्पना येत नाही.

**अधिक आणि उणे. . . .**

आज संशोधनक्षेत्रात काम करणाऱ्या माणसाला अनेक अत्याधुनिक उपकरणे वापरावी लागतात. शास्त्रज्ञाची कुवत अनेक पटींनी वाढविण्यासाठी आणि एकूण संशोधनाचे वातावरण निर्माण करण्यासाठी ती साधने आवश्यक असतात. लक्षात घ्या परदेशात निघून गेलेले अनेक शास्त्रज्ञ पगार कमी मिळतो म्हणून गेले नाहीत तर भारतात हे वातावरण निर्माण झालेले नाही म्हणून गेले ! हे वातावरण निर्माण करणे, हे पायाभरणीचे काम करणे तसे वेळ घेणारे असते. किचकट व त्रासदायक असते. अनेक नव्या यंत्रांचा आणि तंत्रांचा आपल्या असंख्य शास्त्रज्ञांना परिचय करून देणे हे खरोखरच अवघड आणि महत्त्वाचे होते आणि हे पायाभरणीचे काम गेल्या १५-२० वर्षांत आपण अगदी नकळत पार पाडले आहे. ही कमाई काही थोडीथोडकी नव्हे. याबाबत आपण थोडे चुकलो ते येथे की विज्ञानाच्या निरनिराळ्या शाखांमधील संशोधनामध्ये आपण समतोल निर्माण केला नाही. समजा एखादे नवे कृत्रिम रासायनिक खत संपूर्ण देशी प्रयत्नावर आपणाला देशात बनवावयाचे आहे. प्रथम रसायनशास्त्रज्ञ प्रयोगशाळेत हा पदार्थ बनवील. नंतर रासायनिक इंजिनिअरने तो मोठ्या प्रमाणावर बनविण्याची पद्धत ठरवावी लागेल. त्यासाठी त्याला लागणारी यंत्र-सामुग्री तुमचा मेकॅनिकल इंजिनिअर बनवील. हे मी तसे वरवरचे सांगितले. तसे पाहिले तर वेगवेगळ्या सात-आठ विभागांतील शास्त्रज्ञांचे वेगवेगळे संच एकाच वेळी यावर काम करीत असतील. यातील एखादा विभाग, त्या विभागाचा संघ तुमच्याकडे नसेल तर बाकी इतर विभागांचे काम फुकट जाण्याचा धोका निर्माण होईल. केवळ त्याच विभागापुरते परकीय साहाय्य तुम्हाला मागूनही विकतसुद्धा मिळणार नाही. थोडक्यात म्हणजे शास्त्रज्ञांच्या प्रत्येक संघात संघवृत्ती हवी. त्याचबरोबर निरनिराळ्या संघांत आदानप्रदान हवे. सुसंवाद हवा. सामंजस्य हवे. महत्त्वाचे म्हणजे सर्व विभागांचे संघ आपणाकडे हवेत. काही चुकांमुळे यातील इंजिनिअरिंगसारख्या विभागातील संशोधनाकडे आपण द्यावे तेवढे लक्ष दिले नाही. क्रिकेटच्या संघात पाच चांगले फलंदाज आणि सहा चांगले यष्टिरक्षक घेतले. गोलंदाज मात्र ठेवलाच नाही यासारखे काहीसे हे झाले !

हा समतोल असा निर्माण करत असतानाच दुसरा एक प्रश्न निर्माण होतो. मूलभूत संशोधन या देशाने करावे की नाही ? असा तो प्रश्न आहे. माझा व्यक्तिगत आग्रह आपण ते जरूर करावे असे आहे. मूलभूत संशोधनाचे फायदे अनेक असतात. त्याला लागणारा खर्च तसा कमी असतो. तुमचे शास्त्रज्ञ शास्त्रीय भाषेत तयार व्हावयास त्याचा फायदा होतो. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे एक सुजाण, समंजस, शास्त्रीय वातावरण त्यातून निर्माण होते. तुमच्या भोवतालचा सारा समाज बदलवण्याचे सामर्थ्य या अशा वातावरणात असते. विज्ञानयुगात जगावयास लायक असलेला समाज यातून निर्माण होतो. हे असे संशोधन आजच्या क्षणी इतर राष्ट्रांच्या उपयोगी पडले म्हणूनही बिघडत नाही. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर राष्ट्राची प्रतिमा निर्माण करण्याचे कामही हे संशोधनच शेवटी करत असते.

गेल्या दोन दशकांत संशोधनक्षेत्रात झालेले काम हे असे मोलाचे आहे; पण त्याचे फलित पुढील काही दशकांत बघावयाचे असेल तर

वरील विचारांच्या संदर्भात या देशाच्या संशोधनक्षेत्राची व त्या क्षेत्रातील व्यवस्थापनाची पुनर्रचना करण्याचे धैर्य व समजूतदारपणा आपण दाखविला पाहिजे. थोडे सुसूत्रपणे सांगावयाचे तर–

१. शास्त्रज्ञ हा कलंदर कलावंत आहे. त्याची सर्जनशीलता जोपासत असतानाच त्याच्यात संघवृत्ती निर्माण करणे आणि त्याला स्वातंत्र्य देत असतानाच त्याला नकळत त्याच्या भोवतालच्या व्यवस्थापनात त्याला सहभागी करून घेणे हे काम आपणाला करावे लागेल. हे आव्हान ज्यांना पेलेल असे नवे व्यवस्थापक आपणाला प्रथम निर्माण करावे लागतील.

२. संशोधनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत वेगवेगळ्या विभागांत समतोलपणा आहे का हे आपणाला बारकाईने पाहावे लागेल. माझ्या मते विसंगती जाणवावी येवढ्या मोठ्या प्रमाणात हा तोल आज ढळलेला आहे. प्रयत्नपूर्वक आणि झपाट्याने हा समतोल आपण निर्माण केला पाहिजे.

३. मूलभूत संशोधन जरूर हवे; पण ते संशोधन महाविद्यालये व विद्यापीठे या ठिकाणापुरतेच मर्यादित असावे. तेथे काम करणाऱ्या संशोधकांचे पगारहि खाजगी क्षेत्राइतके आकर्षक हवेत. त्यांच्याजवळ अत्याधुनिक साधनसामुग्री आहे. –देशात संशोधनाचे वातावरण निर्माण करण्याचे आणि राष्ट्रीय प्रयोगशाळा व खाजगी उद्योगधंद्यांतील संशोधनकेन्द्रे यांना तयार प्रशिक्षित संशोधक कमीत कमी वेळात पुरवण्याचे काम या केंद्रांनी करावयाचे आहे.

४. खाजगी उद्योगधंद्यात होणाऱ्या संशोधनाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढविले पाहिजे. जरूर तर सक्तीने वाढविले पाहिजे. पुन्हा त्या केंद्रात होणाऱ्या संशोधनाची मर्यादा व स्वरूप पण ठरवून दिलेले पाहिजे. त्या त्या उद्योगधंद्याच्या दृष्टीने तातडीचे जरुरीचे असलेले छोटे संशोधन करण. परदेशांत त्या धंद्याच्या दृष्टीने जे संशोधन होते त्याचा मागोवा घेणे. त्या उद्योगधंद्यात सध्या अस्तित्वात असलेल्या प्रक्रियेमध्ये काही बदल सुचवणे आणि त्या धंद्याच्या विकासाच्या वेळी परकीय सहकार्य घेण्याची वेळ आलीच तर अगदी आवश्यक तेथे ते सहजपणे व कमीत कमी खर्चात घेण्याची कुवत असलेला एक संघ उभारणे येवढेच त्या संशोधनकेंद्राचे काम हवे.

आपल्या राष्ट्रीय प्रयोगशाळांचे स्वरूप संपूर्ण बदलले पाहिजे. त्या प्रयोगशाळा संपूर्णपणे स्वायत्त संस्था न ठेवता निरनिराळ्या केंद्रीय मंत्रालयाला त्या संलग्न केल्या पाहिजेत. त्या मंत्रालयाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले एखादे फार मोठे दीर्घ मुदतीचे संशोधन या राष्ट्रीय प्रयोगशाळांनी केले पाहिजे. त्या प्रयोगशाळांच्यावर आपण करीत असलेला खर्च लक्षात घेता ते अगदी अगत्याचे आहे.

माझे हे सारे विचार तुम्हाला पटलेच पाहिजेत असा माझा आग्रह नाही; पण या दृष्टिकोनातून फार मोठे विचारमंथन होणे अगत्याचे आहे येवढे तरी तुम्ही जरूर मान्य कराल. झाले आहे ते असे. भारताच्या संशोधनमंदिराचा फार मोठा सुंदर भक्कम पाया आपण रचला आहे. त्या पायावर तुमच्या संशोधनमंदिराची तुम्ही उभारणी करणार आहात की पुन्हा आपले आणखी काही दशके आणखी मोठा पाया रचीत बसणार आहात हा खरा प्रश्न आहे.

शांतता ! –पायाभरणीचे काम चालू आहे ! □ □

---

# ‘ ब्लिटझ् ’मधील आश्वासक वार्ता

श्री. मा. भावे

भारतातील महत्तम साप्ताहिक ‘ ब्लिटझ् ’ व त्याचे विख्यात अधिपती करंजियासाहेब हे कोणास माहीत नाहीत? आता ‘ ऐसा तो गुण कोणता खलजनी नाहीच जो निंदिला ’ या नियमाने ब्लिटझ्लाही निंदणारे लोक आहेत, नाही असे नाही. पारशी लोकांना पिवळ्या वस्तूंचे उत्पादन करावयास आवडते, जसे पोलसनचे बटर; त्याप्रमाणे करंजियांचे लिखाणही पिवळे असते, असे म्हणणारे लोक आहेत. ‘ सरशी तिकडे पारशी ’ या म्हणीचा उल्लेखही ब्लिटझ्विषयी केला जातो. काही लोक करंजियांच्या समाजवादाची व्हिस्की-समाजवाद अशी थट्टा करतात; पण भांडवलशाही देश सोडल्यास बाकीच्या जगातील सर्व थोर पुढाऱ्यांबरोबर व्हिस्की पिता येईल इतकी त्यांच्याशी करंजियांची दोस्ती आहे.

मागे साम्राज्यवादविरोधी पुढारी नासेर आणि निकिता (म्हणजे ख्रुश्चेव्ह हो !) यांच्यात साम्राज्यवाद्यांनी कलागत लावली होती. त्यामुळे साम्राज्यवादाच्या विरोधकात फूट पडणार अशी दारुण भीती निर्माण झाली; पण करंजियांना सगळ्यांची काळजी. धावले नासरकडे. व्हिस्की पिता-पिता नासेरला म्हणाले, ‘ लेका, शेंबड्या पोरासारखा निकिताशी भांडत काय बसलास ! चल, तुमची समजूत काढून देतो !’ मग उडाले मॉस्कोला. ख्रुश्चेव्हशी व्होडका पिताना बोलणे काढले, ‘ निकेता, यार, तुझे आणि नासरचे भांडण होणे चांगले नाही. चल कट्टी सोडून गट्टी कर !’ आणि काय, साम्राज्यवाद्यांचे मुस्काटच फुटले !’ नासर निकिता भाई भाई ! रूसोने केली दिलजमाई !’ ही हकीकत स्वत: करंजियासाहेबांनीच ब्लिटझ्च्या रौप्यमहोत्सवी अंकात दिली होती.

अशी सगळ्या पुढाऱ्यांशी फुगडी खेळण्याइतकी मैत्री असल्यावर, ‘ ब्लिटझ् ’मध्ये चमचमीत बातम्या, त्यातल्या बऱ्याचशा ‘ उद्याची बातमी आज ’ अशा प्रकारच्या असणार यात नवल काय ? नुकतीच प्रतिगाम्यांचा थरकाप उडविणारी आणि माझ्यासारखे पतप्रधानांचे जे मठ्ठ पण घट्ट अनुयायी आहेत त्यांना हर्षित करणारी एक अत्यंत विश्वसनीय अशी माहिती ब्लिटझ्-अधिपतींनी १० जानेवारीच्या अंकात दिली आहे. ती अशी, की इंदिराजींना योगसिद्धी प्राप्त झाली असून त्यांची कुंडलिनीही जागृत झाली आहे. चला, आता काळजी नाही !

या देशात जेव्हा जेव्हा अपप्रवृत्तींशी सज्जनांनी युद्ध केले तेव्हा तेव्हा दैवी शक्ती सज्जनांच्या मदतीला धावून आल्या अशी परंपरा आहे. रामायणात रामरावण-युद्धात देवांनी रामासाठी रथ पाठविला असा उल्लेख आहे; पण मध्यंतरी पाश्चात्यांच्या खुळचटपणाला भुलून ‘ देवांच्या मदतीला चला तर ’ असे म्हणून उलटी गंगा वाहवणारे कवी या देशात निघाले. सुदैवाने गेल्या काही दिवसांत वातावरण बदलत आहे. जुन्या परंपरा, जुने ऋषी-मुनी, त्यांचे अनुशासन याकडे लोक वळू लागले आहेत. पंतप्रधानांच्या योग-सामर्थ्याचा हवाला प्रतिगामी शक्तींशी चाललेल्या घोर युद्धाच्या प्रसंगी मिळावा, हा अनुकूल कौलच होय.

*

# इंजेक्शन

चंद्रकांत अंबाडे

'ए, चल ना लौकर!'

'कुठं?'

'बेडरूमकडं, इंजक्शन तयारंय.'

'आज काय मला इंजक्शन देतेस काय?'

'नाही रे, माझं मीच घेते. तू फक्त सोबतीला. चल!'

'मी बातम्या ऐकतोय–दिसतयं ना?'

'मग पिल्लू तिकडं घेऊन चल.'

'...' पिल्लू म्हणजे आम्हा दोघांच्या भाषेत ट्रान्झिस्टर. मी फक्त त्रासिक नजरेनं तिच्याकडं पाह्यलं–न बोलता. ती पण जणू हटून समोर उभीच राहिली! अशी हट्टी बायको मिळालीय ना मला! मग मी पण रागावून म्हणालो, 'अन् घेतलं एखाद दिवशी इंजक्शन माझ्याशिवाय तर काय बिघडतं? मी कान कंपौंडर आहे की मेल–नर्स? अन् मीच हवा सोबत तर इथंच...'

बोलता बोलता मी तिच्याकडं पाह्यलं. ती स्तब्ध. उभीच्या उभीच. नजर टक लावून माझ्यावर. जणू रोखून धरलेली बंदूक! अगदी पापण्यांची उघडझापही बंद. बघता बघता ते मोठ्ठे मोठ्ठे वटारी डोळे 'पाणीदार' झाले. आता कोणत्याही क्षणी बांध फुटणार जणू. मलाच शरमिंदेपणा वाटला न् झटदिशी उठलो तिचे दोन्ही खांदे पकडीत सांगितले–

'चलतो. चलतो; पण तू रडू नकोस. प्लीज!'

धरणफुटी वाचली. पट्दिशी तिने टेबलावरचा दिवा ऑफ केला. एखाद्या आज्ञाधारक लहान मुलाप्रमाणे मी तिच्या मागून निघालो. मधल्या डायनिंग टेबलावर जेवणाची ताटे मांडलेली होती. किचनरूममधल्या गॅसवर कुकरची शिट्टी वाजण्याच्या बेतात होती. रात्रीच्या जेवणात मुगाची खिचडी आहे हे दरवळलेल्या वासावरूनच समजले. विविध भारतीवर तिकडे ड्राइंगरूममध्येही बातम्या चालू होत्या. पंखाही चालू आणि टयूबलाइटही. झोपण्याच्या पलंगाजवळ खुर्ची ओढून तिने मला बसविले–एखाद्या आंधळयाला बसवून देतात तसे. समोर टी-पॉय ठेवून त्यावरील रेडिओचा आवाज मंद केला. एक कसलेसे मासिक माझ्या हातात देऊन, कोपऱ्यातला टेबलफॅन सुरू केला. कमरेला पदर खोचीत गादीवर बसता बसता म्हणाली––

'तू फक्त इथं बस म्हणजे झालं. माझं मीच घेते इंजक्शन. तू नसलास ना की फार पेनफुल वाटतं ते!'

'अन् असल्यावर?'

'मग तुझ्याशी बोलता बोलता, कळतही नाही घेतल्याचं.'

'पण ती सुई खुपसताना पाहायला नको वाटतं.'

'अन् मला काय आवडतं होय?'–बोलता बोलता तिने हात लांब करून माझ्या मोकळया हातावर ठेवला. बोटे आवळली गेली. क्षणभर पकड जाणवली मला. हात तसाच ठेवून तीच पुढे मंद आवाजात बोलू लागली जणू स्वतःशीच बोलल्याप्रमाणे–'पण तुझ्यासाठी सहन करते मी सारे. तुला छान छान बाळ हंवय ना?'

इंजेक्शनचा ट्रे तिने समोर ओढला. चिमटयाने धरून तिने सिरिंजेस जोडल्या. वाफा निघत होत्या. इतका वेळ पाणी उकळत होतं ना? चिमटयानेच–त्याला फॉरसेप म्हणतात–इंजेक्शनच्या सिरिंजला सुई जोडली. भली मोठी न् जाड. सिलबंद बाटलीच्या रबरी जाड बुचात सुई घुसवून बाटली उपडी केली. डाव्या हाताच्या दोन बोटांत उपडी बाटली अन् उजव्या हातात इंजेक्शनची सिरिंज. आता तिने दोन्ही हात उंचावून हवेत दिव्यासमोर धरले. पिचकारीचा दांडा मागे मागे ओढावा तशी ती पिस्टन मागे घेऊन बाटलीतील द्रव सिरिंजमध्ये भरून घेऊ लागली. सिरिंजवरील छापील सीसीच्या रेषा एकेक गडप होऊ लागल्या. तिला पाहिजे तेवढे द्रव येताच हात खाली घेऊन बाटली बाजूला ठेवून दिली. फॉरसेपनेच मोठी जाड सुई काढून त्या जागी दुसरी बारीक लावली. आखूड आणि नाजुक जणू. स्पिरिटचा वास दरवळला. एव्हाना रेडिओवरील बातम्या संपून मंद सतारवादन सुरू झाले होते. मी शून्यात नजर लावल्याप्रमाणे हे सारे पहात होतो. स्लिव्हलेस ब्लाऊजच्या खांद्यावरच्या पट्टीत तिने पदर खोचला व डावा हात दुमडून पोटावर मूठ दाबून धरली. आता तिच्या ध्यानात आलं की, समोर कुणीतरी पुरुष आहे. डोळे मोठे करीत तिने दटावले–

'मासिक वाच! बघतोस काय टक लावून?'

उत्तरादाखल मी नजर कायम ठेवून उजवा डोळा हळूच बारीक केला.

'पळ,'–म्हणत तिने गिरकी घेऊन माझ्याकडे पाठ केली. आता पाठीवरच्या दोन वेण्या दिसू लागल्या–रिबिन नसलेल्या–सैलशा. पैकी एकीत एक गुलाबाचं फूल-दिवसभराचं कोमेजलेलं. कानातल्या इयरिंग्ज हलत होत्या. मंद वाऱ्यानं केस भुरुभुरू उडत होते. केस अन् पदरही. दोन्ही दंड–गोरेपान अन् सरळसोट–अंगाला घट्टपणे बिलगून जणू. माझ्याकडे पाठ करूनच ती बोलत होती.

'जाऊ नकोस हं. झालं माझं. वाढतेच जेवायला'–हळूच मान तिरकी करीत तिने मी बसलेला असल्याचं पाहून घेतलं अन् पुढे म्हणाली, 'भुक्कू लाग्लीशेल् गं माझ्या बाळाला'–आता आपल्याशीच खुदकन् हसणं.

पण माझं लक्ष तिच्या बोलण्याकडं नव्हतंच जणू. नाही तर मला–म्हणजे होणाऱ्या बाळाच्या बापाला–बाळ म्हटलेलं ध्यानात आलं असतं माझ्या; पण माझं लक्ष होतं तिच्या गोऱ्या गोऱ्या मानेकडे. मंगळसूत्राच्या काळया न् सोन्याच्या मण्यांची रेघ मानेवर काय मस्त दिसत होती! क्षणभर मोह झाला ...उठून त्या काळया रेघेवर ओठ...! पण... तसाच बसून राहिलो. का? मनात विचार डोकावला...हीच मंगळसूत्राची रेघ 'ती'च्या मानेवर कशी दिसली असती? खरंच, कशी दिसली असती ती? नाही तरी अशीच पाठमोरी बसायची...असाच बेताचा बांधा... इतपतच गोरी...अशाच दोन वेण्या पाठीवर टाकायची...कधी एखादं फूल तर कधी

गजरा ..' हीने 'ने एका हातात माझा हात पकडून ठेवला होता. मधाशी तर, 'ती' तिच्या दोन्ही तळव्यांमध्ये ठेवायची, इतकंच. हिच्या-प्रमाणेच 'वेडी' !

ही वेडी ? एम्बीबीएस झालेली डॉक्टरीण वेडी ? एका प्रोफेसराची पत्नी वेडी ? माझ्याच मनाला मीच प्रश्न केले...मीच उत्तरेही देऊ लागलो...वेडी नाही तर काय ?...दुसरा महिना लागताच–'आई' बनणार हे पक्कं होताच–स्वतःला कॅल्शियमची, व्हिटॅमिन्सची, आयर्नची कसली कसली सत्राशेसाठ इंजेक्शने सुरू केली...म्हणे बाळ चांगलं झालं पाहिजे ...बरं, स्वतःच्या हॉस्पिटलात हाताखाली इतक्या नर्सेस...आपल्या डॉक्टरला इंजेक्शन देण्यास कोणती नर्स नाही म्हणेल ? पण म्हणे मला लाज वाटते...म्हणून घरी स्वतःच स्वतःला इंजेक्शन घेणार...त्या वेळी नवरा कशाला सोबत पाहिजे...काही तरी हट्ट... वेड्याप्रमाणे...' ही ' वेडी, तर 'ती' पण वेडीच म्हणायची का ? कारण ती पण इंजेक्शन घेताना आपल्याला जवळ बसवून घ्यायची...पण दोघींच्या हेतूंमध्ये किती फरक ! एक मातृत्वासाठी तर एक ते टाळण्यासाठी...तो आठवण येताच आताही अंगावर शहारे आले...घसा दाटून आला... जीव जणू गुदमरला...डोळे पाणावले... समोरची आकृती अस्पष्ट होऊ लागली... प्रकाशही मंद भासू लागला...का ?...डोळे पाणावले म्हणून ?

नाही, खरोखरच सूर्यास्त झाल्यामुळे प्रकाश मंदावला होता...समोर अथांग सागर... लाटा खडकावर येऊन आदळत होत्या... पाण्याच्या आत गेलेला तो अवघड खडक, एका बाजूला असल्याने निर्मनुष्य अन् एकाकी ...त्यावर खाली पाण्याजवळ पाय भिजवीत बसलेली ती दोघे...सूर्यास्ताचा लालभडक रंग आकाशात पसरलेला...बराचसा पाण्यावर उधळलेला...लाटेबरोबर तुषार अंगावर येत ...पुलकित होऊन मी खूप बडबड करीत होतो; पण ती मात्र मख्खपणे बसून नुसतीच शून्यात पाहात होती...त्याच्या, म्हणजे माझ्या बडबडीला विषय नव्हता...एमेचा अभ्यास, नोकरीसाठी इंटरव्ह्यू, अन् ती लागल्यावर काय काय करावयाचे ते मनोरे... अनेक बेत, अनेक प्लॅन्स...पण ती आपली शांतच...तिचे तोंड बंदच...नेहमी चिवचिव-णारी आज गप्प गप्प का ? आणि तिने तोंड उघडताच माझे बंद झाले...डोळे विस्फारून क्षणभर अवाक्...डोकं सुन्न झालं...समोरचं अथांग पाणी आणि पाठीमागे मलबारहिलच्या गगनचुंबी उत्तुंग बिल्डिंग्ज ह्यामध्ये कुठे तरी खोल खोल गुदमरत आहोत असं काहीसं वाटलं...पाण्यात पायाखालचा तळ नाहीसा व्हावा' तसं काही तरी...तिने हात लांब करून माझा उजवा हात तिच्या दोन्ही तळव्यांत घट्ट धरला...किती तरी वेळ मला पकड जाणवत होती...अंधार पडला होता... लाटांचाच तेवढा आवाज...तिने पर्समधून एक कागद काढला अन् दहा-दहाच्या चार–पाच नोटा...माझ्या हाती देत म्हणाली– 'उद्याला. ह्याच वेळी न् इथच मी वाट पाहीन!' अंधारात कागद वाचता येईना मला. मी विचारलं–

'काय आणायचंय ?'

'इंजेक्शन...सीरिंज, नीडल आणि...ते लिहिलंय ते सारं !'

'म्हणजे ?...म्हणजे तू ?.. तुला...'

'होय.'

'नॉन्सेन्स...त्यापेक्षा तुझ्या पपांकडे जाऊन मागणी घालीन मी !'

'...'–तिचा फक्त एक खोल निश्वास.

'खरंच... चल ... आत्ताच चल ... तुझे पप्पा असतीलच घरी...मी भेटून...'

अंधारात एक नाजुक तळहात माझ्या ओठांवर कुलूप झाला. एक स्पष्ट हुंदका आणि पाठोपाठ अंगावर कुणी तरी कोसळलं माझ्या...त्या दिवशी तिचे एक सर्वस्त्री निराळे रूप मला प्रथमच दिसले...त्या सागराच्या साक्षीने...लाटांच्या आवाजात शब्द कानांवर आले...धीरगंभीर आणि करारी स्वरात–

'तूच म्हणाला होतास ना ? आपल्याला बाळ हवंय–पण पाहिजे तेव्हाच अन् पाहिजे तस्सं–चुकून पदरी पडलेलं नको–आठवतं ना ?–मी हवीय ना तुला ?–कायमची–मग आत्ता माझं ऐक–फक्त एकदाच–जन्मभर मी तुझं ऐकेन–पप्पांचा राग तुला ठाऊक नाहीय–खिशात भरलेलं पिस्तुल असतं ठाऊकाय ?–नेमबाजीत किती मेडलं, पदकं मिळालीत माहित्याय ?–अरे, हाताखालचे डीएसपी थर-थर कापतात तर तुझीमाझी काय कथा–त्यांच्यासमोर तू येशील तो ताठ मानेने ये–नौकरी, पगार सांगून इंप्रेशन पाड अन् हक्कानं मला घेऊन जा–मी तर तुझीच आहे–पण असा खालच्या मानेनं अन् पप्पांकडे ?...'

पुरुषासारखा पुरुष असून मी थिजलो !



उलट तीच मला धीर देऊ लागली...माझी मती गुंग झाली...आणि दुसरें दिवशी त्याच खडकांवर त्याच वेळी तिने पहिले इंजेक्शन घेतले...स्वतःचे स्वतःलाच आणि कमरेच्या शिरेवर...माझं मस्तक आधीच बधिर झालेलं अन् त्यामध्ये हा शॉक...मला ते पहावेना... मी उठून जाऊ लागताच तिने थांबविले– ‘तू जाऊ नकोस. इथंच थांब !’

‘अगं पण... कमरेवरचं...’

‘नथिंग डुइंग–– तू जवळ हवास, नाहीतर सुई टोचायचा धीर होत नाही रे...’

‘इंजेक्शन देणं काय बी. ए.ला होतं ?’

‘जात्यावर बसलं की ओव्या... तस्संच. केळी वुचावर प्रॅक्टिस घरी...’

‘पण मला ते पाहावत नाही. तुला सोसवतं कसं ?’

तिने हात लांबवून माझ्या हातावर ठेवावा–– बोटांची थरथर मंद होई व हळूहळू पक्कड घट्ट होई... ओढलेल्या दबल्या स्वरांना वाट मिळे––

‘अन् मला काय आवड आहे ? हौस आहे ? पण... पण तुझ्याकडे पाहून सहन करते रे मी... तू ताठ मानेनं पप्पांकडे येणार आहेस ना ?... इंजेक्शनच्या वेदनाच काय पण... पण तू जवळ अस !’

‘.........’–– माझे फक्त खांद्यावर थोपटणे.

‘तुला काय सांगू ? अरे, पहिलाच ड्रॉप अंग जाळीत जाळीत जातो. डोक्यात झिणझिण्या उठतात. नाकातून गरम गरम वाफा जाणवतात... अगदी कानातून डोळ्यांतून सुद्धा... वाटतं आता पेट घेणार शरीर... अस्सं ?’

‘अरे, पातळाचा पदर अंगाला ज्वालेप्रमाणं भासतो... पण तुझ्यासाठी... सुई टोचायचा धीर होत नाही... तू जवळ असशील तर सुईच काय भाला पण...’

मी ग्लुकोजचं पाणी देई अन् गप्प करी. रोज एकप्रमाणे पाचच इंजेक्शनांनी, आम्हाला वाचविलं... आम्ही पुन्हा बेत करू लागलो... पप्पांना कसं भेटायचं ? आत्ताच की पहिला पगार घेऊन की... आणि त्याप्रमाणे धीर करून–– ताठ मानेनं–– मी त्यांच्या घरी पोहोचलोसुद्धा... बंगल्याला पोलिसांचा गराडा–– इन्स्पेक्टरांच्या बोडक्या डोक्यांनी चालणाऱ्या हालचाली... शेजारचे कुजबुजत होते चोरट्यांनी असे वार काढले. फोन तोडला- झटापट झाली अशी... पप्पा गेलले होते... त्यांच्या कन्येसह आणि एका चोरासह... दिवाणखान्यात पांढऱ्या कापडात डोक्यावरून पांघरूण घेऊन जणू ती झोपली होती... शांतपणे... गेल्याच आठवड्यात इंजेक्शने घेतली होती आणि... अशीच वेड्याप्रमाणे हट्ट करणारी... अशीच गोरीपान... अशाच दोन वेण्या... असाच बांधा... अशीच पाठ करून बसायची... मग आत्ता समोर आहे ती कोण ?...‘ती’ की ‘ही’?... क्षणभर काहीच सुचेना... काहीही दिसेना... पापण्या जड जड झाल्या... समोर अस्पष्टशी आकृती होती... पण कोण ? ‘ही’ की ‘ती’?

एकाएकी ती आकृती उठली अन् जवळ आली. डोक्यावरून न् पाठीवर थोपटीत म्हणाली–– ‘तुझ्या डोळ्यांत पाणी ? मला साधी सुई टोचली तर ? अन् उद्या बाळंतपणात गेले तर ?–– माझे डोळे पदराने कोरडे केले तिने— अन् स्वतःचेही. आता मी आकृती ओळखली... ती ‘ती’ नव्हती... तर ‘ही’ होती... माझ्याजवळ येऊन बसत मला विचारीत होती...

‘मग ? तुला छान छान बाळ हवंय ना ?’

□ □



पुस्तके

# अपराजिता रमा

लता किणीकर

परंपरागत चालत आलेल्या रूढी आणि बंधने यांच्याविरुद्ध महाराष्ट्रातील एका असामान्य स्त्रीने उठविलेला आवाज आणि त्या आवाजाविरुद्ध उभारले गेलेले बंड ह्यांचे हृद्य चित्रण ' अपराजिता रमा ' ह्या पुस्तकात सौ. ताराबाई साठे यांनी रेखाटले आहे.

स्त्रीमुक्तिआंदोलनाची सुरुवात ही म. फुल्यांपासून सुरू झालेली दिसून येते. चूल आणि मूल ह्या चाकोरीबद्ध जीवनात अडकून पडलेल्या स्त्रीला शिक्षणाची नवी क्षितिजे दाखवण्याचे काम प्रथम फुल्यांनीच केले. त्या काळच्या समाजावर सनातनी विचारांचा पगडा असल्यामुळे तथाकथित सुधारकांना ते रुचले नाही आणि त्यांनी फुल्यांचा छळ करण्यास सुरुवात केली. फुल्यांच्यानंतर पंडिता रमाबाईंनी स्त्रीस्वातंत्र्याच्या चळवळीचे नेतृत्व स्वीकारून एक स्त्री दुसऱ्या स्त्रीला पारंपारिक बंधनातून सोडवू शकते हे दाखवून दिले.

कितीही दूरवर दृष्टिक्षेप टाकला तरी स्त्रीला स्वातंत्र्य देणारी कुटुंबरचना व समाजरचना अजिबात दिसू नये असे निराशेचे मात्र ते दिवस नव्हते, तरीही स्त्रीच्या शिक्षणाने तिला सुख लाभेल व समाजाचेही हीत होईल या सोप्या समीकरणातून बाहेर पडायला हवे हे ताराबाईंना प्रामुख्याने रमाबाईंचे जीवन पहाताना उमगले.

लहानपणापासूनच दैवाने रमाबाईंची परीक्षा घेण्यास सुरुवात केली. अत्यंत बिकट परिस्थितीत वडिलांनी रमाबाईंना देवाच्या भरवंशावर सोडून दिले. आई-वडिलांच्या मृत्यूनंतर रमाबाईंच्या खडतर आयुष्याला सुरुवात झाली. त्यातच भर म्हणून की काय उपासमारीलाही त्यांना तोंड द्यावे लागले. अशाही परिस्थितीत जीवनाचा काही एक शोध घेण्यासाठी, विशिष्ट अर्थ शोधण्यासाठी रमाबाईंनी तीर्थयात्रा, जपजाप्य, पूजा-अर्चा याकडे आपले लक्ष केंद्रित केले; परंतु एवढे सर्व करून त्यांच्या मनात एक प्रकारची विरक्ती निर्माण झाली. परिणामी त्यांचा देवावरील विश्वासच उडाला. तीर्थयात्रा करता करता त्या कलकत्त्याला येऊन पोहोचल्या. कलकत्त्यात त्या वेळी अनेक मतमतांतरे होती. अशा परिस्थितीत रमाबाईंच्या आगमनाला जास्त महत्त्व प्राप्त झाले. रमाबाईंची भूमिका ही पुरुषविरोधी नव्हती तर स्त्रियांचा होणारा छळ व स्त्रियांवर असणारी वेडगळ बंधने यांच्याविरुद्ध त्यांचा लढा होता. लहान मुलींना देवाला वाहाण्याची जी वाईट प्रथा महाराष्ट्रात होती त्याविरुद्ध त्यांनी कलकत्त्यात आवाज उठविला. त्यांच्या ह्या वैचारिक क्रांतीमुळे कलकत्त्यात त्यांचे अपूर्व स्वागत झाले. रमाबाईंच्या आगमनामुळे ब्राह्मोसमाज जागृत झाला आणि रमाबाईंच्या गुणाला पारखणारे बिपिन बिहारीही त्यांना भेटले. सुविद्य आणि सुसंस्कृत बिपिनबाबूंबरोबर रमाबाईंनी विवाह केला; परंतु त्यांच्या मनात हिंदुधर्माविषयी द्वंद्व चालले होते. स्वतःच्या विवाहाबद्दल ' माझी साक्ष ' मध्ये त्या लिहितात—' वाडवडिलांचा धर्मावरील विश्वास उडाल्याने एका शूद्र जातीच्या बंगाली गृहस्थाशी मी लग्न केले. मी व माझे पती यांचा हिंदुधर्मावर अगर ब्राह्मोसमाजावर विश्वास नसल्याने आम्ही इंग्लिश सिव्हिल कायद्याप्रमाणे विवाहबद्ध झालो. '

लग्नानंतर दोन वर्षांनी बिपिनबाबू इहलोक सोडून गेले ! रमाबाईंच्या जीवनातला एक मोठा आधारच कोसळून पडला. हळूहळू त्यांची हिंदुधर्मावरील श्रद्धा कमी होऊ लागली आणि ख्रिश्चन धर्माविषयीची ओढ त्यांच्या मनात निर्माण झाली. पुणे, मुंबई, कलकत्ता इ. ठिकाणी जाऊन त्यांनी आपल्या व्याख्यानांमधून स्त्रीकर्तृत्वाची जाणीव करून दिली. पुरुषाने स्त्रीला कोणत्याही क्षेत्रात कमी लेखू नये असे त्यांनी आग्रहाने प्रतिपादन केले. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी आपल्या व्याख्यानाला पुरुषांनी स्त्रीबरोबरच यावे अशी अट घातली.

समाजाच्या दृष्टिकोनातून स्वतः रमाबाई ह्या विधवा होत्या. बालविवाह आणि विधवेचे सामाजिक स्थान ह्या विवाद्य विषयाबद्दल स्पष्ट बोलणारी बाई पाहून महाराष्ट्रातील तथाकथित ब्राह्मणाळलेला सुधारकसमाज चांगलाच हादरला आणि त्यातूनच नव्या विचारांची क्रांती निर्माण झाली. बालविधवा आणि केशवपन ! स्त्रीशिक्षणाशिवाय ही प्रथा मोडून टाकायला दुसरा कोणता मार्ग होता ? हंटर कमिशनपुढे त्यांनी स्त्रीची अधोगती, स्त्रीला मिळणारी अपमानास्पद वागणूक—छळणूक आणि त्यातून मुक्त होण्यासाठी स्त्री—शिक्षणाची आवश्यकता याबद्दल सविस्तर, अभ्यासपूर्ण साक्ष दिली. ह्यामुळे तत्कालीन कर्मठ आश्चर्यचकित झाले नसते तरच विशेष होते. ह्या महत्त्वपूर्ण साक्षीमुळे रमाबाईंचे नाव परदेशांत गाजले; परंतु एवढ्यावरच त्यांना स्वस्थ बसवेना. त्या इंग्रजी शिकल्या, इंग्लंडमध्ये गेल्या आणि तेथील स्त्रीजीवनाचा त्यांनी सखोल अभ्यास केला. इंग्लंडमधील स्त्री आणि भारतातील स्त्री यांच्यात फार मोठी भीषण तफावत त्यांना दिसून आली. अर्थात ते सहाजिकच होतं. भारतातील स्त्री सामाजिक बंधनात अडकून पडलेली तर इंग्लंडमधील स्त्री ही स्वतःच्या विचारस्वातंत्र्यामुळे स्वतंत्र झालेली. स्त्रीबद्दल भारतात जसे विकृत व संकुचित विचार होते तसे इंग्लंडमध्ये नव्हते. पतिता, वृद्धा, विधवा ह्यांच्यासाठी तेथील सरकारने व समाजाने जी भरीव सेवा व परिपूर्ण योजना केली होती त्याचे स्वरूप रमाबाईंच्या लक्षात आले. ख्रिश्चन लोकांनी त्यांच्याशी केलेला प्रेमळ व्यवहार, मदतीचे आश्वासन आणि धर्मांतराच्या पोटी का होईना पण माणुसकीचा ओलावा पाहून त्यांना ख्रिश्चन धर्माची ओढ लागली.

रमाबाई एका पत्रात लिहितात—' कोणत्या तरी धर्माची मला फार गरज होती. हिंदू

र्मात माझ्यासाठी काहीच आशा नव्हती. ब्राह्मसमाज-पंथ फार काळ टिकणारा नव्हता. खिस्तांत पतितांविषयी वाटणारा कळवळा व अलोट प्रेम माझ्या मैत्रिणीने मला विशद करून सांगितले. हिंदुधर्मात असे काहीच नव्हते. माझी अशी खात्री झाली की, हिंदुस्थान किंवा जगातल्या कोणत्याहि पदतली तुडविल्या जाणाऱ्या स्त्रियांना तोच तारणारा आहे ... स्त्रीजातीचे बंध विमोचन करून त्यांचा उद्धार करण्यास फक्त तोच समर्थ आहे...या प्रकारे ख्रिस्ताच्या मार्गाकडे माझे मन ओढले गेले' आणि याची परिणती १८८३ मध्ये ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यात झाली.

स्त्रीजीवनाचा सखोल विचार करून दुःखाने पीडलेल्या स्त्रियांच्या सेवेसाठी आणि उद्धारासाठी रमाबाईंनी स्वतःला वाहून घेतले. इंग्लंडमधील स्त्रीस्वातंत्र्याविषयी चालवल्या गेलेल्या संस्था आणि स्त्रीस्वातंत्र्याविषयी तळमळीने कार्य करणाऱ्या व्यक्ती पाहून आपल्या देशात करावयाच्या सेवेसाठी त्यांना विलक्षण प्रेरणा मिळाली होती. आर्यमहिलासमाजापासून त्यांनी क्रांतीला सुरुवात केली.

बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
डेक्कन जिमखाना, ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठीं
खास नवीन प्रकार
उबदार
फ्लॅनेल
१४ सुंदर रंगात
व
डिझाइन्समध्ये

हिंदूंच्या रीतीभातींनी व विपरीत रूढींनी त्रासलेल्या असहाय्य विधवांच्या प्रगतीसाठी स्वधर्मात राहून कार्य करणे त्यांना अशक्य वाटत होते. बुरसटलेला समाज, सांस्कृतिक विचारांची फाजील पकड यामुळे कोणत्याही सामाजिक कार्यकर्त्याला अवहेलना, मानसिक तापच पराभूत व परावृत्त करण्यास कारणीभूत होत होता. म्हणून त्यांनी स्वतः धर्मांतर करण्याचा धाडसी व खळबळजनक निर्णय घेतला. धर्मांतराच्या भीषण परिणामांची त्यांना पूर्ण जाणीव होती; परंतु स्त्रियांवर होणारा अनन्वित अन्याय व अत्याचार त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता. स्त्रीउद्धाराच्या तळमळीनेच त्यांनी अखेर धर्मांतर केले आणि त्या ख्रिस्ती झाल्या.

आयुष्यभर स्त्रीस्वातंत्र्याचे व्रत स्विकारणाऱ्या रमाबाईंची तब्येत दिवसेदिवस ढासळत गेली. शेवटपर्यंत त्यांचे चिंतनशील मन त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते. ज्या कार्यासाठी सर्व आयुष्य वेचले त्या कार्याची परिणती पहाण्यासाठी मात्र त्या राहिल्या नाहीत. इ. स. १९२२ च्या ४ एप्रिलला त्यांनी इहलोक सोडला !

'अपराजिता रमा' ह्या रमाबाईंच्या चरित्रातून एका सामान्य स्त्रीने समाजबंधनातून स्त्रीला सोडविण्यासाठी जे अलौकिक कार्य केले त्याचा आलेख पहावयास मिळतो. हा आलेख केवळ सामाजिक कार्याचा नाही तर स्त्रीमुक्तिमार्गावरील झालेल्या आंदोलनाचा आणि स्थित्यंतरांचा इतिहासही आहे आणि तो इतिहास आहे एका तरल, तळमळीच्या कार्यकर्तीचा; पंडिता रमाबाईंचा !

स्त्री म्हणजे पुरुषाची छाया, त्याच्या सेवेत जन्म घालवणे हाच तिचा अस्तित्वहेतू. पतीच्या निकट मित्रांशीसुद्धा दोन शब्द मोकळेपणी बोलण्याची तिला मनाई. अपत्यसंगोपन, गृहकृत्ये ही तिच्या स्वकर्तृत्वाची पूर्ण मर्यादा. अशा प्रकारच्या स्त्रीविषयक समजुती ज्या देशात युगानुयुगे खिळून राहिलेल्या आहेत अशा देशातील एका स्त्रीने देशभगिनींच्या कल्याणासाठी आपले आयुष्य व्यतीत करावे ही गोष्ट निःसंशय संस्मरणीय आहे. 'अपराजिता रमा' ह्या रमाबाईंच्या चरित्रातून त्या काळातील काही रूढ लकबी आपल्याला दिसल्याशिवाय रहात नाहीत.

चरित्र लिहावयाचे म्हणजे काहीशा वर्णनात्मक पद्धतीने आपल्याला वाचकाला एक गोष्ट सांगायची आहे याच सुरात त्यांचे पुष्कळसे सांगणे येते. पूर्णपणे बहिर्मुख वा अंतर्मुख रहाणे शक्यच नसते— कारण नव्या मनाइतकेच नव्या जगाचे दृश्य तपशीलही त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे असतात; पण वाचकसापेक्षतेने कुठला ना कुठला 'मुखवटा' चढवून पोकळ आव घेऊन लिहावे, ही यशाच्या लोभाने घेतली जाणारी भूमिका मात्र त्यांच्या ठिकाणी चुकूनही आढळत नाही. ताराबाईंना रमाबाईंबद्दल खूप कुतूहल असले, कौतुक असले, आदर असला तरी त्यासाठी त्या त्यांना देवता मानत नाहीत किंवा चरित्रापासून सर्वांनी बोध घ्यावा हे मनात असूनही आपल्या स्वप्नातील सुशिक्षित स्त्रीच्या प्रतिमेसारखी रमाबाईंना आपण दाखवावे असेही त्या ठरवीत नाहीत. एक स्त्री म्हणून रमाबाईंना प्रत्येक क्षेत्रातील जे पुढारलेपण आहे, धीटपणा अगर भित्रेपणा आहे, हे सर्व काही असणे साहजिक आहे. ते सगळे काही तसेच असणे स्वाभाविक आहे. ते आहे तसेच सांगावे अशी ताराबाईंची सरळ भूमिका आहे.

पंडिता रमाबाईंच्या चरित्रात एक प्रकारचा जिवंतपणा आहे-एक प्रकारची प्रेरणा आहे. कठोर सत्याचे चित्रण करताना श्रीमती ताराबाई साठे यांनी त्या भावनेत वाहून जाऊन आपले मत व्यक्त केले आहे. यंदाच्या ह्या आंतरराष्ट्रीय महिलावर्षाच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय जगात विदुषी व संतस्त्री म्हणून नाव मिळालेल्या पंडिता रमाबाईंबद्दल ताराबाई साठे ह्यांनी हे चरित्र लिहून रमाबाईंच्या ऋणातून अंशतः मुक्त होण्याचा जो प्रयत्न केला तो यशस्वी झाला आह.

केवळ चरित्रकथन करणे हा या पुस्तकाचा उद्देश नसून रमाबाईंनी जी काही कार्ये हाताळली ती यापुढे स्त्रियांनी पूर्णत्वास नेणे हाच हेतू आहे. ताराबाई साठ्यांनी लिहिलेले हे चरित्र म्हणजे भगिनीसमाजात व मराठी साहित्यात एक मोठी मौल्यवान भर आहे असे म्हणावे लागेल. ❊

**'अपराजिता रमा** : सौ. ताराबाई साठे. प्रकाशक–दा. पु. नगरकर, ७५९/४५ डेक्कन जिमखाना, पुणे. पृष्ठे – २२९. मूल्य १८ रु. □ □

## मागणी तसा पुरवठा या तत्त्वावर चालणाऱ्या बाजारात मागणीला पाठ फिरवणारे आणि नव्या वाटांचा प्रामाणिक शोध घेणारे पंचाहत्तरचे तीन चित्रपट

# ॥ रजनीगंधा ॥ अंकुर ॥ निशान्त ॥

अशोक प्रभाकर डांगे

हिंदी चित्रपट ही एक अजब चीज आहे. तो एक मस्त अजवखाना आहे. जगातली अगदी सगळी आश्चर्ये तिथे दिसतात आणि घडतात. वॉल्ट डिस्नेच्या मायानगरीला मागं सारणारी. ह्या चित्रपटविश्वात माणसं पूर्वी हजारात–लाखात बोलायची. आता ती कोटचवधीच्या टर्नओव्हरमध्ये वावरतात. ह्यात पार्ट असतात. ओल्या-कोरडचा पार्टर्या असतात. गॉसिपसच्या देखण्या झुंडी असतात. मध्यरात्री फोन फिरवून, बेड डायलॉग टाकणारे चमचे असतात. नायिकांच्या वयात येण्याच्या जाहिराती झळकतात. नायकांचे खरे-खोटे बर्थ-डे असतात. इथे खोटे तारे असतात. स्टेजवर चार शब्द बरळून जाणारे सितारे असतात. हजारो-लाखोंचा पॉकेटमनी पुरत नाही म्हणून रडणाऱ्या त्यांच्या कांगावखोर बायका असतात. इथे फेका असतात, फिरक्या असतात. इथे यशाचे छोटे पेग असतात; अपयशाचे मोठे पेग असतात. सदैव हिरवे हिरो असतात. निवर अंगाच्या हिरॉइन्स असतात. इथे लफडचांच्या कोंबडचा शिजतात, अफवांच्या तंदुरी भाजतात. इथे सामान्य कृती उठविल्या जातात. बऱ्या निर्मिती झोपवल्या जातात. एकाची चालू किंमत एखाद्या क्षणी व्लॅकमध्ये जाते तर दुसऱ्याची चालू नाणी चालू बाजारात खोटी ठरतात. इथले लोक खोटचाची मोहोळं उठवतात आणि मिळाल्या प्रसिद्धीखाली मस्त झोपतात. इथे कोणाची ना कोणाची प्रेमं जमतात. न जमल्यास कोणीही जमवून देतात. इथे नव्या-जुन्या लग्नांच्या घोषणा दिल्या जातात आणि मग नकारांच्या लटक्या फैरीही झडतात. इथे लोक क्रेझ म्हणून लग्नं करतात. क्रेझ म्हणून प्रेमंही करतात आणि मग क्रेझ म्हणूनच जमलेली लग्नं मोडण्याच्या मागे लागतात किंवा ती मोडलेली पाहून काही जण खूशही होतात. ह्या चित्रपटसृष्टीत गमावले–मिळवलेले फॉर्म असतात. प्रत्येकाचे वेगळे आचार असतात. बरेच जण लाचार असतात. येथे जशा संहिता असतात तशाच अहंता असतात. विकार असतात. विकृती असतात. इथले तरुण हमाली करून हिरो होतात आणि काही तरुणी गोड हसून मोठ्या होतात. इथे हिरोजपेक्षा त्यांच्या खऱ्या-खोट्या बायकाच गाजतात आणि हिरॉइन्सपेक्षा त्यांच्या हिरव्या म्हाताऱ्यांनाच लोक मस्का मारतात.

हिंदी चित्रपटसृष्टीत ऋतु वरचेवर पालटतात. कधी तुफान हाणामाऱ्या थैमान घालतात, तर कधी स्मगलर्स भाव खाऊन जातात. गॅम्बलर्स तर नेहमीचेच असतात. कधी हळव्या प्रेमाच्या हळुवार गप्पा रंगतात तर कधी प्रणयशास्त्राचे धडे दिले जातात. इथे कधी एकात्मतेचे उमाळे येतात तर कधी देशभक्तीच्या वावटळी येतात. इथे कधी हत्ती-वाघांचे दिवस असतात, तर कधी हिरोपेक्षा माकडंसुद्धा मोठी ठरतात. इथे रहस्यमय कथानकं वावरतात, थरारक पाठलाग झडतात आणि माणसं तर नेहमीच मरतात. कधी सोईनुसार मारावी लागतात, मरावी लागतात. ह्या चित्रपटसृष्टीशी कोणीही सलगी करतात. डाकू असतात. डॉक्टर चालतात. मास्तर असतात. पुढारी चालतात. डाकू असो डॉक्टर; पुढारी असो मास्तर; ते पडद्यावर तरी छान छान बोलतात. इथले लढे लोकांसाठी असतात. इथले खून, प्रणय, प्रेम, बलात्कार लोकांसाठी असतात. माहीत नसलेलं खूप शिकवतात. माहीत असलेलं विसरवून सोडतात. इथले चित्रपट कधी केवळ नायकांमुळे मोठे होतात, तर कधी नायिकांसाठी पाहिले जातात. इथे कधी स्टोऱ्या खपतात. दिग्दर्शक धंदा करतात तर कधी कॅमेरेसुद्धा वेळ मारून नेतात.

हिंदी चित्रपटसृष्टी अशीच आहे, ती अशीच होती आणि असणारही आहे. इथल्या पिढचा गल्ल्यांवर जन्माला येतात, गल्ल्यांबरोबरच वाढतात आणि गल्ल्यांबरोबरच नष्ट होतात. इथला हरएक यशस्वी त्या त्या काळाला सामोरा जातो आणि मागणीला पाठ फिरवणारा अपयशी गणला जातो. अवास्तवाच्या ह्या वावटळीत, ढोंगाच्या धुंदीत काहीजण नवे म्हणून पुढे येतात. ह्या माणसांना विचार नावाची गोष्ट समजते. वास्तवता पचनी पडते. त्यांची नवी जाणीव मोठी असते. अशी माणसं सच्च्या निर्मितीचा पुरस्कार करतात. चलती नाणी फेकून देतात. बॉक्सऑफिसवर लाथ मारतात. ही माणसं नव्या वाटा निवडतात. नवे रस्ते खणू पाहतात. नव्याच्या शोधासाठी नवी निर्मिती

उभी करतात. इथेच चित्रपटाच्या एका नव्या पिढीचा जन्म होतो. प्रत्येक काळाच्या संदर्भात नवी माणसं जन्म घेतात; पण प्रत्येकाचं नवेपण नव्या मापांनी मोजलं जातं. इतकी की आजचं वास्तव उद्याचं अवास्तव ठरू शकतं. अपयश पाठीवर घेऊन केलेल्या नव्या वाटचाली नेहमीच लक्षणीय ठरतात. ह्या निर्मितीला ते नव्या लाटा म्हणतात. समांतर चित्र म्हणतात. तसं काहीही म्हणू शकतात. हिंदी चित्रपटांची अवास्तवता ओलांडून जाणारी अशीच एक नवी लाट आली आहे. ह्या साऱ्या नव्याचा विचार करताना नवी मूल्ये घडवावी लागतात आणि जुनी सारी हद्दपार करावी लागतात. ही सारी नवी निर्मिती कुणा एकाच्याच प्रतिभेची परिणीती नसते म्हणूनच त्यांची नवी घडण संघटितपणेच पाहवी लागते. नव्या चित्रपटांची ही पिढीसुद्धा उद्या वृद्ध होईल. नवी लाट विरघळून जाईल. नवी मूल्यं मोडीत निघतील तेव्हा हिंदी चित्रपटसृष्टीत आणखी कोणी नवे पुढे होतील. आणखी एका नव्या पिढीला जन्माला घालतील. निर्मितीची प्रक्रिया अशीच घडत असते. हिंदी चित्रपटसृष्टीत आणखी एक नवा ऋतू आला आहे. आजचा काळच त्याचा निर्माता आहे. म्हणूनच ह्या काळाची मोजमापं लावूनच ह्या नव्या चित्रपटाचं यशापयश मोजावं लागेल.

सारा आकाशनंतरची बासू चटर्जींची लक्षणीय निर्मिती म्हणजे रजनीगंधा. तसं प्रेम ही गोष्ट अगदी सार्वत्रिकच आहे. प्रत्येक जणच आपल्या आयुष्यात तिचा आविष्कार करत असतो. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष. काही मनं उघड उघड प्रेम घडवितात, तर काही मनं प्रेमाचं भान 'अंतर्मुख' करून सोडतात; पण व्यक्तीच्या जीवनात प्रेम ही गोष्ट सहसा उपेक्षणीय होऊच शकत नाही. बासूचा हा चित्रपट त्याच्या सारा आकाशएवढाच सरळ आहे. सारा आकाशमध्ये बासू एका कोंडलेल्या तरुण मनाचा हळवा प्रवास दाखवितो, तर रजनीगंधामध्ये तो एक हलकी-फुलकी प्रेमकहाणी घडवीत जातो. दीपा नावाच्या स्त्रीची दोन पुरुषांनी केलेली कोंडी तो चित्रित करतो.'

रजनीगंधातली दीपा तशी सर्वसामान्य नायिका नाही. ती सामान्य परिस्थितीतून वर आलेली एखादी मध्यमवर्गीय तरुणी नाही. तसा तिचा भाऊ चांगला श्रीमंत आहे. दिल्लीतल्याच त्याच्या अलीशान फ्लॅटमध्येच ती रहाते. तसे तिच्या सेवेला नोकरचाकर सुद्धा आहेत आणि त्याबरोबरच ती सुसंस्कृत सुद्धा आहे. चांगली डबल ग्रॅज्युएट, एम. ए. पदवी लावते. शिवाय उच्चभ्रूपणातून मिळालेला देखणेपणाचा वारसाही तिच्याकडे आलाय; पण त्याच उच्चभ्रूपणाच्या पोटी जन्माला येणारा भपकेबाजपणा तिच्यात शोधूनही सापडत नाही. बासूची ही नायिका मात्र विलक्षण हळवी आहे. म्हणूनच संजयसारख्या माणसावर तिचं प्रेम जडलंय. बासूनं एक सोडून दोघांना नायक म्हणून उभारलं. त्यातला संजय विलक्षण भावडा आहे, तर नवीन तितकाच अंतर्मुख आहे. संजय मनानं भलताच मोकळा अन् बडबड्या. स्वभावानं गमतीदार दिसतो, तर नवीन तितकाच अबोल, गहिरा. हा करडा माणूस आपल्या साऱ्याच भावना गोगो गॉगलच्या आड सहज दडवून ठेवतो. संजय स्वभावानं उतावळा, तर नवीन धीरगंभीर आहे. संजय परिस्थितीनं सुद्धा वेगळा आहे. कॉलेज झाल्यावर तो सरळ नोकरीत चिकटलाय. आपल्याच चाकोरीशी बांधला गेलाय. ऑफिस, बॉस, प्रमोशन हेच त्याचं सर्वस्व आहे. म्हणूनच चमचेगिरी करणारा मद्रासी सहकारी किंवा आपल्याच माणसाला लिफ्ट देणारा त्याचा साहेब, हे सारेच त्याला झपाटणारे विषय आहेत. इतके की बागेतल्या सुंदर लॉनवर त्याच्याबरोबर हातात हात टाकून तिनं बागडत असावं आणि नेमकं याला ऑफिसच आठवावं किंवा तिला घेऊन त्यानं छानशा कॅफेत जावं आणि पलीकडच्या टेबलावर आपली गॅंग दिसताच तिथं चिकटावं. युनियनच्या गोष्टी फर्माव्यात. वर अन्यायाविरुद्धच्या त्याच्या लढ्याबद्दल एक जबर भाषणही सुनवावं. कारण याचा पिंडच मनमोकळा. युनियनचा सेक्रेटरी असल्यानं तितकाच सार्वजनिक आणि एवढं होईतो तिनं एकट्यानंच कॉफी निवेस्तोवर बसून रहावं. मग रागवावं अन नव्या दिल्लीच्या सुंदर रस्त्यावर तिचा राग काढला जावा. परत याला ऑफिस आठवावं. याचं सारं सारं असंच; पण तरीसुद्धा हिचं त्याच्या भाबडेपणावर प्रेम. अगदी असावं तेवढं. बासूचा दुसरा नायक नवीन. हा मुंबईत रहाणारा चांगला प्रथितयश कलाकार. चांगल्या चांगल्या कमर्शियल फिल्म तयार करणारा. संजयपेक्षा तर खूपच वरच्या परिस्थितीचा. बासू वातावरण, मनःस्थिती आणि आर्थिक बळ यातली विसंगती हेतुतः निर्माण करताना दिसतो. कारण ही विसंगतीच माणसांच्या मोठेपणाचा कस ठरवीत असते. आता संजय हा दीपाचा अलीकडचा प्रियकर तर नवीन पूर्वीचा. नवीन मुंबईच्या कॉलेजात असताना भेटलेला, तर संजय दिल्लीच्या एका परीक्षेच्या दिवशी ओळखीचा झालेला. नवीनवर तिचं पूर्व तारुण्यातलं प्रेम. त्याच्या वहात्या व्यक्तिमत्त्वानं बहरलेलं आणि तितकंच अधीरपणे तोडलेलं तिनंच. कारण तो कॉलेजयुनियनचा सेक्रेटरी म्हणून वर्ग बंद पाडतो. पिकेटिंगला उभा रहातो, तर संप मोडायला पहिली कारण दीपा. कारण ह्याचं न ऐकता ती हट्टानं पीरिअडला जाते. मग हा मनस्वी माणूस खवळतो. संबंध तोडून टाकण्याची धमकी खरीच करतो. ही नंतर खूप रडते, चरफडते; पण नवीन परतण्यातला माणूस नसतो; पण ही त्याला विसरणार कशी? ही लेक्चररच्या इंटरव्ह्यूला मुंबईला येते तेव्हा नवीनच तिला पहिला भेटतो. पहिलं प्रेम विसरण्यासारखं सोपं नसतं. म्हणून तर ही परत संजयला थोडंसं विसरून नवीनचा शोध घेते. त्याचं वय चेहऱ्यावर उतरलेलं; पण हा तसाच मनानं, विचारानं. तिला वाटतं ह्यानं खूप मोकळं व्हावं; पण तेही होत नाही. शक्यच नसतं.

बासू संजय आणि नवीन यांची घडणच वेगळी घडवतो. संजय सर्वसामान्य परिस्थितीत जगणारा क्लार्क माणूस. भावडा दिसला तरी आपल्या मर्यादा पुरत्या ओळखून असतो. म्हणूनच दीपाबरोबर तो कुठेही असो तिच्या शिक्षणाचं, परिस्थितीचं त्याचं भान सुटू शकत नाही. तो नेहमीच तिला चिडवतो. तू स्कॉलर. मोठी. डॉक्टरेट होणार. माझ्यासारखा फालतू माणूस तुला शोभणार? पण प्रेमाला तसा पर्यायच नसतो. दीपाचं मन तसं चांगलंच मोठं असतं म्हणूनच ह्या हलक्या विचारांच्या ते कधी वाट्यालाही जात नाही आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या ऊर्मीनं तिला झपाटलेलंही असतं. शिवाय संजयसारख्या प्रांजळ माणसाच्या बाबतीत

असे विचार येणंसुद्धा अगदीच अशक्य ठरतं. बासूचा नवीन मात्र अगदी वेगळा. उंचीच्या व्यक्तिमत्त्वाचा. नवीन तसा पैशानं चांगलाच स्थिरावलेला. म्हणून धंद्याला साजेशी देखणी दाढी राखणारा. उंची सिगारेटसूचे पफ घेणारा. तितकाच वागण्यालाही डीसेंट ! संजयसारखा अघळ-पघळ तर निश्चितच नाही. तो दीपाला मुंबईभर फिरवतो. साइट सीइंग करतो. मलबारहिलवरच्या उंची टेरेस हॉटेलवर नेतो. तिला तसं हे सारं नवीन नसतं, अपरिचित नसतं. तिला दिसतो पूर्वीचाच नवीन. मोजकं बोलणारा. झपाट्यानं चालणारा. सारंच तिला जवळचं असतं. म्हणूनच तिला अस्वस्थ करून सोडतं; पण बासू नवीनला वेगळाच घडवत असतो. आपल्याला जाणवते ती त्याची जाणती तटस्थता. तिला पराभूत करण्याची ऊर्मी. प्रेम नावाची गोष्ट लपवून ठेवण्याची धडपड. बासू आपल्याला सारं काही कॅमेरा फ्रीज करून दाखवतो. दोघांच्याही भावना हलत्या करून सोडतो. संजयची भूमिका सच्ची वाटते. नवीनचा अहंकार बोचू लागतो. आपली पातळी राखून जगणारा नवीन तिचा मोठेपणा, तिची व्यक्तिमत्त्वाची घडण जाणण्याइतका मोठा कधीच होत नाही. कारण नवीनचा अहंकारही तितकाच मोठा असतो आणि म्हणूनच दीपाच्या पराभवात तो धन्यता मानू पहातो आणि तसाच वावरतही रहातो. आपलं प्रेम तो मोठेपणातून सिद्ध करू पहातो, जे संजय आपल्या छोटेपणातून साध्य करतो. म्हणूनच नवीन दीपाला आपल्या हायक्लासमधील ओळखींचा उपयोग करून लेक्चररची नोकरी मिळवून देऊ पहातो, त्याचा हा मोठेपणाचा तोरा म्हणूनच आपल्याला झोंबत जातो. कदाचित नवीन त्यातून आपल्या मनाचा मोठेपणाही दीपापुढे सिद्ध करू पहात असेल; पण निदान आपल्या हिशोबी तरी तो अपयशीच ठरतो.

### मनाचा सच्चेपणा

दीपा ही अखेर स्त्रीच असते. तिच्या हळव्या मनाला बासू चटर्जी चांगलंच कोंडीत पकडतो. नवीनचं व्यक्तिमत्त्व आपल्याला तरी खोटं वाटतं. त्याच्या प्रेमाचा आविर्भाव उसना वाटतो. निदान बासू तरी त्याला तसाच उभा करतो. घटना-घटनांतून जाणवून देतो; पण दीपाला नुसतं प्रेमच कळतं. प्रेमाचा आविष्कार पहाण्याइतकं ते मुरब्बी नसतं किंवा तटस्थही नसतं. संजयचं काय किंवा नवीनचं काय दोन्ही प्रमंच की ! मग फरक कसला ? फरक हा सच्चेपणात असतो. मनाचा सच्चेपणा माणसाला मोठा करतो; पण संजयचा सच्चेपणा नवीनच्या तटस्थ प्रेमापेक्षा जवळचा आहे हे दीपाला कधीच उमगत नाही. येवढी शिकली-सवरलेली स्त्री तिथे मात्र अपयशी ठरते आणि दोघांनाही एकाच मापानं मोजते. दिल्लीला परतल्यावर ती चांगलीच अस्वस्थ होते नवीनच्या प्रेमाच्या जाणिवेनं. नेमका तेव्हा संजय सुद्धा टूरवर गेलेला. मग तर भरच पडते. तिला उगाचच वाटतं नवीनचं पत्र यावं, त्यानं आपलं प्रेम व्यक्त करावं, लिहावं. ती वाट पहाते पोस्टमनची. अखेर पत्र येतं. नवीनचंच. लेक्चरर म्हणून निवड झाल्याबद्दल. बाकी काहीच नाही. तिला धक्काच बसतो. याचना नाही, माफी नाही, मनधरणी नाही प्रेम तर नाहीच नाही ! असतं येवढंच. बाकीचं नंतर ! शेष बादमें ! वास्तविक आपल्याला नवीनकडून आणखी काही अपेक्षितच नसतं. कारण प्रेम सरळ कबूल करण्यायेवढं त्याचं मन कधी मोठं नसतंच. हिला मात्र भरोसा मोठा असतो आणि तो तितकाच खोटाही ठरतो. ती चांगली खचते. शेष बादमेत घुटमळू लागते. आशेचे खोटे धागे विणू पहाते; पण संजय तिला तेही करू देत नाही. प्रमोशन मिळवून मोठ्या झालेल्या संजयला मनःपूर्वक सामोरं जाण्यातच तिचं भवितव्य निश्चित होतं.

बासू चटर्जी ह्या विलक्षण सरळ साध्या प्रेमकहाणीला निशिगंधाचं व्यक्तिमत्त्व देतो. मन उजळ करणारा निशिगंध दीपाचा आत्मा असतो. तिच्या मनाची बूज राखणारा संजय म्हणून तर त्याच फुलांनी तिची व आपली भेट महकून सोडतो. बासूचा आशय मात्र आणखी मोठा असतो. ह्या सरळ, साध्या, पांढऱ्याशुभ्र पण जरा रांगड्या फुलांतून तो संजयचं व्यक्तिमत्त्व शोधत रहातो. तसंच सरळ साध्या मोहक दीपाचं प्रेमही गंधित करतो.

श्याम बेनेगल चित्रपटसृष्टीत आला तो मळी अंकुरचं यश घेऊन. ब्लेझच्या बेनेगलचा निशान्त सुद्धा वेगळीच निर्मिती म्हणूनच पाहिला गेला आणि यशस्वी ठरला. ह्या दोन सुसंघटित आणि सुंदर चित्रपटांच्या निर्मितीबरोबरच श्याम बेनेगल अस्थिर हिंदी चित्रपटसृष्टीत सुस्थिर झाला. तसं पाहिलं तर पंचेचाळीस सालाच्या आसपास घडलेल्या ह्या वास्तव चित्रपटांचे विषय भारतीय प्रेक्षकांना नवीन कधीच नव्हते. 'जमीनदारी हाच ह्या दोन्ही चित्रांचा कणा आहे आणि त्यातून निर्माण होणारा अन्याय आणि अन्यायाच्या परिणामी तेथे अटळ म्हणून उभा राहिलेला संघर्षच बेनेगलनी चित्रित केला आहे; पण समस्या जरी नव्या नसल्या तरी त्यांची घडण मात्र निश्चितच नवी ठरली. जसा दोन्ही कथांना बंदिस्त करणारा अन्याय तिथे होता तसाच अन्यायामागून आवश्यक म्हणून चालत येणारा न्यायही तेथे उपस्थित असतो.

अंकुर काय किंवा निशान्त काय दोन्ही अन्यायाचीच प्रतीकं; पण अंकुरमधला अन्याय बराचसा वैयक्तिक व्यक्तिमत्त्वाचा असतो तर निशान्तमधला अन्याय विलक्षण




VP-735

सुसंघटित असतो. अंकुरमधला छोटेबाबू हा एका पिढीजात जमीनदाराचा पोरगा. कॉलेजची परीक्षा पास झालेला. शहरी वातावरणात गढलेला. त्यातनं लग्नही ठरलेलं. त्याची स्वाभाविकच शिकायची इच्छा मोठी. बी. ए. व्हायचंय त्याला; पण बाप तितकाच कणखर व्यवहारी शिकून कोणाचं भलं झालंय? शेतीची देखभाल कोण करणार? तुझा बाप! बायकोला कोण पोसणार? असे प्रश्न विचारून त्याची शिक्षणाची हौस डावलणारा आणि अखेर लग्न करून त्याची शेती-वाडीवर पाठवणी करणारा. आता अंकुरमधला सारा अन्यायच छोटेबाबूभोवती घुटमळत राहतो; पण बेनेगलचा दुसरा विशेष चित्रपट निशान्तमधला अन्याय मात्र भिन्न प्रवृत्तींचं प्रवर्तन करतो. एकाच जमीनदार कुटुंबातले चार भाऊ. थोरला जास्त महत्त्वाचा. ते सारे त्याला अण्णा म्हणतात. मधले दोन आणि मग धाकटा विश्वम. जमीनदारी म्हटली की संपत्ती आलीच. तिच्यातून येणारा अधिकारही विचारात घ्यायलाच हवा आणि तो टिकवून ठेवायचा म्हणजे संपत्तीची राखण करायलाच हवी. मधले थोडे आडदांड, मनानं आणि शरीरानंही. त्यांचा अन्याय बेनेगल विलक्षण संघटित करून सोडतो. थोरल्याच्या मार्गदर्शनाखाली ते शिस्तबद्ध झुंडशाही माजवतात.

अंकुरमधला छोटेबाबू आपल्या गावातल्या सुंदर कौलारू घरात येऊन पोहोचतो आणि लगेच त्या मातीचे गुण त्याच्या रक्तात झळकू लागतात. इथे सारं काही सुंदर असतं. बेनेगलचा देखणा कॅमेराच तो जाणीवपूर्वक टिपत जातो. इथे भाताची छान हिरवी शेतं असतात. देखणी झाडी असते. ताडाचे शेंडे डोलतात. अवाढव्य बांधलेल्या विहिरी असतात. शहरी जीवनाला मागे टाकणारं सारं काही असतं. म्हणूनच त्या एकाकीपणाला हा शहरी छोटेबाबू सुरुवातीलाच भयंकर उबगून जातो. त्याच्या भावनांचा कोंडमारा होऊन बसतो. शिवाय अधिकाराची ऊर्मी सुद्धा बळावते आणि मग तो आपल्या विहिरीवर पाणी भरण्यास स्त्रियांना बंदी घालतो. खरा अन्याय तो प्रतापवर करतो. प्रताप त्याच्याच बापाचा; पण अनौरस मुलगा. त्या स्त्रीला त्यानं थोडी शेती निर्वाहासाठी बहाल केलेली. छोटेबाबूचा तिच्यावर आधीचाच राग. इतका की तिचं त्यांच्या शहरातील घरी येणं-जाणं सुद्धा त्याला अमान्य. त्याच्याचबरोबर प्रतापचं लग्न लावण्याची तिची विनंती तर त्याला पूर्वीपासनंच झोंबलेली म्हणूनच डावलली गेलेली. आता इथे तो संधी साधतो. आपल्या पंपानं प्रतापच्या शेतांना पुरवलेलं पाणी तो तोडून टाकतो. शेतं सुकू लागतात. प्रतापच्या, 'बाबांना सांगीन!' ह्या धमकीला छोटेबाबू भीक घालत नाही.

## निशान्त : अन्यायाचे प्रभावी दर्शन

निशान्तमध्ये सुद्धा हाच अन्याय बेनेगल समर्थपणे राबवतो. येथे अण्णा नावाच्या माणसाची भूमिका प्रभावानं उभारतो. थोरला तसा कणखर असतो. पोशिंद्या माणसानं असावं तसं. मधले दोघे सारखे एकत्रच वावरतात. मोटारसायकलीवर घुमतात. आपला हक्क म्हणून बाजारात विकण्यास आलेल्या कोंबड्या पळवतात. आपल्या घरची कामं नेहमी फुकटच करून घेतात. कधीही कोणाच्याही शेतात घुसतात. बऱ्या दिसणाऱ्या दुसऱ्याच्या बायकांना सरळ रात्री वाड्यावरच बोलावून घेतात. थोरल्याचा मान ठेवतात. तो म्हणाला, म्हणूनच दुसऱ्याचं पीक पळवतात. गावचा पोलीसपाटीलही ह्यांचाच चमचा असतो. किंबहुना त्याला तसं रहाणंच भाग असतं. स्वाभाविकच हे म्हणतील तोच न्याय असतो, हे म्हणतील तोच अन्याय ठरतो. ह्यांचे आदेश पाळल्याशिवाय पोलीसपाटलाला दुसरं कामच उरत नाही. प्रत्येक कृती ते अण्णाच्या नावावर करतात. म्हणून तर प्रत्येक अन्यायात अण्णाची नकळत हजेरी असतेच. ह्यांचं व्यक्तिमत्त्वच बेनेगल पूरक करून टाकतो. म्हणूनच हे एकत्रच रहातात, एकत्रच पितात, एकत्रच झोपतात. अन्यायाचे प्रवर्तन बेनेगल त्यांच्याद्वारे समर्थपणे करीत रहातो. हे स्त्रिया सुद्धा एकमेकांच्या समजुतीनं भोगतात. तशी ह्यातल्या एकाची स्त्री पळून गेलेली. दुसरीनं विहिरीत जीव देऊन मेलेली म्हणजे त्या दोघीही ह्यांच्याच अन्यायाच्या बळी ठरलेल्या. अण्णा वागणुकीत करडा, तो एकटाच जगतो. कारण त्यानं लग्नच न केलेलं. आपल्या साऱ्याच कुटुंबाला तो आपल्या समर्थ सावलीखाली झाकून टाकतो. साऱ्या कुटुंबाचंच हित जपतो. आपल्या व्यक्तिमत्त्वातला आवेग तो आपल्या चेहऱ्यावर सहज मिरवीत फिरतो. आपल्या अधिकाराचं, मानाच्या स्थानाचं भान हा सतत राखून असतो; पण आयुष्यात जगावी लागणारी अटळ एकाकी भूमिका बेनेगलच्या ह्या नायकालाही कुरतडत रहाते. अण्णाची फरफट मोठी होते. म्हणूनच तो आपल्या उद्ध्वस्त-रात्री एकसारख्या पिऊनच पार पाडतो. पिऊनही मागे उरतो. ह्या साऱ्या वावटळीत त्याचा आत्माही जागा असतो. जमीनदारी नावाची चीज त्याच्या नसानसातून वाहात असते. आपल्या अधिकारक्षेत्रावर तो मिरासदारी गाजवतो. दुसऱ्याच्या जमिनी लुबाडतो. उभी पिकं काढून पळवतो; पण आपल्या सत्तेची राखण करत असतानाच तो कुलाचारांचीही जतन करतो. एकीकडे मधल्या दोघांकडून अत्याचार घडवून आणणारा हा माणूस आपल्या कुटुंबाला मात्र न्याय देतानाच दिसतो. आपल्या भावांचे उपभोग घरामध्ये चालवून घेणारा अण्णा आपल्या घरातल्या एकुलत्या एक स्त्रीला विश्वमच्या बायकोच्या रुक्मिणीच्या भावनांची मात्र नेहमी कदर करतो. हा विलक्षण निर्दय माणूस तिला मात्र माणुसकीपूर्ण वागणूक देतो. बेनेगलच्या निशान्तभर याच माणसाचा मोठा प्रभाव जाणवतो. कदाचित त्याची वडीलकीही त्याला मोठा करून सोडते. तसाच त्याचा कौटुंबिक न्यायही त्याला अधिक मोठा करतो. म्हणूनच धाकट्या विश्वमला ओकेस्तो पाजणारे मधले दोघे अण्णाच्या बाहेर नसतात. धाकटा विश्वम तर इतका त्याला घाबरतो की बंदूक घेऊन पाखरं मारायला जायची परवानगी मागताना सुद्धा हा अण्णापुढं लटपटतो. बेनेगल अंकुरचं चित्रण जमीनदाराच्या तरुण मुलाभोवती केन्द्रित करतो तर निशान्तमधली जमीनदारी तो मुख्यतः अण्णा ह्या थोरल्या जमीनदाराभोवती उभी करतो.

श्याम बेनेगल अंकुरमध्ये लक्ष्मीला तर निशान्तमध्ये सुशीलाला आपल्या अन्यायाचे बळी म्हणून घडवतो. ह्या दोन्ही स्त्रिया मूलभूत प्रवृत्तींनी अतिशय वेगळ्या आणि म्हणूनच अतिशय प्रभावी ठरतात. त्यातली अंकुरमधली लक्ष्मी ही अडाणी, अशिक्षित. त्यातूनही अस्पृश्य. म्हणून तिच्यावरील अन्यायाच्या मर्यादांची शक्यतासुद्धा मोठी असू शकते; तर निशान्तमधली सुशीला

एका मास्तराची पत्नी. स्पृश्य. म्हणूनच तिच्यावरील अन्याय मर्यादित ठरू शकतो; पण बेनेगल आपल्या पात्रांच्या वास्तवाशी संपूर्ण इमान राखताना दिसतो. म्हणूनच अंकुरमधल्या लक्ष्मीवरचा अन्याय तो वैयक्तिक प्रक्रियांत मर्यादित करतो, तर सुशीलाचा अन्याय तो सार्वत्रिक करून सोडतो.

लक्ष्मीला बेनेगल प्रथम गावच्या मिरवणुकीत रंगवलेले करे डोक्यावरून वाहून नेताना दाखवतो. तिची मर्यादित भूमिका तो स्पष्ट करून टाकतो. नंतर तिचं अस्पृश्यपण तो छोटेबाबूकरवी उघड करतो. कारण छोटेबाबूला चहा करून द्यायला सुरुवातीलाच लक्ष्मी नकार देते. वास्तविक ती त्याच्याच घरात नोकर म्हणून वावरते. व्यवहार पहाते; पण पुजाऱ्याच्या धाकाखाली मात्र वावरते. कारण दर वेळी तो काय म्हणेल हाच तिचा सवाल असतो. जो धर्म करे घेऊन जाण्याचं लक्ष्मीचं कर्तव्य धर्मकृत्य मानतो तोच धर्म तिला दुसऱ्याला पाणी देऊ देण्यातदेखील अधर्म मानतो. सुरुवातीच्या मिरवणुकीचा संदर्भ बेनेगल असाच उघडा करून टाकतो; पण ह्या अस्पृश्यतेच्या संदर्भात मात्र बेनेगल फारसा घुटमळत रहात नाही. कारण छोटेबाबूच तसं काही मानायला तयार नसतो. म्हणूनच पुजाऱ्याला, गाववाल्यांना कसलीच भीक तो घालीत नाही. ढोंगी पुजाऱ्याकडचं प्रथेप्रमाणेच जेवणसुद्धा सरळ नाकारतो आणि लक्ष्मीलाच ह्या सर्व कामांना लावतो.

आता लक्ष्मीलासुद्धा एक नवरा आहे. बेनेगल त्याला मुका, बहिरा दाखवितो. तसा तो एके काळचा चांगला कारागीर. मातीची भांडी घडविणारा; पण आता जगच बदललेलं. मातीची भांडी कोण वापरणार? सारे ॲल्युमिनियमचाच वापर करतात. स्वाभाविकच हा बेकार बनलेला. मग लक्ष्मी आपलं वजन घालते. ह्याला तिच्या छोटे सरकाराकडे, गाडी हाकायला ठेवून घेते. हा कामाला लागतो; पण ह्याची पिण्याची आदत जात नाही आणि पैसे नसल्यानं चोरून ताडी पीत रहातो. लक्ष्मीचा नवरा किस्तय्या मग ताडी चोरताना पकडला पण जातो. चोरी करून पिण्याबद्दल लक्ष्मी त्याला नेहमीच डाफरत असते आणि अखेर त्या जमीनदाराकडचीच ताडी चोरून तो तिचा गळा कापतोच. आता तिची रदवदली पुरी पडत नाही. छोटेबाबू त्याला पोलिसपाटलाच्याच ताब्यात देतो. कारण ताडीच्या चोऱ्यांचा तो तसा आल्यापासूनच शोध घेत असतो. त्याची गाढवावरून धिंड निघते आणि ती भरल्या डोळ्यांनीच पहाते. बेनेगल नकळत बरंच काही सांगून जातो की ह्याही स्त्रीचं तिच्या नवऱ्यावर खरंखुरं प्रेमच आहे. ती वरवर त्याच्याशी कशीही वागत राहो.

आता भयाण एकाकीपणा. खेड्यातली शांतता. लग्नाची स्त्री वयात यावयाची म्हणून दूरवर आणि कातडीत जळणारं तारुण्य. सगळंच छोटे सरकारला लक्ष्मीकडे आकर्षून घेतं. त्यातच एका उत्कट क्षणी तो तिला जवळ करू पहातो. नवरा पळालाय म्हणतो. तो त्याला नामर्दही म्हणतो. आता मात्र ती पिसाळते. त्याच्या पुरुषत्वाची ग्वाही देते आणि उफाळलेली ती स्त्री छोटे सरकारलाच पुन्हा त्याला तसं न म्हणण्याबद्दल सुनावते. धिंडीच्या अपमानाने पळाला का असेना किंवा मुका-बहिरा का असेना तो तिचा नवराच असतो आणि त्याचं स्वत्व म्हणूनच ती सतत जागं ठेवत रहाते. संतापलेली लक्ष्मी घर सोडते. समोरच्याच शेतातल्या आपल्या ताडाच्या पात्यांच्या झोपड्यात जाऊन रहाते. मग मात्र हा हादरतो. तिला स्वतःच बोलावून आणतो आणि त्याच्या व्यक्तित्वाच्या प्रभावाखाली वावरणारी लक्ष्मी येतेही परत. तो तिच्यावर प्रेम दाखवतो. सांभाळीन म्हणतो. ती हुशार असते. व्यवहाराची जाण घेऊनच जगत असते. मग तीही विचारते. किती दिवस? बायको आल्यावर काय? तो म्हणतो, अखेरपर्यंत! अर्थात सर्वसामान्य स्त्रीच्यापेक्षा लक्ष्मी अलग नसते. त्याच्या खोट्या पुरुषी आश्वासनाला तीही भाळते. बेनेगल लक्ष्मीला यथार्थपणे दुबळेपण आणून देतो. प्रत्येक स्त्रीच्याच वाट्याला ते अटळपणे येतं. लक्ष्मीच्याही. म्हणूनच ती छोटे सरकारवर विश्वास ठेवून बसते आणि त्यापुढे त्याच्या घरातच झोपू लागते.

बेनेगल लक्ष्मीचं जीवन संथपणे घडवत जातो. मग मुलाची घडणही घडत जाते आणि ते सारंच वातावरण गढूळतं. छोटेबाबूची बायकोच येऊन पोहोचते. कारण छोटेबाबूचा आधीच खूप गाजावाजा झालेला. मग थोरला जमीनदार सुनेला पाठवून त्याच्या वर्तणुकीवर नियंत्रण आणू पहातो. तशी ती येते; पण तिला पहिलं बोचतं लक्ष्मीचं मोठं अस्तित्व. ती उघड संशय घेते. हा लोकांना खोटं पाडतो; पण तसा वास तिला असतोच. आता पुढे जाऊन लक्ष्मीसुद्धा गरोदर रहाते आणि जेवणाचं काम तर गेलेलंच. आता वरचेवर होणाऱ्या ओकाऱ्या. तिला झाडपाचंही काम होईनासं होतं. मग ती लक्ष्मीलाच कामावरून दूर करते. हा भडकतो. तिला का काढलंस? ती ऐकत नाही. मग एक दिवस पाटीलच ह्याला चापतो. लक्ष्मीचे दिवस भरलेयत! ती काय खाईल? पुढचा सवाल महत्त्वाचा असतो. 'तुमचे वडील असे वागले असते का? त्यांनी तर तिला जमीनच दिली असती. हे प्रश्न भेदक असतात. बायकोची अरेरावी. परक्याची बोच. आता आपल्या बापाच्या भूमिकेतला न्याय छोटेबाबूला नव्यानंच कळतो. प्रतापवरला त्याचा अन्याय बेनेगल स्पष्ट करतो. कारण लक्ष्मीची गर्भधारणा त्याला त्याच्या बापाच्या परिस्थितीत नेऊन ठेवते आणि त्याच्या सावत्र आईची भूमिका बेनेगल त्याला कठोरपणे पटवतो; पण इलाजच नसतो. तो लक्ष्मीला गाठतो. माझं हसं होईल. गावभर बोंब होईल म्हणतो. मूल पाडून टाक पण म्हणतो. वर विचारतो उद्दामपणे मुलाला पोसेल कोण? ती बधत नाही. ती एवढंच थंडपणे विचारते की, मी तुम्हाला पोसायला सांगितले काय? तेव्हा ती एका कॅनॉलच्या पाण्यावर कपडे धूत असते. ह्याचा आवाजच शांत होतो. आपलं हवं टाळण्याचा मार्गच ह्याच्या पुढे उरत नाही. बेनेगलची लक्ष्मी इथे आता आपल्या मुलासाठी जगताना दिसते. अगदी उपाशीपोटी. बेनेगल तिची भूमिका उंचावून सोडतो.

एका रात्री किस्तय्या परत आलेला दिसतो. तो भोळा माणूस फसतो. त्याला वाटतं, मूल आपलंच होणार आहे. ती त्याला पाहून खूपच रडते. त्याचा भाबडेपणा, सच्चेपणा पाहून ओक्साबोक्शी रडत रहाते. तिला खात्री पटते त्याच्या सच्चेपणाची. ढोंगाला उबगलेली ती स्त्री जणू आपला पश्चात्तापच व्यक्त करीत रहाते. आपण केलेल्या त्याच्या फसवणुकीच्या जाणिवेनंच उन्मळून पडते. आता तो थांबत नाही. अधिक जबाबदार

बनू पहातो. मुलाच्या भवितव्यासाठी तो नोकरी मागायला छोटेबाबूकडे निघतो. तिला जाणीव असते; पण किस्तय्या आनंदाने काठी उडवत निघतोच. शेतात पतंग उडवणारा छोटेबाबू त्याच्या आविर्भावाला आणि काठीलाच घाबरतो. आधीच मनातलं पाप डचमळणारं आणि त्यातनं लक्ष्मीवर केलेला अन्याय! आपल्या स्त्रीचं दडपण, सारंच असह्य झालेल्या छोटेबाबूला वाटतं, हा जाब विचारायला आलाय आपल्या पापाचाच. मग तो घाबरून पतंग सोडतो. हंटर आणतो. किस्तय्याला मारायला सुरुवात करतो. ही भरलेलं पोट सावरत हेलपाटत येते. ती त्याच्या देहावर आडवी पडते. छोटेबाबूला मनमोकळी शिवीगाळ करते. कारण तो तुला मारायला आला नव्हता. नोकरीला आला होता. त्याला बोलता येत नाही. त्याला तू मारलंस, तुझं निःसंतान होईल! लक्ष्मीला पाहून छोटेबाबू सरळ माघार घेतो. घरात पळतो आणि ती धीराची स्त्री आपल्या मुक्या–बहिऱ्या पण रक्तबंबाळ नवऱ्याला घराकडे घेऊन जाते.

निशान्तची घडण यापेक्षा वेगळीच होत जाते. अंकुरमधल्या अन्यायाचं कारण एकटा छोटेबाबू असतो, तर निशान्तमधला अन्याय थोरला अण्णा मधल्या दोघांकरवी घडवून आणतो. गावात नवा मास्तर येतो. तो शाळेतच बाजूला बिऱ्हाड टाकतो. त्याची स्त्री सुशीला भलतीच देखणी असती. आता तिचं देखणेपण म्हणजे मधल्या दोघांना पर्वणीच. कारण गावातली प्रत्येक स्त्री त्यांच्या हक्काचीच! शिवाय बेनेगलची ही सुशीला अंकुरच्या लक्ष्मीपेक्षा अधिक उथळ. लक्ष्मीचं अस्पृश्यत्व तिच्या सुसंस्कृत वागणुकीची अडवणूक करत नाही. ही मुक्या-बहिऱ्याची बायको आपल्या स्वत्वाबद्दल विलक्षण जागरूक असते म्हणूनच तिच्यावर बेनेगल बलात्कार होताना दाखवीत नाही. उलट तीच सच्च्या स्त्रीसारखी छोटेबाबूचं प्रेम सन्मानाने स्वीकारते. शिवाय त्या एकाकी परिस्थितीत तिलाही दुसरा पर्यायच असत नाही; पण सुशिलेचं व्यक्तिमत्त्व बेनेगल दिखाऊ रंगवतो. वेळी-अवेळी पान खाऊन तोंड रंगवून फिरणारी ही स्त्री जाणवते; पण मास्तरच्या घरात तरी शोभून दिसत नाही; पण बाजारात तोऱ्यानं फिरणाऱ्या ह्या स्त्रीची भूमिका, तिची अभिव्यक्ती साऱ्याच बेनेगल सर्वसामान्य पातळीवर आणून सोडतो. आता या मिरवण्याचा परिणामही तिला चांगलाच भोगावा लागतो. मधले दोघे चांगलेच अस्वस्थ होतात. झपाटले जातात. त्यातनं मास्तरचं पाणीही फार लवकर जोखतात आणि एका उघड्या रात्री सुशिलेला पळवून सुद्धा नेतात आपल्या वाड्यावर!

बेनेगलचीही दुसरी नायिका आपलाच घात करून घेते. मागे उरतो मास्तर. तो भांडतो, ओरडतो-आरडतो; पण त्याच्या मदतीला माणूस नावाचा कोणताच प्राणी येणारा नसतो. कारण तेही अण्णाचेच मिंधे. मागे उरते चढती रात्र, उध्वस्त मास्तर आणि त्याचा लहान मुलगा. हा कोट-टोपीत वावरणारा माणूस बेनेगल तितकाच भित्रा दाखवितो. तसं पाहिलं तर अंकुरचा छोटेबाबूसुद्धा भित्राच असतो; पण तो अन्याय केल्यावर त्याच्या मागून चालत येणाऱ्या न्यायालाच घाबरतो. तो लक्ष्मीच्या भावनांच्या दडपणाखाली वावरतो. तिची अस्पृश्यता नाकारून तिचं शरीर स्वीकारणारा हा पुरुष पुन्हा तिचा गर्भ नाकारण्याइतका भ्याड असतोच; पण तिची उपेक्षा करून घराबाहेर काढल्यावर त्याला भीती वाटते तिच्या मुक्या-बहिऱ्या नवऱ्याची. अर्थात बेनेगल माणूस नावाचा प्राणी सच्चेपणानं घडवतो आणि म्हणूनच तो ह्या विसंगतीचा सबळ पाठपुरावा करतो; पण निशान्तमधला मास्तर स्वभावानंच गरीब म्हणूनच मनानं भ्याड असतो. आपल्या स्त्रीला पळवल्यावर हा खचून जातो. सुन्न होतो; पण ह्याची प्रतिक्रिया तितकी प्रखर होत नाही. तो अन्यायाविरुद्ध लढायला तयार नसतो. शिवाय एक झुंडशक्ती अंगावर घेण्याचं बळही हा अन्याय बेनेगलच्या ह्या दुबळ्या मास्तराला मिळू शकत नाही. निशान्तमधला मास्तर कायदेशीर विरोधाची वाट पकडतो काही तरी करायचंच म्हणून. मग प्रथम पोलीसपाटलाकडे धाव घेतो; पण अण्णाच्या घरचा आश्रित असलेला पोलीसपाटील स्वतःच हतबल असतो. तो मास्तरलाच मूर्खात काढतो. मग त्या रात्रीच मास्तर तालुक्याची वाट पकडतो. एका वकिलाला भेटतो. पोलीस-अधिकाऱ्याला गाठतो. एका पुढाऱ्याच्या चिठ्ठीने कलेक्टरला गाठू पाहतो. त्याच्याकडून करता येण्यासारखं सारं काही करतो; पण ह्या दुबळ्या माणसाला प्रत्येकजणच विचारत राहतो, पुरावा काय? उलट त्या मातबर जमीनदाराची भलावण करणारी माणसं, त्यालाच हतबल करून सोडतात. एखादा व्यावहारिकतेने बोलतो. तुझी बायको कोर्टात तुझ्या बाजूनं जबाब देईल कशावरून? त्या मोठ्या माणसांच्या कशाला मागे लागतोस? त्यांची ताकद मोठी आहे. तुझा काय पाड लागणार आहे? त्यापेक्षा बायकोलाच विसर! निराश मास्तर गावाची वाट धरतो. आता त्याच्यात जळत असतो विलक्षण संताप. जगाबद्दलची मनस्वी चीड. आपल्या स्त्रीला गमावून बसल्याची भयानक अस्वस्थता आणि समर्थ माणसांच्या मोठ्या दुनियेत आपल्या दुर्बलतेची भेडसावती जाणीव! ह्या पराभूततेची जाणीवच त्याच्या मनाची कोंडी करून सोडते. वासना धुमसतात. भावना प्रखर होतात आणि अखेर परिस्थितीचा विस्फोट होतो. स्वाभाविकच हा दुबळ्या दिलाचा पुरुष उजाड माळावर बेभान होऊन उरीपोटी रडतो. डोकं आपटून घेतो. मन थरकावून सोडणारी भावनांची अभिव्यक्ती बेनेगल इथे घडवतो. तो उघड्या आकाशाखाली नियतीलाच जाब विचारू पाहतो.

## दोन भिन्न नायिका

बेनेगलची नायिका सुशीला स्वाभाविकच अत्याचाराखाली चिरडली जाते. ते दोघे मधले तिच्या शरीराचा व्यवस्थित वापर करून घेतात. सुरुवातीला ती पुरता विरोध करते आणि त्या रासवट पुरुषांपुढे हतबल होते. म्हणूनच सुरुवातीला हा बलात्कार असतो. ती बंड करते, उपाशी राहते, आपल्या मुलासाठी रडते; पण बेनेगलचीही दुसरी नायिका तितकी कणखर कधी नसतेच. सुशीलेसारखी स्त्री म्हणूनच त्या सैतानांनाही सहज शरण जाते. भोगालाच सामोरी जाते आणि तिच्याबाबतीत ते अपरिहार्यही असतं. कारण अंकुरच्या लक्ष्मीएवढी आपल्या स्वत्वाबद्दल ती कधीच जागरूक नसते. कडवी नसते. लक्ष्मी परिस्थितीचं भान राखते आणि मनाच्या हळुवार हळव्या अवस्थेतच छोटेबाबूला शरण जाते. ती विरोध करून बलात्कार ओढवून घेत नाही किंवा मुद्दामतीलाच खोटा विरोध उभा करते आणि परिस्थिती ताणल्यावर शरणागती पत्करून जमवून घेते

बेनेगल स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वातला मूलभूत विरोध येथे कलात्मकतेनं सजीव करताना दिसतो.

अंकुरची लक्ष्मी आपल्या नवऱ्यालाही जाब विचारते. दारू चोरून पिण्याबद्दल दटावत रहाते. कामधंदा करत नाही म्हणून दूषणं देते; पण इतकंही केलं तरी ती मनापासनं त्याचं प्रेम जाणून जगते. त्याला धुंद होऊन शरीरही देते. काम मिळवून देते. इतकंच काय पश्चात्तापानं रडतेही त्याच्यासाठीच; पण सुशीलेचा नवरा मुका–बहिरा नसतो, अडाणी नसतो. चांगला शिक्षित शिक्षक असतो म्हणूनच तिची आपल्या नवऱ्यावरील चीडही जबर असते. ती चीड कुठल्या फारशा प्रेमाचं भान राखत नसते. ती त्याची असमर्थता जाणून घेण्यायेवढी दिलदारही नसते. ती सर्वसामान्य स्त्रीच असते; म्हणूनच ती त्याला देवळात चुकून भेटते तेव्हा ती अण्णाच्याच ताब्यात असते. त्याच्या स्वाभिमानावर ती शब्दांच्या लाथा मारते किंवा षंढ जिण्यावर थुंकताना दिसते. त्या पराभूत माणसाला ती विचारत रहाते तुम्ही मला का पळवू दिलंत ? का नेऊ दिलंत ? जमीनदाराचा वाडा तुम्ही का पेटवला नाहीत ? पण त्या भव्य देवळाच्या दगडी खांबाखाली बसलेल्या ह्या दुर्बल माणसाकडे उत्तरच शिल्लक नसतं !

अंकुरची लक्ष्मी धिंड निघाल्यावर काहीशी अशीच बोलते. म्हणून मुका–बहिरा किस्तय्या पळ काढतो; पण मास्तरला पळता येणं शक्य नसतं. त्याचा स्वाभिमान मात्र किस्तय्या-इतकाच डिवचतो; पण त्याच्या वाट्याचा न्याय मोठा असतो. बेनेगल निशान्तमधला अन्यायच एका मोठ्या कुटुंबाभोवती उभारतो. आता सुशीलेचं वास्तव्य चांगलंच वादळी ठरतं. थोरलेपणाच्या नात्यानं अण्णा ह्या कृत्यावर पांघरूणच घालून ठेवतो. इतकं की मधल्या दोघांना तो सुशीलेचा उघड उपभोग घेऊ देतो; पण ह्या पाशवी कुटुंबाला आणखी एक कोपरा नेहमीच असतो. धाकटा विश्वम ह्या साऱ्यातच वेगळा असतो. ह्यांच्या अन्यायापासून तो अलिप्त असतो. कारण तो त्याच्या रक्तातच कधी नसतो. तो हळव्या मनाचा संसारी माणूस बेरड नसतो. तसा तो अण्णाला भिऊन असतो आणि मधल्या दोघांच्या दडपणाला बळी पडून दारू सुद्धा ढोसतो. म्हणूनच बेनेगल ह्या अन्यायी कुटुंबाला न्याय देण्यासाठीच विश्वम व त्याची बायको रुक्मिणी यांना उभे करतो. आता तो सुशीलेच्या अस्तित्वानं अस्वस्थ बनतो आणि पत्नीला डावलून तो सुशीलेला भेटत रहातो तिला देवळात नेऊन आणतो आणि स्वतःचं जेवण स्वतःच करून घेण्याची सवलत तिला मिळवून देतो. अण्णा ह्या साऱ्या गोष्टींना संमती देतो. मधले दोघे डिवचले जातात. अण्णाकडे तक्रार नोंदवतात. अण्णाला आता कुटुंबाची काळजी असते. आपल्या भावांचे दुराचर तो ज्या घरात खपवून घेतो, त्याच घरात तो विश्वमच्या भावना दडपू पहातो त्याच्या स्त्रीचं भलं साधण्यासाठी. बेनेगरचा दुसरा नायक विश्वम सुद्धा असतो. तो आपल्या ओल्या वागणुकीनं मोठा होत राहतो.

शब्द थंड असतात, धुमसते असतात. आशय वणव्यासारखे जळत जातात. सुशीलेचे शब्द मास्तरला झोंबतात आणि आपल्यावरील अन्यायाची प्रखर जाणीव तेव्हाच त्याला होते. ह्या प्रतिक्रियेतून तो अन्यायाविरुद्ध लढायला तयार होतो. तसा आता त्याच्याबरोबर देवळातला पुजारीही उभा रहातो जो मधल्या जमीनदारांनी देवाच्या दागिन्यांची केलेली चोरी माहीत असूनही गप्प रहातो. लढा उभारल्यावर ताकदीला वेळ नसतो. कारण अन्यायाचं पीक मोठं पिकून आलेलं असतं. एका गावमिरवणुकीच्या निमित्ताने सारेच गावकरी अण्णाच्या वाड्यावर जातात. देवीला मानाची फुलं चढविणाऱ्या अण्णावरच हल्ला चढवतात. पहिला घाव मास्तर घालतो. मग सारेच तुटून पडतात. विरोधाच्या जाणिवेनं खवळलेले मधले वाड्यातून बंदूक चालवतात. पहिला बळी मास्तरचा ! इतरही कोणी. मग वर्षानुवर्षांच्या जाणिवांचा बांधच फुटतो. सारेच पिसाटतात. वाड्यावरच चालून जातात. मधले दोघे ठेचून मारले जातात. रुक्मिणीचा सुद्धा बळी जातो. मागे उरतात विश्वम आणि सुशीला. कारण तिच्यावरील प्रेमानं भारावलेला विश्वम तिला त्या वणव्यातून जगवू पहातो. गावाबाहेर नेतो. येथपर्यंत सुशीलेला समजून चुकतं ह्या सच्च्या माणसाचं आपल्यावर प्रेमच जडलंय. मग ती त्याच्याही भावनांना सामोरी जाते. अखेर चवताळलेला जमाव दोघांचाही बळी घेऊन टाकतो.

बेनेगलचा निशान्त हा विलक्षण प्रभावी चित्रपट ठरतो. अंकुरमधला अन्याय न्यायाची मागणी करतो तसाच निशान्तमधलाही; पण बेनेगल अंकुरमधल्या अन्यायाला एकच प्रभावी उत्तर देतो. छोटेबाबूच्या घराची काच दगड मारून फोडणारा पोरगा. या फुटलेल्या काचेतूनच बेनेगल बरंच काही सांगतो. अन्यायाशी सामना करण्याच्या प्रवृत्तींचा अंकुर तेथे रुजलेला दिसतो. निशान्तमधला अन्याय अधिक प्रखर असतो. त्याचा परिणामही तितकाच सार्वत्रिक असतो. म्हणूनच त्याची प्रतिक्रियाही तितकीच प्रखर ठरते. हा अन्यायही तितकाच मोठा न्याय मागतो आणि म्हणूनच ह्या मोठ्या अन्यायाची किंमत म्हणून एका मातबर कुटुंबाचाच बेनेगल अन्त घडवून आणतो. वास्तविक तो त्यातून अपेक्षित न्यायाचीच एक कोरी पहाट घडवीत असतो.

बासू चटर्जीचा रजनीगंधा किंवा श्याम बेनेगलचे अंकुर व निशान्त हे सारेच चित्रपट हिंदी चित्रपटसृष्टीत नव्या जाणिवांचं प्रवर्तन करणाऱ्या महत्त्वपूर्ण निर्मिती ठरतात. तसं पाहिलं तर बासूचा रजनीगंधा प्रवृत्तीनं हलकाफुलका तर बेनेगलचे अंकुर व निशान्त हे तितकेच गंभीर मनोवृत्तीचे चित्रपट. हे तीनही चित्रपट जुन्याच विषयांतून उभारले जातात तर त्यातल्या जाणिवांच्या घडणीही नव्या ठरतात. रजनीगंधा हा प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचा चित्रपट तर अंकुर संथ व निशान्त गतिमान प्रक्रियांचं चित्रण करतो. रजनीगंधात बासू वैयक्तिक जीवनाची भावपूर्ण उकल करतो तर बेनेगल सामाजिक समस्यांची कठोर, जीवघेणी उकल करताना दिसतो. ह्या तीनही चित्रपटांच्या नायिका प्रभावशाली व्यक्तिमत्त्वात वावरतात. रजनीगंधाची दीपा ही प्रतिष्ठित, समाजाची प्रतिनिधी तर अंकुरची लक्ष्मी अस्पृश्यवर्गाची प्रतीक, तर निशान्तची सुशीला सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वाच्या जवळपास वावरणारी स्त्री ठरते. हे सारेच चित्रपट वेगवेगळ्या स्त्रियांचं वेगवेगळं आयुष्य, प्रवृत्ती पड्यावर आणतात. ह्यातली स्त्री ही भावनांच्या संघर्षात होरपळताना दिसते तर इतर दोघी ह्या सामाजिक अन्यायाच्या बळी ठरतात.

इतर साऱ्याच नव्या चित्रपटांप्रमाणेच हे तीनही चित्रपट सामाजिक किंवा वैयक्तिक जाणिवांतून घडवले जातात. आशयाच्या बाबतीत अंकुर व त्यानंतरचा निशान्त जरी अधिक प्रभावी वाटले तरी रजनीगंधातली भावपूर्णताही तितकीच लक्षणीय आहे. अंकुर व निशान्तमधून बेनेगल सामाजिक समस्यांचं एक जाणतं चित्रण करतो, तर सारा आकाशचा बासू चटर्जी रजनीगंधातसुद्धा व्यक्तिगत संदर्भांनीही मोठेपणा आणून देतो. □ □

# साफल्याचीं दहा वर्षें

## राष्ट्राची आगेकूच चालूं आहे

### आत्मनिर्भर स्वावलंबी अर्थव्यवस्थेकडे

अन्नधान्यांचें विक्रमी उत्पादन—114 दशलक्ष टन
औद्योगिक उत्पादनांत 30 टक्के वाढ
वीज उत्पादनांत 100 टक्के वाढ
केवळ एकाच वर्षांत 3300 कोटि रुपयांपेक्षाहि जास्त किंमतीच्या मालाची निर्यात

### शिस्तशीर जीवनमार्गाच्या दिशेने

वक्तशीरपणा व कार्यक्षमता यांत सुधारणा;
अधिक सर्वांगीण कामगिरी व लक्षणीय फलनिष्पत्ति;
जीवनाच्या सर्व क्षेत्रांत शांतता व एकवाक्यता

### आणि जास्त एकतेच्याहि रोखाने

*"जवळ-जवळ प्रत्येकच वर्षानं आपल्यासमोर कांही ना कांही आह्वानं आणि पेचप्रसंग निर्माण केले... आपल्याला आपल्या देशाचं परकी आक्रमणापासून रक्षण करावं लागलं... प्रादेशिक रस्सीखेचींवर (विवादांवर) नियंत्रण ठेवावं लागलं नि लवचीकपणा आणि खंबीर अशी गोडीगुलाबी यांच्या मदतीनं मार्ग काढावा लागला. आता आपण खाजगी उद्योगधंदे नष्ट न करतां, सरकारी पुढाकारानं विकास घडवून आणण्याचा भरीव कार्यक्रम हातीं घेतला आहे।"*

इंदिरा गांधी



# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

## २४।१।७६ ते ३०।१।७६

### मध्यवर्ती मंत्रिमंडळात पुनश्च बदलाचे वारे

रवी हा राजकीय सामर्थ्याचा ग्रह भारताच्या व त्याचबरोबर पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींच्या कुंडलीत वास करीत असल्यामुळे जगाच्या राजकीय रंगमंचावर ही दोन्ही नावे आज गाजत आहेत. आज भारताची प्रतिमा उंचावली आहे व थोडाफार दराराही निर्माण झाला आहे हे कुणीच नाकारू नये; पण भारताच्या धार्मिक व सामाजिक बदलाचा जो मूलभूत पाया ज्या वीस कलमी कार्यक्रमास प्रवर्तित होणार आहे त्याच्या अंमलबजावणीसाठी संघटनात्मक व शासकीय पातळीवर बदलाची गरज पंतप्रधानांना भासत आहे. तसाच विचार त्या या आठवड्यात करतील. मंत्रिमंडळात बदलाची, कॉंग्रेस संघटनेत बदलाची चाहूल या वेळी लागण्याचा संभव आहे. महाराष्ट्र, कोकण, केरळ, उत्तरप्रदेश, आंध्र, पंजाब येथील शासनात महत्त्वपूर्ण घटना घडू शकतील.

---

**मेष : अविस्मरणीय घडेल**

मकरराशीत वास्तव्य करणारा एकटा रवीदेखील तुमच्या कर्तृत्वाची व प्रगतीची ग्वाही द्यायला पुरेसा आहे. अशा ग्रहामुळे अभूतपूर्व व अविस्मरणीय अशा घटना घडत असतात. तुमच्या जीवनातही या आठवड्याला असे काही घडले तर आश्चर्य वाटू नये. नोकरीव्यवसायात या वेळी काहीही घडू शकेल. तुमच्यावरील अन्यायाबद्दल वरिष्ठांची खात्री पटेल व ते आता तुमची शिफारस करतील. इंजिनियरिंगउद्योग, टेलिफोन, खतकारखाने, महसूलखाते वगैरे विभागात काम करणाऱ्या नोकर लोकांना आनंदाची बातमी कळेल. वढती-प्रमोशनचा योग सहज जमून येईल. चालू व्यवसायातील अडचणी, आर्थिक कमतरता आता दूर होतील. मंगळवार व गुरुवार शुभकारक आहे. महिलांना पैशाच्या व्यवहारात प्रमुखत्व मिळेल. एखादा लघुउद्योग सुरू करायला हरकत नाही. विद्यार्थ्यांचे नाव गाजेल.

**वृषभ : नव्या पर्वास प्रारंभ**

बाराव्या केतूमुळे तुम्ही एवढे हबकून जाण्याचे काहीच कारण नाही. राशीत असलेला मंगळ व भाग्यस्थानी असलेला रवी तुम्हाला काही उणे पडू देणार नाही. पैसा खर्च होणे व क्वचित पैशाची अडचण भासणे असे घडण्याची शक्यता असली तरी आयत्या वेळी एखादा ' परमेश्वर ' तुमच्यासमोर उभा राहील व तुमची अडचण निवारून नेईल. एरवी हा आठवडा तुम्ही काही नवे सुरू करावे असाच आहे. नोकरीच्या बाबतीत काही नव्या पर्वाचा प्रारंभ होईल. चालू नोकरीत एकदम अधिकारप्राप्ती होईल. तुम्ही कोणत्याही क्षेत्रात काम करीत असा तुमची सेवानिवृत्ती जवळ आली असेल तर ती लांबणीवर पडेल. तुम्हाला मुदतवाढ मिळेल. कापड-व्यापार तेजीत चालेल. महिलांनी मंगळवारचा उपास करावा. तो त्यांना फायद्याचा ठरेल. विद्यार्थ्यांना प्रवासाचा योग येईल.

**मिथुन : अडचण कमी होईल**

सध्या बारावा मंगळ तुम्हाला फार छळतो आहे. तरीपण ग्रहाची तशी काही अगदीच अवकृपा नाही. काही महत्त्वाच्या कामांचा निकाल यावेळी तुमच्या बाजूने लागण्याची शक्यता आहे. खर्चाचे मान हाताबाहेर जाणार असले तरी पैसा मिळण्यात काही कमी पडणार नाही. अचानक पैसा मिळण्याचे योग आहेत. साहेब, लॉटरीचा प्रयत्न अवश्य करावा. जमून जाईल नशिबाने ! रेसमध्ये या वेळी तुमच्यापैकी अनेकांचे भाग्य उजळून निघेल. नोकरीत वरिष्ठांच्या कलाने घ्या. हो ला हो म्हणा. कामाचा ताण पडला तरी कुरकुरत बसू नका. महिलांना माहेरच्या मंडळीकडून बक्षिसांच्या रूपाने काही मिळण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांना श्रमाचे बक्षीस मिळेल.

**कर्क : नोकरीत प्रगती**

चंद्रासमोर रवी आहे. त्यामुळे तुमचे कोणतेही काम या आठवड्यात अडकून पडण्याची शक्यता नाही. प्रामुख्याने नोकरीत जे तुम्ही ठरवले असेल ते होईल. महत्त्वाच्या कामासाठी गाठीभेटी घ्यायच्या असतील तर त्या या आठवड्यात अवश्य घ्या. तुमच्यापैकी ज्यांच्यासमोर बेकारीची समस्या उभी राहिली असेल ती समस्या तुम्हाला भेडसावणार नाही. सेवानिवृत्तीचा आदेश आला असला तरी तो मागे घेतला जाईल. स्वतःचा उद्योग सुरू करायला तांत्रिक व आर्थिक सहकार्य मिळेल. आर्थिक अरिष्ट आर्थिक




स्थिती आता सुधारू लागेल. लॉटरीचा प्रयत्न करा. महिलांनी स्वतःच्या एखाद्या उद्योगात काही तरी करावे. यश मिळेल. विद्यार्थ्यांच्या अपेक्षा पूर्ण होतील.

**सिंह : मार्ग निष्कंटक**

तुमच्याविरुद्ध कारवाया सुरू आहेत याची तुम्हाला दखल घ्यावीच लागेल. तशी ती दखल घेऊन योग्य पावले उचललीत तर तुमच्या प्रगतीचा मार्ग निष्कंटक होईल. शत्रूला योग्य वेळी पाणी पाजले पाहिजे.संधी येताच तिचा फायदा घेतला पाहिजे. या आठवड्यात अशी संधी तुम्हाला मिळणार आहे. राजकारण, समाजकारण, अर्थकारण यात तुमच्या मुत्सद्देगिरीचा कस लागणार आहे. माघार घ्यावी लागली तरी ती अशी फायद्याची ठरावी. नोकरीत मानसन्मानाचा योग आहे. अधिकारपद मिळेल. महिलांस सार्वजनिक कामात पुढारीपण मिळेल. विद्यार्थ्यांचे वर्गात वर्चस्व राहील.

**कन्या : मागणी मार्गी लागेल**

कधीकधी तुमच्या जीवनात ग्रहांची अशी काही सद्दी निर्माण होते की त्या वेळी तुमच्या फायद्याच्या घटना अकस्मातपणे घडून येऊ लागतात. या आठवड्यात रवी पाचवा आहे तो तुमच्या कल्याणाच्या आगामी हिताच्या अनेक घटना घडवून आणणार आहे. नोकरीत एखादी महत्त्वाची खूप दिवस भिजत पडलेली मागणी मार्गी लागेल.वरिष्ठांचा निर्णय तुमच्या बाजूने होईल. खाजगी नोकरीत मालकांच्या मर्जीचा अनुभव येऊ लागेल. आर्थिक बाजू थोडीफार सुधारलेली दिसेल. जुने येणे वसूल होईल. काळजीचे प्रश्न मार्गी लागतील. मान, प्रतिष्ठा असे मिळून नाव गाजेल. शुक्रवार उत्तम आहे. उपासाचा फायदा होईल. महिलांची तब्येत सुधारलेली दिसेल. उत्साह निर्माण होईल. विद्यार्थ्यांच्या अडचणी कमी होतील.

**तूळ : दर्जा वाढता राहील**

तूळराशीला हा आठवडा प्रगतीचा व उल्हासदायक असा जाणार आहे. सार्वजनिक कार्यात तुमचा संबंध असेल तर तुमची लोकप्रियता वाढणार असून तुमचा दर्जा उंचावणार आहे. राजकारणात मात्र थोडीफार माघार घ्यावी लागणार आहे. तडजोड स्वीकारावी लागेल. नोकरी-व्यवसायाची स्थिती एकंदरीत उत्तम राहील. सामान्यपणे वरिष्ठांच्या मर्जीनुरूप जे काही तुम्हाला मिळवायचे असेल ते तुम्हाला मिळवता येईल. मतभेद टाळून काम करून घ्या. बेकारांना नोकरीत स्थान मिळेल. आश्वासने प्रत्यक्षात येतील. रेस व लॉटरीत भाग घ्या. महिलांना गानकलेत प्रसिद्धी मिळेल. विद्यार्थ्यांना आवांतर उद्योगात वेळ खर्चावा लागेल.

**वृश्चिक : पुढे पाऊल पडेल**

सध्या तरी तुमच्या प्रगतीचे सारे दोर रवीच्याच हाती आहेत. रवि कर्तृत्वाला नवे क्षेत्र उपलब्ध करून देणार आहे. उद्योग असो की नोकरी असो त्यात तुमच्या गुणांना प्रोत्साहक ठरेल असे वातावरण निर्माण होईल. आर्थिक व तांत्रिक सहाय्य मिळून तुमचे बस्तान बसेल. एखाद्या अति उच्चपदस्थ व्यक्तीबरोबर तुमचा संबंध येऊन त्याचा आशीर्वाद मिळू शकेल. जमिनीचा व्यवहार मात्र जरा जपून करा. आर्थिक बाजू जरी कमकुवत नसली तरी पैसा जपून खर्च करा. हिशोबाची कामे करणाऱ्यांनी नोकरीत भारी दक्षता घ्यावी. मंगळवारचा उपास करा. महिलांनी संतापाला आवर घालावा. जमवून घ्यावे लागेल. विद्यार्थ्यांची उधळपट्टी त्यांना अडचण निर्माण करील.

**धनु : अडचणी संपतील**

दुसरा रवि खरे म्हणजे तुम्हाला अनुकूल आहेच, तरी पण अजून थोडे धिमेपणाने वागणे आवश्यक आहे. नोकरी अगर व्यवसाय यात तुम्ही आणि तुमचे मालक यात विश्वासाचे वातावरण निर्माण होण्यासाठी अजून थोडे थांबावे लागेल; पण आता अडचणी संपल्या आहेत याचा प्रत्यय थोडाफार दिसू लागेल. आर्थिक कोंडी फुटलेली आहे. तुम्हाला कर्ज असेल अगर तुम्ही जर कुणाचे उसने पैसे घेतले असतील तर त्याचा एवढा तगादा तुम्हाला लागणार नाही. मार्ग निघेल. शारीरिक बाजू बळकट राहणार नाही; पण मागच्या आठवड्याइतका त्रास नाही. थंडीसाठी जपणे आवश्यक आहे. महिलांना नोकरीत श्रमाचा योग्य मोबदला मिळेल; पण श्रम फार पडतील. कष्ट पडतील. विद्यार्थ्यांचा बौद्धिक कस वाढणारी घटना घडेल.

**मकर : मतभेदाला सुरुवात होईल**

मकरराशीत रवीचे प्राबल्य आहे म्हणून मकरराशीच्या व्यक्ती आज सामर्थ्यवान म्हणून वावरत आहेत; पण त्यांनीही सावध राहिले पाहिजे. कारण नियती ही अनुकूल व प्रतिकूल अशा दोन्ही बाजूंस झुकत असते. म्हणून मकरराशीच्या व्यक्तींनी जास्त सावधगिरीने वागावे असे सुचवितो. आपले मित्र कोण व केवळ तोंडपुजे कोण हे त्यांनी लक्षात घेऊन सारे व्यवहार करावेत. या आठवड्यात नजीकच्या सहकाऱ्यांबरोबर ताणण्यात नवे मतभेद निर्माण होणार आहेत. नोकरीत हाताखालच्या व्यक्तींना सांभाळून घेण्याचे धोरण ठेवा. 'दादागिरी' करू नका. आर्थिक परिस्थिती थोडीफार सुधारेल. कर्जाबाहेर पडण्याचा मार्ग सापडेल. शुक्रवार उत्तम जाईल. महिलांना राजकारणात मोठे स्थान मिळेल; पण नोकरीत माघार घ्यावी लागेल. विद्यार्थ्यांना मानसिक स्वास्थ्य लाभेल.

**कुंभ : धोरणाने वागा**

कुंभराशीच्या व्यक्तींना शनीचा फार पाठिंबा आहे; पण तेवढाच रवी बारावा असून तो तुमचे पाय मागे खेचण्याचा प्रयत्न करीत आहे त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. राजकारण असो की वैयक्तिक जीवनातील कोणतेही पाऊल असो ते धोरणाने उचला म्हणजे ते योग्य त्या ठिकाणी पडेल व तुमचे यश द्विगुणित होईल. नोकरीत तुमच्या बढतीची चर्चा चालू होईल. वरिष्ठांच्या गोटात हे चालू होईल; पण तुमची उपेक्षा करून त्यांचे चालणार नाही. राजकारणात तुम्ही उच्चपदस्थ वा महत्त्वाच्या बढतीच्या जागेवर प्रतिष्ठित व्हाल. तुमच्या कर्तृत्वाला नवे क्षेत्र उपलब्ध होईल. उद्योगाच्या क्षेत्रात व्यापार महत्त्वाचा ठरेल. तुमच्या मालाला उठाव येईल. तूट भरून निघेल. शनिवार व सोमवार महत्त्वाचे आहेत. महिलांना स्वतंत्र उद्योगात मोठा वाव मिळेल. खर्चावर मात्र बंधन घाला. विद्यार्थ्यांनी केवळ स्मरणशक्तीवर अवलंबून राहू नये.

**मीन : पैसा मिळेल**

हा आठवडा तुम्हाला बराच मोठा फायदा करून देणारा ठरणार आहे. रवी अकरावा आहे. एखाद्या उच्चपदावरील अधिकाऱ्याची तुमच्यावर मर्जी असेल किंवा एखादी राजकारणी व्यक्ती तुमच्या सहवासात असेल तर तुम्हाला 'घबाड' मिळणार आहे. स्थावराच्या बाबतीत किंवा संपत्तीच्या वाटपाच्या बाबतीत तुम्हाला बरीच मोठी रक्कम मिळू शकेल. नोकरीत पगारवाढ मिळण्याची शक्यता असून ती जुन्या मुदतीपासून मिळेल व तुम्हाला एकदम रक्कम मिळेल. लेखक, पत्रकार, प्रकाशक यांना हा आठवडा लाभदायक जाईल. चालू नोकरी अडचणीतून जात असेल तर ती आता दूर होईल. महत्त्वाचा पत्रव्यवहार करायला आठवडा अनुकूल आहे. अनेकांना या आठवड्यात कला-करमणुकीचा लाभ होईल. महिलांच्या आशाआकांक्षांना स्फूर्तिदायक अशा घटना घडतील. विद्यार्थ्यांनी लेखनाचा प्रयत्न करावा. सहज जमून जाईल. ☐ ☐